# मिळून साऱ्याजणीच्या अक्षरवाटा

## ऑगस्ट १९८९ ते जुलै २०१९

**एक प्रवास: आत्मभान, समाजभान आणि माणूसभान जागवण्याचा!**




# विद्या बाळ अध्यासन प्रकल्प अहवाल

## एक झलक

प्रकल्प प्रमुख: गीताली वि. मं. • समन्वयक: सुवर्णा मोरे

'ती', 'ते' आणि 'तो'यांचा स्वत:शी आणि परस्परांशी नव्यानं संवाद होण्यासाठी ...मासिक नव्हे चळवळ!

# विद्या बाळ अध्यासन प्रकल्प

ऋणनिर्देश


**अर्थसाहाय्य**
परिमल आणि प्रमोद चौधरी फाउंडेशन

**मार्गदर्शक**
अनघा तांबे
स्वाती देहाडराय
वैशाली दिवाकर
उज्ज्वला बर्वे

**मुखपृष्ठ संकल्पना व मांडणी**
मिलिंद जोशी

**मांडणी**
सारद मजकूर : अभिजित सोनावणे, रत्नेश चोरगे

# विद्याताईंच्या प्रसन्न स्मृतीला...



तसंच त्यांच्या वाटेवरचे सोबती पुष्पा भावे, सुमित्रा भावे, गेल ऑम्वेट, सतीश काळसेकर, विलास सोनावणे, एन. डी. पाटील, अनिल अवचट आणि परिवर्तनाची मशाल धगधगत ठेवणाऱ्या इतर अनेक ज्ञात अज्ञात व्यक्तींच्या स्मृतीला...
परिवर्तनाची ही मशाल अशीच धगधगत ठेवू
या वचनासह अर्पण!

# विद्या बाळ अध्यासन प्रकल्प

## - झलक -



# 'साऱ्याजणी'च्या अक्षरवाटा

'मिळून साऱ्याजणी'चा ३१ वा वर्धापन दिन ९ ऑगस्ट २०२० रोजी साजरा झाला. त्यानिमित्ताने मासिकाच्या संस्थापक-संपादक स्मृतिशेष विद्या बाळ यांच्या स्मृतीला अभिवादन करण्याच्या हेतूने या मासिकानं सामाजिक, वाङ्मयीन आणि सांस्कृतिक क्षेत्रात दिलेल्या योगदानाचा अभ्यास करणारा 'विद्या बाळ अध्यासन प्रकल्प' सुरु केला गेला. या प्रकल्पाच्या प्रमुख गीताली वि मं आणि समन्वयक सुवर्णा मोरे आहेत या प्रकल्पाची उद्दिष्टे अशी होती -

- विद्या बाळ यांनी मासिकाच्या माध्यमातून वाचकांबरोबर सुरु केलेला संवाद आणि त्याचे ऐतिहासिक योगदान / स्त्री प्रश्नांची मांडणी करण्यामधील मिळून साऱ्याजणीचे योगदान अभ्यासणे.
- मासिकाने ३१ वर्षात घेतलेल्या वेगवेगळ्या विषयांची आणि उपक्रमांची चिकित्सा करणे.
- मासिकाचा दर्जा उंचावून भविष्यातील मासिकाची वाटचाल दमदार व्हायला मदत करणे.
- मासिक आणि वाचक यांच्यामधील संवादाचा अभ्यास आणि भविष्यातील वाटचालीचा वेध घेणे.

'साऱ्याजणीच्या अक्षरवाटा' या शीर्षकाने हा अभ्यास प्रकल्प नुकताच पूर्ण झाला. या प्रकल्पाची  ही झलक. 'मिळून साऱ्याजणी'मध्ये गेल्या ३१ वर्षात प्रसिद्ध झालेल्या साहित्याचा मागोवा घेणाऱ्या विस्तृत लेखांची त्या त्या लेखकांनी करून दिलेली ओळख यात वाचायला मिळेल. संपूर्ण अभ्यास प्रकल्प लवकरच उपलब्ध होईल

# पानोपानी


- साऱ्याजणीच्या अक्षरवाटा / गीताली वि.मं. / ६
- विद्याताईंच्या प्रसन्न स्मृतीला प्रेमाचा सलाम
  गीताली वि.मं. / ८
- मि.सा.ची मैत्री आणि बरंच काही / सुवर्णा मोरे / ८
- विद्या बाळ अध्यासन प्रकल्पाचा आर्थिक चेहरा
  परिमल चौधरी / १०
- साऱ्याजणीच्या जन्माची चित्तरकथा :
  सुहृदांशी पत्रभेट / विद्या बाळ / ११
- विद्या बाळ अध्यासन प्रकल्प : समाजशास्त्रीय महत्त्व
  वैशाली दिवाकर / १२
- साऱ्याजणीच्या महाराष्ट्रभर आणि महाराष्ट्राबाहेरही
  विखुरलेले विचारदूत / शमा सुबोध / १४
- माणूस आणि मासिक : महाराष्ट्राबाहेरून बघताना
  विनीता बाळ/ १६
- अमेरिकेत साऱ्याजणी : मैत्रिण हॉटलाईन नाही
  वॉर्मलाईन / सुनिता धुमाळे / १८
- 'मिळून साऱ्याजणी' म्हणजे...
  स्मृतिशेष पुष्पा भावे, श्यामला वनारसे / १९
- स्त्री चळवळीच्या सोबतीने 'साऱ्याजणी'ची वाटचाल...
  छाया दातार / २०
- मुखपृष्ठ : मासिकाचा आशयघन, बोलका चेहरा
  मिलिंद जोशी / २२
- ३१ वर्षातले सोबती... / २३
- संवाद : आपुलाची वाद आपणाशी / अनघा तांबे / २३
- वाचणारे लिहितात : मासिकाचे अंतरंग उजळताना
  स्वाती देहाडराय / २६
- वाचायला हवं / दिपाली जंगम / २६
- विद्याताईंचे लेखन थेट, प्रामाणिक आणि प्रागतिक
  उज्ज्वला बर्वे / २७
- सिद्धांत आणि अनुभव यांना जोडणारा पूल
  वैशाली जोशी / २८
- संघर्षाची गाथा मांडणारी सदरं / संध्या गवळी / २९
- 'साऱ्याजणी'चे राजकीय भान / आकाश साबळे / ३०
- जनजागरण करणारे वृत्तांत / दिपाली चव्हाण / ३०
- व्यंगचित्र / आकाश साबळे / ३१
- दिवाळी अंकाच्या विशेष विभागांचे वैशिष्ट्य
  अमरनाथ सिंग / ३२
- कथांच्या दालनात
  निलिमा बोरवणकर / भारती पांडे / ३४
- कथांचे विश्लेषण / प्रमोदिनी वडके-कवळे / ३५
- कविता विश्व / नीरजा/ ३६
- मैतरणी ग मैतरणी आणि झुंजूमुंजू
  श्रीकांत ढेरंगे / ३७
- सारांश लेखन / प्राजक्ता महाजन, शीतल साठे / ३७
- विशेष ओळखी / सरिता आव्हाड / ३८
- सारांश लेखन / निलिमा गावडे / ३८
- नवीन प्रश्नांसाठी ऊर्जा / स्नेहा गोळे / ३८
- कविता विश्व / सीमा नाईक-गोसावी / ४०
- वैविध्यपूर्ण सदरं / वंदना पलसाने / ४१
- तरूण डॉट कॉम / पुनम बा. मं. / ४२
- संवाद शब्दांचा साकव / सुनीता भागवत / ४२
- वाचकांच्या प्रतिक्रिया / वसुधा जोशी ४३
  दीप्ती जोशी / ४३
- पुढील वाटचाल... / अंजली मुळे/ ४४



# 'साऱ्याजणी'च्या अक्षरवाटा


**गीताली वि. मं.**

**(ऑगस्ट १९८९ ते जुलै २०१९)**
**एक प्रवास : आत्मभान, समाजभान आणि माणूसभान जागवण्याचा!**
**'ती' 'ते' आणि 'तो' यांचा स्वतःशी आणि परस्परांशी नव्यानं संवाद होण्यासाठी... मासिक नव्हे चळवळ!**

'मिळून साऱ्याजणी' मासिकाच्या संस्थापक संपादक विद्या बाळ यांचं ३० जानेवारी २०२० रोजी दुःखद निधन झालं. त्यांच्या निधनाच्या दुःखाच्या गडद छायेतून साऱ्याजणीचा शोकाकुल परिवार बाहेर पडण्याआधीच कोरोना महासाथीचा विळखा संपूर्ण जगाला पडला. या अभूतपूर्व परिस्थितीत एप्रिल ते जुलै २०२०चे मिळून साऱ्याजणीचे अंक प्रकाशित करता आले नाही. साऱ्याजणीचा एकतिसाव्या वर्धापन दिनाचा ऑगस्ट २०२०चा अंक मात्र अनेक विघ्न पार करून प्रकाशित केला. त्याच्या प्रकाशनाच्या ऑनलाईन कार्यक्रमात विद्याताईंची स्मृती जागवण्याची सर्जनशील, विधायक कृती करण्याचा संकल्प 'साऱ्याजणी'नं केला. तो संकल्प म्हणजे विद्या बाळ अध्यासन प्रकल्प. तो संकल्प वास्तवात पूर्ण होण्यासाठी परिमल आणि प्रमोद चौधरी फाउंडेशननं आर्थिक सहाय्य केलं त्याबद्दल त्यांचे शतशः आभार!

विद्या बाळ म्हणजे 'मिळून साऱ्याजणी' असं पक्कं समीकरण समाजमानसात रुजलेलं आहे. म्हणून या प्रकल्पांतर्गत मिळून साऱ्याजणी मासिकानं गेल्या एकतीस वर्षात सामाजिक, वाङ्मयीन, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात काय योगदान केलं याचा लेखा-जोखा घेणारा सविस्तर अभ्यास करण्याचं ठरलं. हा अभ्यास शास्त्रोक्त पद्धतीनं व्हावा यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातल्या स्त्री अभ्यासकेंद्राच्या संचालक डॉ. अनघा तांबे आणि प्राध्यापक डॉ. स्वाती देहाडराय यांनी मोलाचं मार्गदर्शन केलं. त्यांच्या बरोबरीनं सेंट मीराज महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. वैशाली दिवाकर आणि वृत्तपत्र विभागाच्या प्रमुख डॉ. उज्ज्वला बर्वे यांनीही वेळोवेळी महत्त्वाचं मार्गदर्शन केलं. साऱ्याजणीच्या वाङ्मयीन योगदानासंदर्भात एसएनडीटी महाविद्यालयाच्या मराठीच्या विभाग प्रमुख प्रा. डॉ. रेखा इनामदार साने, निवृत्त प्राचार्य डॉ. अश्विनी धोंगडे तसंच प्रा. सीताराम आणि प्रा. सीमा गोसावी यांच्या बरोबरच्या अभ्यासपूर्ण चर्चा या अभ्यासाला योग्य दिशा देणाऱ्या ठरल्या. अभ्यास सखोल होण्यासाठी मासिकाच्या सर्व साहित्याचं दोन तीन पातळ्यांवर वाचन आणि विश्लेषण झालं.

एकतीस वर्षातल्या 'साऱ्याजणी' मधल्या अमाप साहित्याचा अभ्यास शास्त्रोक्त पद्धतीनं सुरळीतपणे पार पाडण्यासाठी प्रकल्प समन्वयक डॉ. सुवर्णा मोरे हिनं कळीची भूमिका निभावली. जात-वर्गीय जाणिवांचं तीक्ष्ण टोकदार आकलन असणाऱ्या, स्त्री वादाचा सखोल अभ्यास केलेल्या या तरुण मैत्रिणीकडून हा प्रकल्प करताना 'साऱ्याजणी'ला बरंच काही शिकता आलं. लॉकडाऊनच्या पर्वात




अनेक अडचणी- समस्यांवर मात करत ऑनलाईन पद्धतीनं मिळून साऱ्याजणी मासिकातील समग्र साहित्याची सूची करण्याचं मोठं काम तिनं केलं. त्यात तिचा जोडीदार ॲड. आकाश साबळे यानं तिला सहाय्य केलं हे आवर्जून सांगायला हवं. एकतीस वर्षांतील साहित्याची सामाजिक, राजकीय, वृत्तांत, सदरं, कथा, कविता, संवाद, व्यंगचित्रं इ. वर्गवारी करून अभ्यासकांच्या विषयानुसार त्यांच्याकडे पोहोचतं करणं हे लॉकडाऊनच्या काळात फारच जिकीरीचं होतं. पण सुवर्णानं ते चोखपणे पार पाडलं. तिच्या ओळखीनं संध्या गवळी, दिपाली चव्हाण, श्रीकांत ढेरंगे, आकाश साबळे, नीलिमा गावडे असे तरुण अभ्यासू संशोधक साऱ्याजणीच्या परिवारात सामील झाले याचा खूप आनंद आहे. इथून पुढंही ते साऱ्याजणीशी जोडलेले राहतील असा विश्वास वाटतो, यांच्याबरोबरीनं साऱ्याजणी परिवारातल्या मित्रमैत्रिणी सरिता आवाड, सुनीता भागवत, वंदना पलसाने, वसुधा जोशी, वैशाली जोशी, अमरनाथ सिंग, दीपाली जंगम, शीतल साठे यांनीही अतिशय परिश्रमपूर्वक काम करून सविस्तर टिपणं काढून चिकित्सकपणे विश्लेषण करून दिलं. भारती पांडे, निलिमा बोरवणकर, प्रमोदिनी वडके-कवळे या तिन्ही प्रथित यश लेखिकांनी साऱ्याजणीतल्या कथांचा सखोल अभ्यास करून चिकीत्सक आढावा घेतला. त्या अभ्यासाचा संदर्भ घेत प्रा. डॉ. रेखा इनामदार साने यांनी लेख लिहून दिला.

जागतिकीकरणाची सुरुवात असणाऱ्या विसाव्या शतकातलं महत्त्वाचं शेवटचं दशक आणि एकविसाव्या शतकातल्या आरंभीच्या दोन दशकांच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि आर्थिक उलथापालथीचा हा कालावधी आहे. या काळातला मैलाचा दगड ठरावा अशा मिळून साऱ्याजणी मासिकाचा चिकित्सक अभ्यास होण्याचं समाजशास्त्रीय महत्त्व काय आहे हे प्रा. वैशाली दिवाकर यांच्या टिपणात जरूर वाचा.

या अभ्यासातून खूप मोठ्या प्रमाणावर प्राथमिक पातळीवरचा महाकाय विदा तयार झाला आहे हे सांगताना अभिमान वाटतो. सर्व अभ्यासकांना हॅटस् ऑफ! सक्षम माणूसपणाकडे घेऊन जाणाऱ्या साऱ्याजणीच्या अक्षरवाटा किती दूर-दूर पसरल्या आहेत याची विस्मयचकित करणारी जाणीव अभ्यासकांबरोबर 'साऱ्याजणी'ला पण झाली. या अक्षरवाटा कधी निबिड जंगलं नद्या, आदिवासी पाडे पार करत महाराष्ट्राबाहेर 'खबरलहरिया' पाशी पोचतात. तर कधी अभय-राणी बंगच्या 'निर्माण'मध्ये विसावतात. कधी राजधानी दिल्लीत धडकून तिथल्या 'सहेली' आणि लेखिका संघ बरोबर बातचित करतात तर कधी पार सातासमुद्रापलिकडे अमेरिकेतल्या मैत्रीण आणि लंडनच्या महाराष्ट्र मंडळात जाऊन हितगुज करतात. या अक्षरवाटांचं जाळं महाराष्ट्रभर सर्व जिल्हे व्यापून साऱ्याजणीचे विचारदूत असणाऱ्या गावोगावींच्या प्रतिनीधींच्या सोबतीनं तालुके, गाव-पाडे आपलेसे करतांत. खाच खळग्यांची तमा न बाळगता माणसा-माणसांपर्यंत पोचून संवाद साधण्याचा प्रयत्न करतात, कधी कधी या अक्षरवाटा विचारप्रणाली, विचारसरणी, 'इझम' इ.च्या भुलभुलैय्यात गर-गर फिरताहेत की काय असं वाटेपर्यंत विविध क्षेत्रातल्या, ग्रामीण शहरी, गरीब-श्रीमंत, मध्यमवर्गीय, ज्येष्ठ तरुण, स्त्री-पुरूष, LGBTIQ समुहातल्या मंडळींच्या अनुभवकथनांच्या या अक्षरवाटा भुलभुलैय्याच्या बाहेर पडतात आणि सुरळीतपणे माणूसपणाच्या प्रवासाला मोकळ्या होताना दिसतात. कथा कवितांच्या रम्य प्रदेशात या अक्षरवाटा रेंगाळताना दिसतात. मिळून साऱ्याजणी मासिकाच्या एकतीस वर्षांच्या प्रवासातल्या या सर्वदूर पसरलेल्या अक्षरवाटा विद्या बाळ अध्यासन प्रकल्पामुळे उजळून निघाल्या. आत्मभान, समाजभान आणि माणूसभान जागवणारा साऱ्याजणीचा हा प्रवास रोमांचकारी आहे. या प्रवासात भेटलेली अनंत माणसं, विविध प्रकारचे थांबे, वळणं-वाकणं आणि बरंच काही वाचताना आपणा सर्वांना समृद्ध करणारा अनुभव मिळेल असा विश्वास वाटतो. हा अनुभव मिळणं विद्या बाळ अध्यासन प्रकल्पाला परिमल आणि प्रमोद चौधरी फौडेशननी अर्थसहाय्य केल्यामुळे शक्य झालं. त्याबद्दल पुन्हा एकवार त्यांचे मनापासून आभार. या प्रकल्पासाठी आपला बहुमोल वेळ देऊन परिश्रमपूर्वक सविस्तर अभ्यास आपल्या टिपणातून, लेखनातून सादर केलेल्या सर्व तज्ज्ञ, संशोधक, अभ्यासक तसंच साऱ्याजणीच्या कार्यालयातले सहकारी व हितचिंतकाचेही शतशः आभार या सर्वांच्याच ऋणात राहायला साऱ्याजणीला आवडेल. साऱ्याजणीच्या या अक्षरवाटा धुंडाळायला वेळात वेळ काढून अवश्य या.

*(विद्या बाळ अध्यासन प्रकल्प प्रमुख)*



# मि.सा.ची मैत्री आणि बरंच काही...

सुवर्णा मोरे

माझी पी.एचडी पूर्ण झाली, कामाच्या शोधात होते सोबत कोरोनाचे सावट असल्याने काम मिळणे तसे अवघड वाटत असताना, पुणे विद्यापीठातील सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र यांच्या संपर्कातून 'मिळून साऱ्याजणी'मध्ये काम करण्याची संधी उपलब्ध झाली. सुरुवातीला मनात गोंधळ होता. पुरोगामी वर्तुळातील त्यामध्ये आंबेडकरी चळवळीशी फार जुळवणूक नसलेले, मध्यमवर्गीय, उच्च जातीय स्त्रीवादी चौकटीत फिरणारे अशी मासिकाची आणि मासिक चालविणाऱ्या लोकांविषयी माहिती होती. त्यामुळे आंबेडकरी दृष्टिकोनातून माझी स्वतःची असलेली भूमिका याविषयी माझी गळचेपी होईल का, असे मनात होतेच. समतेच्या लढाईमधील सर्व वाटेकरी यांच्यासोबत संवादी पूल सांभाळत चळवळ राबवायला हवी, अशी माझी भूमिका असल्याने, पाहूया काम करून असाही अनुभव पदरी घेण्याच्या उद्देशाने 'मिळून साऱ्याजणी'च्या 'विद्या बाळ अध्यासन प्रकल्पा'ची समन्वयक म्हणून जबाबदारी घेत गीतालीताई यांच्या सोबत प्रत्यक्ष काम ऑगस्ट २०२० पासून सुरू केले.

गीतालीताई यांना सुरुवातीला स्त्री-अभ्यास केंद्राच्या एका कार्यक्रमा दरम्यान भेटले होते. त्यावेळी त्या तरुण विद्यार्थी यांचे लेखन शोधत आहेत, हे कळाले. 'तू पी.एचडी करते आहेस, तर तुझ्या विषयाला धरून लेख लिहून दे. आपण मि.सा.मध्ये छापूया', असे म्हणाल्या. थोडे कौतुक आणि थोडे आश्चर्य वाटले याकरिता की, एवढी मोठी बाई आपल्यासारख्या नवशिख्या व्यक्तीला देखील संधी देऊ पाहते. त्यामुळे मी त्यांना माझा बौद्ध स्त्रियांवरील लेख २०१५ मध्ये दिला आणि तो छापून देखील आला. यामुळे मिळून साऱ्याजणी सोबत आणि गीतालीताई यांच्या सोबतच्या मैत्रीला तिथूनच खरी सुरुवात झाली असे म्हणू शकतो. विद्या बाळ अध्यासन प्रकल्प देखील आमचा online मोड मधून सुरू झाला. त्यावेळी करोना संकटामुळे प्रत्यक्ष भेटता येत नसे. मग काय गीताली ताई आणि मी फोनवरून प्रकल्पाला धरून संवाद करू लागलो आणि हळूहळू त्यांनी अगदी वाक्य, शब्द कसे आले पाहिजेत हे मी देत गेलेल्या रिपोर्टमधून शिकविले. त्यामुळे माझे लेखन अचूकतेच्या दिशेने होत राहिले. गीतालीताई यांनी खऱ्या अर्थाने लेखन, चर्चा, अगदी सामान्य स्त्रीच्या लेखनाकडे कसे पाहावे याची तोंडओळखच करून दिली असेही म्हणता येईल.

विद्या बाळ अध्यासन प्रकल्पाच्या निमित्ताने गीतालीताई यांच्या सोबत चर्चा होत गेल्या, चर्चेतून लक्षात येऊ लागले की, पूर्वीच्या मि.सा.च्या भूमिकेला अधिक धक्का न लागू देता, आजपर्यंत मिसाच्या परिघात न आलेल्या जातीय समूहांना सामावून घेण्याची भूमिका हळूवार चालू होतीच, २००९ पासून गीताली ताई संपादक झाल्या, तेव्हापासून सर्वसमावेशकतेचा धागा अधिक विस्तारलेला दिसून आला. प्रकल्पाच्या निमित्ताने मिसाचे सामाजिक, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन योगदान अधिक जवळून वाचता आले, चाळता आले. शिवाय अभ्यासक आणि प्राध्यापक वर्ग यांच्या सोबत अधिक बोलता आले, गीतालीताई यांनी संपूर्ण मोकळीक दिली असल्याने अभ्यासक निवडीमध्ये अधिक मिश्र लोकेशनमधील अभ्यासकांचा समावेश मिसा योगदान विश्लेषणात झाला. काही अभ्यासकांना मिसा नव्याने कळाले तर काही जुने असणारे मिसाचे अभ्यासक यांना मि.सा.ची उजळणी करताना मि.सा.च्या व्याप्तीची खोली मोजता आली. यामुळे अभ्यासकांनी मि.सा.च्या योगदानाचे विश्लेषण अधिकाधिक वस्तुनिष्ठ पद्धतीने केले.

'मिळून साऱ्याजणी' अंकाची ३१ वर्षांची सूची करत असताना मिसाच्या कार्याची खरी ओळख होत गेली. 'मिळून साऱ्याजणी' मासिक फक्त विचारांचे आदानप्रदान करणारे मासिक नाही, तर दैनंदिन जगणे आणि त्यामध्ये प्रत्यक्ष जगत असणाऱ्या स्त्रियांशी बोलून त्यांचे बोल मासिकातून शब्दबद्ध करत त्यांच्या खऱ्या प्रश्नांना वाचा फोडणारे आहे. ग्रामीण स्त्रियांमध्ये जाऊन त्यांच्यासोबत गप्पा मारत स्त्रीत्वाच्या चौकटीतील शोषणाला दृश्यता देत त्या शोषणाच्या विरोधातील जागृती त्यांच्यामध्ये निर्माण करून देणे, त्यांचे भौतिक प्रश्न, मानसिक प्रश्न यांना नव्या वाटा दाखवत नव्या आशावादी जगण्याकडे स्त्रियांना पाहायला लावणे, मिळून साऱ्याजणी, सखी मंडळ किंवा नारी समता मंच सोबती साथीदारांना घेऊन महाराष्ट्रातील अनेक भागात पोचणे त्यांच्याशी संवाद करणे. मि.सा. ने लिखित साधना सोबत समाजातील ग्रामीण, शहरी आणि विशेषतः मध्यमवर्गीय स्त्रीशी आपले बोलणे चालू ठेवत, स्त्रीवादी विचार त्यांच्या रोजच्या जगण्यामधून साध्या सोप्या भाषेतून समजावून सांगण्याचा प्रयत्न मि.सा. च्या माध्यमातून विद्याताईंनी सुरू केला त्याला अधिक खतपाणी घालत पुढे नेण्याचे काम गीतालीताई करत आहेत. एका अर्थाने स्त्री, पुरुष आणि ते यांची चळवळ, विचार, चिंतन आणि मनन यातून उभे राहणारे जिवंत असे मासिक.

मिळून साऱ्याजणी मासिकामध्ये अधिक संमिश्र वाचक, लेखक, संपादकीय मंडळ,

ऑफिसमधील कर्मचारी वर्ग असण्याची गरज आहे. उच्च ते मध्यम जातसमूहाचा प्रवेश सुरुवातीपासून आहेच यामध्ये अधिक परिघावरील लोकांचा प्रवेश मिळून 'साऱ्याजणी'ला अधिक व्यापक करू शकतो. परंतु यामुळे पूर्वीचा वाचक तुटण्याची शक्यता उभी राहत असावी का? यामुळे 'मिळून साऱ्याजणी' अजून तरी सांभाळत, चाचपडत परिघावरील लोक, प्रश्न तसेच जातविरोधी चळवळीशी जोडू पाहत आहे. यामुळे अजूनही जातविरोधी चळवळीतील वाचकवर्ग फारसा लाभलेला दिसून येत नाही. याची कारणे पाहता जातविरोधी चळवळीतील विषयांना अधिक खोलात जाऊन समोर आणले नसल्याने अनुबंध तयार झाला नसावा असे वाटते. उदा. खैरलांजी प्रकरण पाहता, स्त्रियांच्या हिंसेचा प्रश्न हाताळताना दलित स्त्रीच्या जातीय हिंसेची तीव्रता मि.सा. खोलात जाऊन दाखवू शकले नाही.

केवळ संपादकाने जातविरोधी चळवळीशी मैत्रभाव ठेवणे पुरेसे नाही असेही वाटते. तिथल्या समूहाशी मिसाच्या माध्यमातून संवाद उभा करण्याची आवश्यकता आहे. कोणत्याही चळवळीचे मुखपत्र नसलेले तरीही मध्यमवर्गीय पुरोगामी, जातीय असा शिक्का हे मासिक अजूनही का टिकवून आहे, याचा विचार अधिक करता आला तर मि.सा.च्या वाटचालीला नवे वळण येऊ शकेल.

*(विद्या बाळ अध्यासन प्रकल्प समन्वयक)*

# विद्याताईंच्या प्रसन्न स्मृतीला प्रेमाचा सलाम!

**गीताली वि. मं.**



३० जानेवारी २०२२ ला विद्या बाळ यांच्या निधनाला दोन वर्ष पूर्ण होणार विद्याताईंच्या कार्याचा आणि व्यक्तिमत्त्वाचा स्मृतीगंध बकुल फुलांच्या गंधाप्रमाणे दिवस जातात तसा जास्त जास्त गहिरा होत जातो. एकीकडे हा स्मृतीगंध दिलासा देणारा असतो. तर दुसरीकडे विरह वेदनेनं अस्वस्थ करणारा असतो. स्मृतिशेष विद्याताईंच्या कार्यकर्तृत्वाची व्यापकता आणि खोली विद्या बाळ अध्यासन प्रकल्पांतर्गत अभ्यास करताना सर्व अभ्यासकांना स्तिमित करणारी वाटली. या सर्व अभ्यासकांची व्यस्तता आणि करोना महामारीच्या डोंगरा एवढ्या अडचणी यामुळे अभ्यासकांकडून लेख मिळवणं म्हणजे संपादकीय तगादा, जिद्द, चिकाटी आणि कौशल्य याची परिक्षाच होती. या सर्व गोष्टी पणाला लावून लेख मिळवण्यात काही सन्माननीय अपवाद वगळता मला यश आलं हे सांगताना हायसं वाटतं आहे.विद्या बाळ अध्यासन प्रकल्पांतर्गत मिळून साऱ्याजणी मासिकाच्या ऑगस्ट १९८९ ते जुलै २०१९ या कालावधीतील अंकातलं साहित्य तीन पातळ्यांवर वाचून त्यांचं चिकित्सकपणे विश्लेषण केलं आहे. त्याचा ५००-६०० पानी दस्तावेज तयार झाला. त्याचा शंभर पानी अहवाल 'साऱ्याजणीच्या अक्षरवाटा'ला आर्थिक सहाय्य करणाऱ्या परिमल आणि प्रमोद चौधरी फाऊंडेशनला सादर करायचा आहे. त्याची एक झलक या अंकात आहे. ही झलक संबंधित व्यक्तींच्या छायाचित्रांसह सर्वसमावेशक करणं म्हणजे जागेअभावी तारेवरची कसरतच होती. सारांशांचे सारांश करताना अनवधानानं काही चुकलं असेल तर अभ्यासकांनी माफ करावं ही विनंती.

हा अभ्यास ही एक दमदार सुरुवात आहे. तो अभ्यास वाचून अनेक तरूण, ज्येष्ठ यांना नवं कल्पनांचं क्षितिज गवसेल अशी आशा वाटते.

या प्रकल्पात सहभागी झालेल्या सर्व अभ्यासक, नारी समता मंच, अक्षरस्पर्श ग्रंथालय, सखी साऱ्याजणी, साथ साथ विवाह अभ्यास मंडळ आणि पुरुष उवाच मधील सर्व कार्यकर्ते, कार्यालयीन सहकारी, हितचिंतक आणि अर्थसहाय्य करणाऱ्या परिमल आणि प्रमोद चौधरी फाऊंडेशन या सर्वांचे मन:पूर्वक आभार!

विद्याताईंच्या स्मृतीला आदरांजली वाहण्याची ही रीत कशी वाटली? जरूर कळवा वाट पाहते आहे.

*(विद्या बाळ अध्यासन प्रकल्प प्रमुख)*

# विद्या बाळ अध्यासन प्रकल्पाचा आर्थिक चेहरा

परिमल चौधरी



मराठीतील अनेक नामवंत मासिकं आणि प्रकाशन संस्था बंद पडत असताना १९८९च्या ऑगस्ट महिन्यात मराठी मासिकांच्या क्षेत्रात 'मिळून साऱ्याजणी' हे नवीन होतकरू मासिक दाखल झाले. हे फक्त मासिक नव्हते, तर तो एक धाडसी प्रयोग होता, एक चैतन्यदायी प्रेरणा, एक लक्षणीय घटना, एक आवाज, आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे बऱ्याच अंशी स्त्रियांच्या मनात रुजलेली चळवळ होती. कारण हे मासिक स्त्रियांशी संबंधित होते. कुटुंब आणि समाजात स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडणारे होते. या स्त्रियांच्या जीवनकथा वेगळ्या होत्या, त्या काही सांगायचा प्रयत्न करत होत्या; पण त्यांचे ऐकणारे कोणी नव्हते, तसेच शोषित वर्गातील जवळपास अदृश्यच म्हणाव्या अशा स्त्रियांना त्यांचे अनुभव मांडायचे होते. अगदी काटेकोर गुणविशेषांच्या दृष्टीने स्त्रीवादी या शीर्षकाखाली मोडणारे हे मासिक कधीच नव्हते; पण स्त्रियांसाठी समानता आणि निःपक्षपाती व्यवस्थेची मागणी करत सामाजिक न्यायाच्या मुद्द्यांसाठी झटणारे होते.

विद्या बाळ नावाच्या एका ध्येयवेड्या स्त्रीच्या ध्यासातून हे मासिक आकाराला आले. संपादक म्हणून विद्याताई मासिकातील स्तंभांमधून लिहिल्या आणि मांडल्या गेलेल्या गोष्टींसाठी ठामपणे उभ्या राहिल्या. गेल्या तीन दशकात या मासिकाने शेकडो वाचक, लेखक, आणि कार्यकर्त्यांचं जाळं निर्माण केलंय, तरुण वर्गाबरोबर नातं जोडलंय, अनेक संवेदनशील पुरुषांना आपल्या कामात सहभागी करून घेतलंय आणि महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील छोट्या छोट्या तालुक्यांमध्ये आपल्या शिलेदारांची फळी निर्माण केलीय. सातासमुद्रापार आपला असा एक खास वाचकवर्ग निर्माण करून, टिकवून ठेवला आहे. विभिन्न संवेदना आणि बौद्धिक जडणघडण असलेल्या सर्व स्तरातील लोकांमध्ये आपल्याबद्दल सातत्याने उत्सुकता आणि रुची कायम ठेवण्यातल्या या मासिकाच्या यशाचेच हे द्योतक आहे. गेल्या काही वर्षात या मासिकाने विविधांगी विषयांवरील लेख, दर्जेदार आशय, मांडणी व डिझाईन अशा सर्व गोष्टींसाठी दिली जाणारी जवळपास ३० पारितोषिके पटकावली आहेत यात काही आश्चर्य नाही.

२०२०मध्ये 'मिळून साऱ्याजणी'च्या इतिहासात दोन महत्त्वपूर्ण घटना घडल्या. प्रदीर्घ काळ आजाराशी लढा देऊन विद्या बाळ यांनी आपली इहलोकीची यात्रा संपविली. याच वर्षी कोविड महामारीने संपूर्ण मानवजातीला विळखा घातला. या दोन्ही घटनांनी मासिकावर खोलवर आघात केला. विद्याताईंच्या मृत्युच्या शोकातून सर्वजण सावरण्याचा प्रयत्न करत होते, तोपर्यंतच हा महामारीचा फेरा आला आणि त्या रेट्यात चार महिन्यांसाठी मासिकाची छपाई बंद ठेवावी लागली. 'साऱ्याजणी'च्या इतिहासात प्रथमच असे काही घडले. अलीकडील गेल्या दशकात मासिकाचे व्यवस्थापन बऱ्यापैकी विकेंद्रित झाले असले, तरी आता online पद्धतीने वेगळ्या प्रकारे आशय मांडणी करावी लागली.आणि मासिकाच्या डिजिटल युगाचा प्रारंभ झाला. डिजिटल माध्यमांची वाढती लोकप्रियता, वाचकांचा घटता वाचन कालावधी, छपाई तंत्राच्या वाढत्या किमती अशा सर्व कारणांमुळे या मानांकित मासिकाचे अस्तित्व अजूनच धोक्यात आले.

याच काळात 'मिळून साऱ्याजणी'तील आशयाचे आणि महाराष्ट्रातील समाजावर या मासिकाच्या झालेल्या प्रभावाचे पद्धतशीर संशोधनात्मक विश्लेषण झालेले नाही, असे जाणवले आणि जर असे मूल्यमापन व्हायचे असेल तर त्यासाठी आत्तापेक्षा दुसरी योग्य वेळ असू शकत नाही, हा विचार पुढे आला. विद्या बाळ यांच्या मृत्यूनंतर मासिकासाठी एका पर्वाचा अस्त झाला आणि त्याचवेळी अधिकाधिक डिजिटल कार्यप्रणालीकडे नेणारा सांधेबदलही सुरू झाला.

विद्याताईंच्या स्मृतीस अभिवादन करण्याचा आणि महाराष्ट्रातील प्रगल्भ, बुद्धिमान वाचकांच्या, मुख्यत्वे स्त्रियांच्या आयुष्यातील त्यांच्या योगदानाचे स्मरण करण्याचा यापेक्षा दुसरा चांगला मार्ग काय असू शकेल? यासाठी संशोधक,पत्रकार, वाचक आणि 'मिळून साऱ्याजणी'चा सुहृद परिवार असं सर्वांनी मिळून पुढाकार घेणं मोलाचं नाही का? आत्तापेक्षा दुसरी सुयोग्य वेळ काय असू शकते?

म्हणूनच, विद्याताईंच्या प्रथम स्मृतिदिनी आम्ही हा 'अध्ययन प्रकल्प' हाती घेण्याचे ठरवले. आणि त्यांचा दुसरा स्मृतिदिन जवळ आलेला असताना प्रकल्प पूर्ण करून हे काम तुमच्या सर्वांकडे सुपूर्द करत आहोत. ही सर्व माहिती आता लवकरच डिजिटल पोर्टलच्या माध्यमातून सर्वांसाठी निःशुल्क उपलब्ध असेल. आम्हाला आशा आहे की, या अध्ययन प्रकल्पामुळे झालेल्या कामाचे खूप चांगल्या प्रकारे जतन होईल आणि भावी पिढ्यातील संशोधक, वाचक आणि विद्यार्थ्यांना त्याचा उपयोग होईल.

मी अशा काही भाग्यवान व्यक्तींमध्ये आहे की, ज्यांनी विद्याताईंचा त्यांच्या धडपडीच्या काळापासूनचा प्रवास बघितलाय. संपादक, पत्रकार, कार्यकर्ता, संग्रहणकार, व्यवस्थापक,

वित्तीय समन्वयक अशा अनेक भूमिका लीलया पेलताना त्यांना बघितलंय. आणि त्यापेक्षा जास्त त्यांचं अत्यंत ऋजू व्यक्तिमत्त्व एकीकडे आपल्या वैचारिक भुमिकेवर ठाम असणाऱ्या विद्याताईंनी वागण्या बोलण्यातला संयत शांतपणा कधी ढळू दिला नाही. हे त्यांचे व्यक्तिमत्व मला अतिशय विलोभनीय वाटायचे, त्याचे एक प्रकारचे अप्रूप वाटायचे. Carol Hanishची 'जे जे खाजगी, ते ते राजकीय' ही उक्ती सार्थपणे जागवण्याचे आणि जगण्याचे कर्तृत्व त्यांच्यात होते.


विद्याताईंशी माझा परिचय झाला आणि 'विद्या बाळ अध्यासन' हा अभ्यास प्रकल्प साकार करण्यात हातभार लावण्याची संधी मला मिळाली, हे माझे खूप मोठे भाग्य आहे असे मी मानते.

***परिमल चौधरी***

*संचालक ,परिमल आणि प्रमोद चौधरी फाऊंडेशन*

*संचालक, प्राज फाऊंडेशन*

*chaudhari.parimal@gmail.com*



निरामयी,
७३, सहवास वसाहत,
पुणे - ४११०५२

सप्रेम नमस्कार,

येणाऱ्या नवीन वर्षात, म्हणजे मार्च १९८९ च्या आसपास, स्त्रियांसाठी एक मासिक सुरू करण्याची माझी योजना आहे. या मासिकाचं स्वरूप काय असेल याची कल्पना देण्यासाठी ही पत्रभेट.

नव्यानं निघणाऱ्या आणि काही काळानं बंद पडणाऱ्या अनेक नियतकालिकांत भर घालणारं आणखी एक मासिक कशासाठी असं तुम्हाला वाटलं तर ते मी समजू शकते. म्हणूनच हे नवं मासिक कुणासाठी, त्याचं वेगळेपण काय याविषयी थोड्या मोकळेपणानं काही बोलावं म्हणते आहे.

या मासिकाचा मुख्य वाचकवर्ग स्त्रियाच असणार. कोणत्या स्त्रिया? तर कालच्यापेक्षा आज आणि आजच्यापेक्षा उद्या केवळ वयानं मोठं होण्यासाठी नाही तर 'वाढण्यासाठी' धडपडणाऱ्या साऱ्या जणी. या साऱ्या जणी आपण बाया आहोत हे नाकारीत नाहीत. त्या जाणिवेत अडकून पडत नाहीत; त्याचा बाऊही करीत नाहीत. उलट, या बाईपणाला ओलांडून, व्यक्ति आणि माणूस म्हणून त्या स्वतःची ओळख करून घेऊ इच्छितात. यांतल्या काही शिकलेल्या असतील तर काही न शिकलेल्या असतील. काही ग्रामीण तर काही शहरी असतील. काही पार गरीब, काही मध्यमवर्गीय, तर काही खूप श्रीमंत असतील. त्या कुठल्याही जाति धर्माच्या असतील. या साऱ्या जणी आणि अर्थातच आपल्या आयुष्यात वेगवेगळ्या नात्यांतून येणाऱ्या स्त्रियांशी बरोबरीचं नातं असण्यातलं मर्म आणि सुख समजू शकणारे पुरुषही, या मासिकाचे वाचक असतील, असा मला विश्वास वाटतो.

या मासिकाच्या संपादनाचंही वैशिष्ट्य असेल. संपादनाचा रोख वाचकांना खूप काही सांगण्यापेक्षा, त्यांना स्वतःला आपल्या मनातलं काही सांगावसं वाटेल याकडे असेल. यासाठी वाचकांना, आपल्या व समाजाच्या जीवनाचा विचार करून बघणाऱ्यांना पण 'लेखक' नसलेल्यांना लिहावंसं वाटेल यासाठी आश्वस्तपण मिळेल आणि भावना-विचारांचं वातावरण तयार होईल असा इथे प्रयत्न राहील. वाचक, लेखक व संपादक यांच्यात समपातळीवरचा संवाद व्हावा, वाढावा अशी जाणीव संपादनात असेल.

घरापासून समाजापर्यंत आणि व्यक्तिपासून ते संघटीत समूहापर्यंत, स्त्रीपुरुषांना आपापल्या जाचक चाकोऱ्यांमधून सोडवणारं, सच्च्या माणूसपणाकडे नेणारं जे जे काही असेल त्याला ह्या व्यासपीठावर जागा आहे. म्हणूनच विकासाच्या बिकट पण अर्थपूर्ण वाटेवरून चालताना आधार देईल अशी माहिती, विश्वास निर्माण करतील असे अनुभव, माणसाच्या जीवनाच्या वास्तवावरची नजर ढळू न देता लिहिलेल्या कथा व कविता, आणि विकासाच्या या वाटेवर पडणाऱ्या लहानमोठ्या पण गुंतागुंतीच्या प्रश्नांची चर्चा करणारे लेख असं सारं या मासिकात असेल. उन्हाचे चटके, सावलीचा उमेद वाढवणारा गारवा आणि उसळत्या कारंज्याचा उत्साह यांसह जीवनाचं दर्शन त्यात असेल. थोडक्यात आपल्या बरोबर कुणीतरी साथीसोबती, स्नेही आहे, ज्याला मनातली शंका किंवा घालमेल सांगता येईल, वाट विचारता येईल, असा विश्वास देणारं दोस्तीची साथ देणारं असं हे मासिक असेल. स्त्रियांपासून सुरवात करून स्त्रीपुरुषांपर्यंत निकोप दृष्टी-वृत्तीन पोचू बघणारं हे मासिक असेल. या प्रयोगात सहभागी व्हायला तुम्हाला आवडेल?

बदल शेवटी एकेका व्यक्तीमध्ये व्हायला हवा. पण ह्या व्यक्तिगत बदलाचं बळ आणि वेग संघटनेमुळं, एकजुटीमुळं आणि चळवळीमुळं वाढतो. या साऱ्यासाठी चळवळीशी नातं ठेवत, अनुभवांच्या आणि त्यांतील भावना-विचारांच्या देवघेवीचे दुवे जोडत आपली अशी एक जागा निर्माण करायला हवी. हे मासिक ही ती जागा बनावी अशी या मासिकाच्या जन्मामागची माझी उत्कट इच्छा आहे.

विद्या बाळ

## सुहृदांशी पत्रभेट

### 'साऱ्याजणी'च्या जन्माची चित्तरकथा

# विद्या बाळ अध्यासन प्रकल्प : समाजशास्त्रीय महत्त्व

## वैशाली दिवाकर



'मिळून साऱ्याजणी' या मासिकाने ३१ वर्ष पूर्ण केली ही अत्यंत अभिमानाची आणि आनंदाची बातमी आहेच. पण त्या बरोबरच समाजाकडे आणि समाजातील प्रक्रियांकडे चिकित्सक नजरेतून बघण्याची परंपरा जी या मासिकाने १९८९ साली सुरू केली आणि त्याच दृष्टिकोनातून गेल्या ३१ वर्षांचा आढावा घेण्याचा प्रयत्न 'मिळून साऱ्याजणी'ने केला, हे अधिक स्तुत्य आहे असे मला वाटते.

आज महाराष्ट्राच्या वाङ्मयीन इतिहासामध्ये या मासिकाने एक विशिष्ट असे स्थान निर्माण केले आहे. ज्या काळात स्त्री पुरुष समानता याकडे काहीतरी नवीन आणि अप्रिय म्हणून बघितले जात होते, आपल्याच जवळच्या पुरुष नातेवाइकांकडे चिकित्सक आणि कधी टीकात्मक बघणे हे खूप वेदनादायी आणि नकोसे वाटत होते, तेव्हा त्याच काळात या मासिकाने मराठी मध्यम वर्गामध्ये स्त्रीपुरुष समानता हा विचार रुजवायला सुरुवात केली. ही नक्कीच कठीण बाब होती. 'बायकांनी बायकांशी साधलेला संवाद' किंवा 'स्त्री पुरुषांनी स्वतःशी नव्याने साधलेला संवाद' खूपसा रुचण्याचा हा काळ नव्हता. स्त्रीवादी स्त्रिया या घर मोडणाऱ्या असतात, अशी धारणा असलेल्या वातावरणात हे मासिक सुरू करणे आणि अनेक सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय स्थित्यंतरामध्ये मासिक सतत ३१ वर्षे टिकवून ठेवणे हे जोखमीचेच काम होते. समाजशास्त्राच्या दृष्टीने विचार करता, सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेमध्ये कधी स्पष्ट बोलत, तर कधी हलक्या कोपरखळ्या मारत नवीन मुद्दे लोकांपर्यंत पोचवत राहणे खूप महत्त्वाचे असते. लोकांच्या धारणांना केंद्रस्थानी ठेवत आणि तरीही त्याचे समर्थन न करता नवीन विचार त्यांच्यापर्यंत पोचवण्याचा आणि मतपरिवर्तन घडवून आणण्याचा 'मिळून साऱ्याजणी'चा हा प्रवास उल्लेखनीय आहे. आणि असे असले तरीही मासिकाच्या वाटचालीमध्ये काही उणिवा राहताहेत का, समाजातील कोणता एखादा गट वगळला जातोय का, सद्यकालीन समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आजच्या तरुणाईला आकर्षित करणारी सदरे सुरू करता येताहेत का याचा सतत ऊहापोह केला पाहिजे, हे मासिकाच्या टीमला सतत भेडसावत राहते ही खूप सकारात्मक बाब आहे.

आज मागे वळून बघताना ह्या मासिकाने काय दिले आणि काय कमी पडले याचा अभ्यास करणे गरजेचे वाटतेय आणि मिळून साऱ्याजणीच्या टीमला या प्रकारचा अभ्यास करावासा वाटतोय हेच या मासिकाचे वेगळेपण आहे, असे मला वाटते. निर्भीडपणे मासिकातल्या त्रुटी काय आहेत ते बघणे, त्या योग्य असतील तर त्या मान्य करून स्वतःकडेच चिकित्सात्मक नजरेने बघणे आणि त्यात त्यानुसार बदल करणे, सतत काळाबरोबर राहणे हे या मासिकाचे खास वैशिष्ट्य राहिलेले आहे.

एखादा समाज समजून घेताना किंवा त्यातील सामाजिक प्रक्रिया समजून घेताना त्या त्या समाजाचा सांस्कृतिक ठेवा खूपच महत्त्वाचा ठरतो. मिळून साऱ्याजणी मासिक आपल्या याच समृद्ध सांस्कृतिक ठेव्याचा भाग म्हणून बघण्याची, त्याची चिकित्सा करण्याची आणि वेळप्रसंगी त्यामध्ये बदल करण्याची आजच्या टप्प्यावर खूपच गरज आहे. एखाद्या मासिकाचा अभ्यास हा बहुतांशी वेळेस त्याच्या वाङ्मयीन आशयाशी जोडला जातो किंवा त्याच्यामधील भाषेचे सौंदर्यशास्त्राच्या दृष्टिकोनातून विवेचन होते. हे नक्कीच महत्वाचे आहे; परंतु एखाद्या साहित्यिक भांडाराचे सामाजिक अंगाने किंवा सामाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अध्ययन होणे तितकेच महत्त्वाचे असते. कोणताही सांस्कृतिक घटक-मग तो चित्रपट असो किंवा पेंटिंग असो किंवा कथा कादंबऱ्या किंवा पाक्षिके/मासिके असोत- ते एका पोकळ अवकाशात जन्माला येत नसून त्या त्या समाजातील सामाजिक, आर्थिक, राजकीय घडामोडींचा भाग म्हणून अस्तित्वात येत असतात. आणि म्हणूनच त्याचे मूल्यमापन करत असताना सामाजिक संदर्भामध्ये केल्यास ते अधिक अर्थपूर्ण होऊ शकते.

'मिळून साऱ्याजणी'च्या या संशोधन प्रकल्पामधे सामाजिक परिवर्तनाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर या मासिकाचे योगदान काय आहे? हे मासिक स्त्री-पुरुष समानतेच्या पलीकडे जाऊन एकूण सामाजिक विषमतेवर भाष्य करते का? कालानुरूप या मासिकामध्ये बदल झालेले दिसतात का? यातील कथा कादंबऱ्या, सदरे, कविता समाजातील विषमतेवर, राजकीय मुद्द्यांवर ठोस भूमिका घेतात का? कथा कादंबऱ्याच्या मार्फत एक आभासात्मक जग निर्माण

करून स्त्री-पुरुष समानतेवर आधारित समाजाचे एक मिथक तयार करतात? या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न या प्रकल्पामध्ये केला आहे.


आज स्त्रीवादी सैद्धान्तिक विवेचनामध्ये आपण खूपच पुढे आलो आहोत. सुरुवातीच्या काळात स्त्री-पुरुष भेद हा नैसर्गिक नसून सामाजिक-सांस्कृतिक आहे. तो जाणीवपूर्वक घडविला आहे, ते समाजातील एक घटीत आहे हेच लोकांपर्यंत पोचवणे गरजेचे होते. मध्यमवर्गामध्ये सुशिक्षित कुटुंबामध्ये देखील लिंगभेद पाळला जातो. अनेक विविध दैनंदिन व्यवहारामध्ये स्त्री पुरुष विषमता रुजवली जाते आणि ती दृढ देखील केली जाते, हे या मासिकाने सामान्य मध्यमवर्गीय स्त्रियांना बघायला शिकवले. आज स्त्रीवादी आकलन लिंगभेदाच्या खूप पुढे जाऊन या घटीतामधील राजकारण तपासून बघत आहे. स्त्री आणि पुरुष या दोन टोकाच्या अस्मितांच्या मध्ये अनेक अस्मिता घडतात आणि त्या सर्वच आपल्याला समजून घ्यायची गरज आहे असे स्त्रीवाद मानतो. स्त्री-पुरुष एक द्वैत म्हणून न बघता लैंगिक अस्मितांचा पूर्ण spectrum किंवा संपूर्ण पट उलगडून बघण्याची गरज आहे, ही स्त्रीवादाची मांडणी 'मिळून साऱ्याजणी'च्या विविध सदरांमधून, कथा-कवितांमधून पुढे येते. या मासिकाचे स्त्रीवादी चळवळीबरोबर असलेले नाते हे देखील खूप महत्त्वाचे आहे. चळवळीमधील व्यक्ती, त्यांचे काम आणि पुढे आलेले मुद्दे याचे संक्षिप्त आणि सम्यक विवेचन हे देखील समाजशास्त्राच्या दृष्टीने अत्यंत गरजेचे आहे. तसेच आज समाज कोणत्या स्थित्यंतरातून जात आहे, त्याचे राजकीय सामाजिक, सांस्कृतिक पडसाद काय आहेत, ज्ञानशाखेच्या पातळीवर होणारे लिंगभावसंवेदनशील अभ्यास, समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून होणारे अभ्यास, सर्वसामान्य वाचकांपर्यंत सोप्या भाषेत पोचवण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम या मासिकाने केल्याने, समाज समजून घेताना या मासिकाचे योगदान अमूल्य आहे. सिद्धान्त आणि अनुभव या दोन पातळ्यांमध्ये समन्वय साधण्याच्या मासिकाच्या प्रयत्नांमुळे त्याचे समाजशास्त्रीय मूल्य वाढत जाते, असे नक्कीच वाटते.

'स्त्री पुरुषांना स्वतःशी नव्याने साधलेला संवाद' यापासून 'ती' 'ते' आणि 'तो' यांचा स्वतःशी आणि परस्परांशी नव्यानं संवाद होण्यासाठी... मासिक नव्हे चळवळ'- हा प्रवास केवळ मासिकाचा प्रवास नसून तो आपला या समाजाविषयीच्या सम्यक आकलनाचा देखीप प्रवास आहे हे लक्षात घेतेले पाहिजे.

***वैशाली दिवाकर***
*समाजशास्त्र विभाग प्रमुख सेंट मिराज महाविद्यालय ,पुणे.*

# 'साऱ्याजणी'च्या जन्माची चित्तरकथा...

साऱ्याजणी प्रकाशित करण्यासाठी निरामय पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टची स्थापना
२४ फेब्रुवारी १९८७ मध्ये झाली.
या ट्रस्टचे संस्थापक विश्वस्त विविध क्षेत्रातले मान्यवर होते.



**सत्यरंजन साठे**
कायदेतज्ञ



**मीरा बापट**
आतंरराष्ट्रीय पातळीवर काम करणाऱ्या वास्तु विशारद



**विद्या बाळ**
कार्यकारी संस्थापक विश्वस्त



**जया मोडक**
निवृत्त शिक्षणाधिकारी आणि किशोर मित्रच्या प्रमुख



**शोभा भागवत**
बाल भवनच्या संचालक आणि लेखिका

# 'साऱ्याजणी'चे महाराष्ट्रभर आणि महाराष्ट्राबाहेरही विखुरलेले विचारदूत

## शमा सुबोध



विद्या बाळ अध्यासन प्रकल्पाअंतर्गत 'मिळून साऱ्याजणी'च्या देशभरात विखुरलेल्या सर्व प्रतिनिधींची माहिती जमा करणे, त्यांच्याशी बोलून यांच्या कामाचा आढावा घेणे, 'मिळून साऱ्याजणी'ला पूरक काम त्या त्यांच्या गावात कशा पद्धतीने करत आहेत हे परत एकदा नव्याने माहित करून घेणे, तो डाटा गोळा करून त्याचे नीट डॉक्युमेंटेशन करणे, हे गीतालीताईंनी माझ्यावर विश्वासाने सोपवलेले काम. कामाला सुरुवात करतानाच या कामाचा आवाका लक्षात आला होता. टाईम स्पॅन त्या मानाने फार कमी होता. पण लॉकडाऊनचा फायदा झाला. वेळ मिळाला, मि.सा. प्रतिनिधींनाही आपली विविध स्तरांवरील अनेक वर्षांपासून करत असलेली कामे नीट डॉक्युमेंटेशन करून मांडता आली. ई-साधने, ई-सुविधा, ई-माध्यमेही मदतीला धावून आली. गीताली ताईंच्या बरोबरीनेच दीपा देशमुखसारखी मि.सा. प्रतिनिधींमधली एक मैत्रीण मदतीला होती, कडक टिप्पणी करून या कार्यक्रमाच्या दर्जावर या दोघी बारीक लक्ष ठेवून होत्या. या उपक्रमातील काही विशेष मुलाखतीही दीपाने तिच्या सहजसुंदर शैलीत घेतल्यात.

मि.सा.च्या महाराष्ट्रात ५४ प्रतिनिधी, महाराष्ट्राबाहेर ५ प्रतिनिधी, विदेशात ४ प्रतिनिधी, अशी ही प्रतिनिधींची यादी आपण नेहमीच बघतो. प्रत्येक अंकाचे शेवटचे पान आणि मि.सा. कुटुंबाच्या विस्तारित कुटुंबाचा मुख्य घटक असलेल्या या ६०-६५ प्रतिनिधींची ई-भेट घेणे, त्यांच्या कामाचा आवाका जाणून घेणे, त्यांना ई-मुलाखतीद्वारे सगळ्यांना भेटवणे, हे सर्व ई सुविधांनी आणखी सोपे केले. चांगुलपणाची चळवळ, ज्ञानेश्वर मुळे, प्रणोती शितोळे आणि त्यांच्या टीमचे सहकार्य 'मिळून साऱ्याजणी'ला मिळाले आणि बघताबघता ४० प्रतिनिधींच्या मुलाखती गीतालीताईंच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत महत्त्वाचे ई रेकॉर्ड होऊन मि.सा. यूट्युब चॅनेल आणि मि.सा. फेसबुक पेजवर झळकल्या.

या मैत्रिणींमध्ये संपूर्ण महाराष्ट्रातील अनेक नामवंत प्राध्यापक, पत्रकार, डॉक्टर (मेडिकल प्रॅक्टिशनर), वकील, साहित्यिक लेखक ते अगदी तळागाळात जाऊन काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या आणि प्राथमिक शिक्षकसुद्धा समाविष्ट आहेत. या मालिकेतील २० ई-मुलाखती अजूनही घ्यायच्या आहेत.. त्यासुद्धा लवकरच पूर्ण होऊन मि.सा. यूट्युब आणि मि.सा. फेसबुक पेजवर आपल्याला बघायला मिळतील.

या सर्व मि.सा. प्रतिनिधींमधल्या मैत्रिणी या त्यांच्या भागातील विविध क्षेत्रात नानाविध कामांमध्ये स्वतःला सिद्ध केलेल्या होत्या. या मैत्रिणींमधील कुणी तरुण विद्यार्थ्यांमध्ये, महाविद्यालयीन, विद्यापीठ स्तरावर, त्या प्रदेशातील मुलींसाठी भरीव कामगिरी केली आहे, मागास भागात आवश्यक ते पूरक संशोधन केले आहे, कुणी आपल्या साहित्यिक माध्यमातून लेखन, कविता, नाटक सादर करीत आपल्या दुर्गम भागात समाजप्रबोधन, जनजागृतीचा वसा घेतला आहे; तर कुणी आरोग्यक्षेत्रात बालके आणि महिलासाठी झटते आहे, कुणी आपल्या भागातील शालेय स्तरावरील, प्राथमिक स्तरावरील मुलांच्या उन्नतीसाठी झोकून दिले आहे, कुणी वाचन संस्काराचा वसा घेऊन काम करीत आहेत, तर काही जणी बचत गट, लघुउद्योजक घडवत आहेत, जे त्या भागातील अर्थव्यवस्थेचा मजबूत आधार आहेत. अगदी अंबेजोगाई ते चंद्रपूर आणि कोकणसारखे निर्सगसमृद्ध; पण मोठ्या शहरापासून दूर प्राथमिक सुविधांच्यासुद्धा वानवा असलेल्या महाराष्ट्राच्या अंतर्गत भागापर्यंत महिलांमध्ये राजकीय, सामाजिक, आर्थिक, मानसिक, आरोग्य विषयक जागरूकता आणणारी कामे करणाऱ्या

प्रतिनिधी या खऱ्या अर्थाने 'मिळून साऱ्याजणी'च्या विचारदूत म्हणून अनेक वर्षांपासून काम करत आहेत.

महाराष्ट्रातील लहानलहान खेडी तालुके, शहरे इथवर याच मैत्रिणींच्या माध्यमातून विद्याताई आणि गीतालीताईसुद्धा पोहोचू शकल्यात. या साऱ्या मैत्रिणी 'मिळून साऱ्याजणी'चा विचार पोहोचवतांना, त्यांनी महाराष्ट्रातील कुपोषणाच्या प्रश्नावर, बाल विवाहाच्या समस्येवर, बालकांचे लैंगिक शोषणाच्या विरोधात, मुलींचे शाळा गळतीचे प्रमाण, वसतीगृहातील विद्यार्थीनींच्या समस्या, ऊसतोड कामगारांच्या प्रश्नावर, प्राथमिक शिक्षण सुविधांसाठी सामाजिक स्तरावर, पालक शाळा घेऊन कुटुंबस्तरांवर, तर शहरांमधून अक्राळविक्राळ स्वरूपात वाढणाऱ्या कचरा प्रश्नावर, घटस्फोटाच्या समस्येवर, ज्येष्ठांच्या लिव्ह इन संबंधात, जागृती घडवत विविध स्तरांवर अभ्यास आणि संशोधन केले आहे एकंदरच संपूर्ण

महाराष्ट्रातील महिलांच्या मानसिक, आरोग्य, आर्थिक सामाजिक, पैलूंवर संशोधन केले आहे. त्यावर पुरेसी जागरूकता निर्माण करण्यासाठी या मैत्रिणींनी हे संशोधन अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय परिषदांमधून मांडले आहे. आपल्या भागातील महिलांना अनेक अभावग्रस्त परिस्थितीतून, अगदी दुष्काळ, नापिकीमुळे, सामाजिक आर्थिक राजकीय समस्यांमधून मार्ग काढण्यासाठी या मैत्रिणींनी मदत केली आहे. आपल्या प्रदेशांतील निमशहरी ग्रामीण मानसिकतेतूनही स्त्रियांना प्रगतीचे मार्ग त्यांनी दाखवून दिले.

सुप्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ अर्मत्य सेन म्हणतात, जगातल्या सगळ्या विषमतेच्या तळाशी लिंग-विषमता आहे. तीच दूर करायला निघालेल्या विद्याताईंच्या प्रवासात, सहभागी झालेल्या या मैत्रिणी-विचारदूत आज महाराष्ट्रातील प्रत्येक गावात, तालुक्यात आणि शहरात, शांतपणे- समंजसपणे, वेळप्रसंगी कणखरपणे, प्रखरपणे काम करीत आहेत. आपल्याबरोबर अनेकांना सामावून घेत सजगतेने काम करीत आहेत. या मैत्रिणी आपल्या भागातील स्त्रियांसाठी एका अर्थाने माईलस्टोन ठरल्या आहेत.

*shamasubodh@yahoo.com*

हे विचारदूत म्हणजे साऱ्याजणीचं विस्तारित कुटुंबच आहे. हे सर्वजण विना मानधन काम करतात. 'साऱ्याजणी'चा विस्तार अधिकाधिक गावपाड्यावर पोहोचण्याची गरज आहे. त्यासाठी तालुका-पाडा पातळ्यांवर प्रतिनिधी हवे आहेत. इच्छुकांनी ९८२२७४६६६३ या नंबरवर संपर्क करावा.

# माणूस आणि मासिक : महाराष्ट्राबाहेरून बघताना

## विनीता बाळ



मिळून साऱ्याजणी मासिकाच्या संस्थापक संपादक विद्या बाळ यांनी मराठी सजग वाचकवर्गात आणि कार्यकर्त्यांच्या जगात या मासिकाला एक भक्कम स्थान निर्माण करून दिल. विद्याताईंच्या हयातीतच आणि आता अर्थातच त्यांच्या निधनानंतर गीताली ती धुरा पुढे चालवत आहेत. विद्याताईंची मुलगी, याचबरोबर महाराष्ट्राबाहेर, दिल्लीत, राहून साऱ्याजणीच्या संपर्कात राहिलेल्या एका वाचकाच्या आणि हितचिंतकाच्या भूमिकेतून, मासिकाच्या भूतकाळाकडे माझ्या अनुभवातून पाहणारं हे टिपण आहे. भविष्याविषयी सुद्धा थोडा विचार यात येतो.

माणसांना भेटणे आणि माणसे जोडणे हे विद्याताईंनी आयुष्यभर केले. मिळून साऱ्याजणीचा संकल्प सोडला त्यापूर्वीपासूनच हा त्यांचा स्वभाव होता त्याचा नव्या प्रकल्पाला खूपच उपयोग झाला. स्त्री मासिकाची जबाबदारी वाढली त्यावेळेपासून पुण्या मुंबई पलीकडे महाराष्ट्रात अनेक ठिकाणी प्रवास करणे, त्या निमित्ताने नवी माणसं भेटणे आणि ती जोडणे हे त्यांनी, जोवर तब्येतीला झेपलं, तोपर्यंत चालू ठेवलं होतं. या गुणविशेषांमुळे केवळ माणसांशीच नव्हे तर अनेक संघटनांशी सुद्धा विद्याताईंची जवळीक राहिली. मिळून साऱ्याजणी मध्ये लिहिलेल्या संवादातून किंवा त्याहीपलीकडे अशा संस्थांच्या करून दिलेल्या परिचयातून महाराष्ट्राबाहेर काम करणाऱ्यांची ओळख मिळून साऱ्याजणींच्या वाचकांना होत राहिली आणि थोडाफार 'वसुधैव कुटुंबकम्' चा अनुभव येत राहिला. १९८९ साली मिळून साऱ्याजणी सुरु झालं तेव्हापासून मी ते वाचत आले आहे आणि १९८९ ते २०१६ एव्हढा त्यातला काळ मी पुण्याबाहेर, मुख्यत्वे दिल्लीत, घालवला. लांब राहिल्यामुळे मला परिचित न राहिलेल्या शहरी आणि ग्रामीण महाराष्ट्राची आणि महाराष्ट्राबाहेरच्या उपक्रमांची मला या वाचनातून झलक मिळत राहिली.

भारतातील स्त्री चळवळीचा ८०च्या दशकापासून किमान २०-२५ वर्षे भाग असलेल्या स्वायत्त संस्थांच्या परिषदांना आवर्जून विद्याताई हजर राहात. त्याच प्रमाणे गेली कित्येक वर्षे इंडियन असोसिएशन ऑफ वूमेन्स स्टडीजच्या वतीने दर दोन वर्षांनी परिषदा होत आल्या आहेत, त्यातही विद्याताई अनेकदा सहभागी झाल्या होत्या. स्त्री चळवळीच्या गाभ्याच्या विषयांपलीकडेही त्या पोचल्या होत्या आणि असे विषय साऱ्याजणीच्या वाचक वर्गापर्यंत पोचवण्याची पत्रकारी धडपड

सतत चालू असायची.

काही ना काही कारणांमुळे स्त्रीवादी स्वायत्त संस्थांच्या परिषदा घडेनाशा झाल्या. पण फेमिनिस्ट्सइंडिया नावाच्या इ-ग्रुप मधल्या स्त्रीवादी सख्यांनी २०१२ साली हैद्राबादला २-३ दिवसांची बैठक घेतली त्याही वेळी त्या उत्साहाने हजर राहिल्या होत्या. त्या परिषदेला आम्ही बरोबरीनी हजर राहिलो होतो. माझी आठवण बरोबर असेल तर त्या संमेलनाचा अहवालही त्यांनी लिहिला होता. असंच एकदा चित्रकूट मधून सुरु झालेल्या आणि सक्षम महिला पत्रकारांनी चालवलेल्या खबर लहरीया या मुखपत्राची ओळख साऱ्याजणींना प्रत्यक्ष भेटीनंतर करून दिली होती. भारतातील पहिली स्त्रीवादी प्रकाशन संस्था 'काली फॉर वूमेन' याच्या संस्थापकांची आणि त्यांच्या कामाची ओळख पण साऱ्याजणीच्या वाचकांच्या लक्षात असेल.

दिल्लीतल्या सहेली या स्वायत्त स्त्रीवादी संस्थेशीही त्यांचे अनेक वर्ष संबंध होते. कृती नावाची कार्यशाळा दिल्लीत ८०च्या दशकात झाली होती. त्यात कल्पना मेहता हिचा  पुढाकार होता. कल्पना सहेली या संस्थेच्या संस्थापक सदस्यांपैकी एक होती. त्यावेळी संस्थेशी जुळलेले संबंध पुढे ९०च्या दशकात पुनः ताजे झाले त्याचं एक कारण म्हणजे मी सहेली मध्ये काम करायला सुरवात केली. पण दिल्लीतल्या इतर संस्थांशी आणि व्यक्तींशीही विद्याताई वैयक्तिक पातळीवर संबंध ठेवत असत. त्यात रितू मेनन, पामेला फिलिपोस, गौरी चौधरी, कमला भसीन या आणि अशा स्त्री चळवळीतल्या मैत्रिणी/ सहकारी होत्या. सहेलीचा पंचवीसावा वाढदिवस ९ ऑगस्ट २००६ या दिवशी मोठ्या प्रमाणावर साजरा झाला. भारतभरातून अनेक सख्या त्यासाठी खास दिल्लीला आल्या होत्या त्यात विद्याताईंनी ही हजेरी लावली होती आणि उत्साहाने कार्यक्रमात भाग घेतला होता. सहेलीमधल्या सख्यांना साऱ्याजणी मासिक अजिबात खंड पडू न देता चालवत ठेवणं, चांगला दर्जा राखणं, सुरेख मुखपृष्ठ छापणं याचं फारच कौतुक होतं /आहे. त्याचं एक कारण म्हणजे सहेली संस्थेला आपलं न्यूजलेटर वर्षातून तीन वेळा नियमानं हिंदी आणि इंग्रजीतून काढणं हे खूपच अवघड वाटतं आणि त्यामुळे दर काही वर्षांनी त्यात खंड पडतो! विद्याताईंच्या दिल्ली भेटीत अशा विषयांवरही चर्चा घडत. पण या चर्चातूनच एक नवा उपक्रम साऱ्याजणींनी करू पाहिला. वर्षातून काही ठराविक अंक मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतून काढावे असा तो उपक्रम. २०१४ सालचा मार्च विशेषांक या प्रकारानी काढला गेला - त्यात तीन भाषात कथा, कविता, लेख छापले होते. दिल्लीत या अंकाचं प्रकाशन झालं आणि या कार्यक्रमाला वनिता समाजबरोबरच सहेली संस्थेने एक प्रायोजक म्हणून हातभार लावला. पुण्याहून त्यासाठी गीताली, उत्पल, पूनम, मानसी आणि विद्याताई हजर होत्या. साधना दधिच याही पुण्याहून दिल्लीला खास आल्या होत्या. दुर्दैवानी हा महाराष्ट्राबाहेर पोचायचा महत्वाकांक्षी प्रयोग अल्पायुषी ठरला. साऱ्याजणीला निराळ्या पातळीवर पोचवायचा हा प्रयत्न होता, त्यात संपादक मंडळाची झेप घेण्याची इच्छा दिसली होती. त्यावेळी अयशस्वी झालेला हा प्रयोग आता मिसा-ऑनलाईन या प्रकारात स्थिरावू लागला आहे. विद्याताईंच्या निधनापूर्वीच या ताज्या दमाच्या, नव्या जगाबरोबर राहण्याचा प्रयत्न करणाऱ्या उपक्रमाची सुरवात झाली होती. कोविड महामारीमुळे आपल्याला सगळ्यांनाच प्रदीर्घ लॉकडाऊनला सामोरं जावं लागलं आहे त्या पार्श्वभूमीवर या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित करण्याची फारच गरज आहे.

वर उल्लेख केलेला एक मुद्दा म्हणजे साऱ्याजणी मासिकाने अंकात स्त्री-पुरुष समानतेवर भर देणाऱ्या मजकुरापलीकडे समलैंगिकतेला आधार, जागतिक शांततेच्या बाजूने उभे राहणे, जातीयतेला विरोध, धर्मांधतेला विरोध, अंधश्रद्धेला विरोध अशा अनेक फळ्यांवर सक्षमतेने लेखणी चालवली. यापलीकडे प्रफुल बिडवई आणि अचिन वनायक या दिल्लीतील दोस्त मंडळींच्या प्रभावामुळे साऱ्याजणीने अणुबॉम्ब विरोधातही प्रखर भूमिका घेतली. मासिकाची भूमिका अणुबॉम्बच्या विरोधापुरती मर्यादित, म्हणजे मुख्यत्वे युद्ध आणि संहाराच्या विरोधापुरती मर्यादित असावी, की अणुशक्तीची निर्मिती आणि वापर यासंदर्भात किरणोत्सर्गी अणूंमुळे होणाऱ्या धोक्यांचा विचार करणारी असावी यासारखे मुद्देही साऱ्याजणीत प्रसिद्ध होणाऱ्या लेखांच्या संदर्भात महत्वाचे होते. पण स्त्रीवादाची चौकट असो, त्याबाहेरची चौकट असो, प्रत्येक क्षेत्रातील अभ्यासक माणसांबरोबर चर्चा करून साऱ्याजणीची भूमिका ठरावी असा कायमच प्रयत्न राहिलेला दिसतो.

भूतकाळाला संपूर्णपणे पडद्याआड न ढकलता, त्यातल्या बऱ्या पठड्यांचा पाठपुरावा करत आणि नवे मार्ग चोखाळत चालत राहण्याची जबाबदारी संपादक मंडळ आणि इतर सहायकांवर आहेच. बदलत्या काळात प्रत्यक्ष आणि नेट मार्फत संवाद साधत अधिक उमेदीनी वाटचाल चालू राहावी अशीच अपेक्षा.

*vineetabal@yahoo.com*

# अमेरिकेत 'साऱ्याजणी' : मैत्रिण हॉटलाईन नाही वॉर्मलाईन

सुनिता धुमाळे



सत्तरीच्या दशकात अमेरिकेला आल्यावर अमेरिकेबद्दल वाटणारं कौतुक, कुतूहल आणि अचंबा हे सगळं ओसरल्यावर इथली वास्तवता जाणवायला लागली. हळूहळू इथल्या positive गोष्टींबरोबर negative गोष्टीही दिसायला लागल्या. सर्वात महत्वाचं म्हणजे इथल्या fast paced आयुष्यातल्या वेळेची उणीव, extended family चा अभाव, इथला एकटेपणा. बोलायला आणि ते बोलणं ऐकायला कोणालाही वेळ नसायचा, आणि मला वाटतं या संवादाची माणसाला खूप गरज आहे.

Weekendला इथेही मराठी माणसांचा गोतावळा जमायचा, लोकांच्या गप्पा, धमाल, socialisation चालायचं. पण तरीही काहीजणी गप्पच असायच्या. त्यांचे डोळे काही वेगळंच सांगायचे. तेव्हा वाटायचं आपण ह्यांना बोलकं कसं करू शकतो ? हा प्रश्न माझ्याही मनात तसाच राहून जायचा, उत्तर काही मिळत नव्हतं.

त्याच वेळी सुधाताई (विद्याताई बाळ) अमेरिकेला आली होती. माझ्यात आणि तिच्यात, ' माणसाच्या आयुष्यातली संवादाची गरज ' याच विषयावर खूप बोलणं झालं. अन्न, वस्त्र आणि निवाऱ्याइतकी माणसाला 'संवादाची गरज' आहे. कुठल्याही स्त्रीला तिची स्वतःची ओळख व्हायला हवी, तिला तिची निजखूण पटायला हवी, आणि याकरिता तिला संवादाची गरज आहे. जोवर तिच्या हे ध्यानात येत नाही तोवर तिचं आयुष्य पूर्ण होत नाही, हे सुधाताईंनी मला तिच्या आणि माझ्या संवादातून अतिशय गोड, पण ठामपणे पटवून दिले. लग्न झाल्यापासून २० वर्ष मी सुरेशची बायको, आणि राहुल मुक्ताची आई ह्या ओळखीने तृप्त होते. पण सुधाताईने मला माझीच माझ्याशी नव्याने ओळख करून दिली. आणि आता अमेरिकेतल्या त्या गप्प बसणाऱ्या मराठी मैत्रीणींकरिता आपण काहीतरी pro-actively करायलाच पाहिजे असं मी ठरवलं.

कनेक्टिकट मध्ये राहणाऱ्या मराठी स्त्रियांसाठी मी 'जागरण' सुरु केलं.

फक्त बायकांनी जमायचं, रात्र जागवत मस्त गप्पा मारायच्या आणि स्वतः व्यक्त व्हायचं, स्वतःला मोकळं करायचं ही 'जागरण' मागची कल्पना. सुरवातीला प्रतिसाद जरा थंड होता, पण लवकर साऱ्याजणी जमायला लागल्या. पण ज्यांनी मला बोलकं व्हायला हवं होतं त्या गप्पच होत्या. त्यातून मला जे हवं होतं ते साध्य होईना. त्याच वेळेला मी कनेक्टिकट मधल्या 'स्नेहा' नावाच्या भारतीय महिलांच्या हेल्पलाईन (Hotline) साठी काम करायला लागले होते. पण माझ्या प्रकर्षाने लक्ष्यात आले कि तिथे कधीही मराठी स्त्रीचा फोन आला नाही. इतकंच कशाला पण अमेरिकेतल्या इतर states मध्येही अशा भारतीय महिलांच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या संस्थांमध्ये मराठी स्त्रियांचे कॉल त्या मानाने कमीच येतात. या संस्थांमध्ये मराठी स्त्रिया जात नाहीत कारण तिथे समस्या घेऊन जाणाऱ्यांना फॉर्म भरणं, स्वतःची माहिती देणं सक्तीचं असतं, तिथे तिची privacy रहात नाही. आणि मराठी स्त्रीला आपल्या संसाराची लक्तरं वेशीवर टांगायला आवडत नाही.

पण याचा अर्थ तिला प्रश्न नव्हते का? याचं उत्तर मला MAYTRIN हेल्पलाईन काढल्यावर मिळालं. गेल्या २० वर्षात असंख्य फोन येणं हे त्याचंच उत्तर आहे.

MAYTRIN ही Hotline नाही, ती Warmline आहे.

आपल्यासारख्याच दुसरीशी संवाद साधून आत्मविश्वास वाढायला मदत करणारा मदतीचा हात, आणि जाणणारे मन असणारी ही Warmline आहे. इथे साधलेला संवाद गुप्तच राहतो. इथे नाव, गाव, पत्ता द्यायची गरज नाही. MAYTRIN चं network अमेरिकेभर आहे. Doctors, lawyers आणि social workers मदतीस available आहेत. मी callers ना त्यांचं नाव विचारत नाही. त्यांना योग्य वाटेल त्या वेळेला - २४/७, २४ तास, - त्यांनी बिनधास्त फोन करायचा आणि व्यक्त व्हायचं.

मिळून साऱ्याजणी या मासिकात गेली अनेक वर्ष MAYTRIN चा नंबर प्रसिद्ध होतो. बरेच वेळेला अमेरिकेत आलेल्या मुलीला या अनोळखी नंबरावर फोने करताना त्याचा अर्थ आणि आवांका कळत नाही. जेव्हां भारतातील आई वडील हा नंबर तिला देतात तेव्हां MAYTRIN ची credibility वाढते. त्या भांबावलेल्या अवस्थेत, मराठी आवाज ऐकून तिची खात्री पटते, आणि ती बोलायला लागते.

९० च्या दशकातल्या स्त्रियांचे प्रश्न, आणि आजच्या स्त्रीचे प्रश्न यात फरक पडत चाललेला आहे. तरी प्रश्न हे

आहेतच. काहींची उत्तरं सहज मिळतात, तर काही निरुत्तर करणारे प्रश्न असतात, पण मनमोकळ्या संवादातून मार्ग हा निघतोच. हा २४ वर्षांचा काळ म्हणजे बदलत जाणाऱ्या मानसिकतेचाही आहे, स्त्रीत्वाच्या बदलत जाणाऱ्या कल्पनांचाही आहे, आणि स्त्री म्हणून झुगारून देणाऱ्या बंधनांचाही आहे. म्हणूनच सुरुवातीच्या काळातल्या अगतिक, असहाय्य बाईच्या समस्या वेगळ्या, मधल्या काळातील थेट sexuality लाच आव्हान देणारे प्रश्न वेगळे, आणि आताच्या काळातले So what? Why me? माझं काय चुकलं? च्या चष्म्यातून स्वतःचं समर्थन करू पाहताना बदलेल्या दृष्टिकोनाचे प्रश्न तर अगदीच वेगळे. MAYTRIN ही Help-line स्त्रीच्या वेदनांची, तिच्या हतबल असहाय्यतेची पण त्याही पलीकडे जाऊन तिच्यात होणाऱ्या आत्मभानाची आणि आत्मविश्वासाने आत्मनिर्भरपणे घेतलेल्या स्वतःच्या जबाबदारीची साक्षीदार आहे.

प्रश्न, समस्या खूप आहेत, वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळे आहेत. प्रत्येकीने स्वतःचा निर्णय स्वतःच घ्यायचा असतो, कृतीही स्वतःच करायची असते, पण प्रत्येकी साठी परक्या देशात त्यांना समजून घेऊन ऐकणारी, शांतवणारी, आधार आणि दिलासा देणारी एक MAY-TRIN आहे. या Helpline वर रडवेला, confused आवाजात आलेला पहिला call, काही काळातच आत्मविश्वासाने हसतो तेव्हा मला भरून पावतं. सुधाताई, या सर्वांशी फोनवरून बोलताना, या सर्वांचं मन जपण्याचं भान मला रहावं, आणि तुझा ठामपणा मला आठवावा...

*sunitadhumale@yahoo.com*

---

‘साऱ्याजणी’च्या जन्माची चित्तरकथा...

# कृतज्ञता

‘मिळून साऱ्याजणी’साठी निरामय पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टची स्थापना करून, मी माझ्या नात्याच्या, ओळखीच्या मैत्रीच्या अशा सर्व परिवारातील मंडळींशी पत्रव्यवहार सुरू केला. ठेवीपेक्षा देणगीसाठी आवाहन केलं. आणि आजघडीला गेल्या 2 वर्षात जवळपास पावणेदोनलाख रुपये मी देणगीरुपानं जमवले. यात माझ्यावर लोकांनी विश्वास दाखवला आहे, हाती घेतलेल्या कामाचं महत्त्व ओळखलं आहे. आणि त्यासाठी स्वतःचा शक्य तेवढा हातभारही लावला आहे. या सगळ्यातून हे पैसे तर गोळा झालेच पण माझा धीर वाढला. मासिक चालवण्याची उमेद वाढली म्हणून मला या सर्वांबद्दल प्रचंड कृतज्ञता वाटते.

या रकमेत दूर सोलापूर जिल्ह्यात प्राथमिक शिक्षिकेचं काम करणारी आणि शाळेच्या वतीनं ५० रुपयांची मदत करणारी कन्हेरे बाईंसारखी शिक्षिका आहे. नवरा नामवंत डॉक्टर असला तरी स्वतःच्या कमाईतून देणगी देण्यासाठी थांबून, देणगी देणारी मैत्रिण आहे. एकटीला पैसे देता आले नाहीत तर महाराष्ट्र मंडळात कार्यक्रम करून पैसे जमवून देणाऱ्या मैत्रीणी आहेत असा माणूसकीचा हृद्य अनुभव वानगीदाखल दाखवणारा आहेच, पण आणखी एक विशेष उल्लेख आज मला करायचा आहे.

या कामातून माझ्यां काही चांगल्या नवीन ओळखी झाल्या. सांगलीचे श्री. वि. रा. लिमये हे त्यापैकी एक. आज सत्तरीच्या जवळपासच्या वयात असलेले, पदवीधर नसूनही खूप वाचन असलेले हे एक बुद्धिमान आणि बुद्धिवादी गृहस्थ ‘सोसायटी फॉर द राईट टू डाय विथ डिग्निटी’ या संस्थेचे क्रियाशील सदस्य सन्मानाने मरण्याचा हक्क मानणारे आणि तो सर्वांना मिळावा यासाठी प्रयत्नशील असलेले. प्रखर बुद्धिवादी आणि म्हणून काहीसे एकटे पडलेले गृहस्थ. माझ्या कामातून पत्रव्यवहारातून मला लाभलेले एक स्नेही ‘मनाजोगी’ जोडीदार मिळवण्याची संधी मिळाली नाही म्हणून लग्न करायचं राहूनच गेलं असे म्हणणारे श्री. लिमये या गृहस्थांचा स्त्री स्वातंत्र्याच्या चळवळीवर फार विश्वास आहे. त्यांच्या आयुष्यात पहिल्या अग्रक्रमांकाचे महत्त्व सन्मानानं मरण्याच्या हक्काच्या प्रयत्नांना आणि दुसरा अग्रक्रम स्त्री स्वातंत्र्याच्या चळवळीसाठी. त्यांनी मला ‘मिळून साऱ्याजणी’साठी सर्वात मोठी आर्थिक मदत केली आहे. सतत वाचन आणि विचार करणाऱ्या श्री. लिमयांची आणि माझी ओळख झाली, त्यांनी मला देणगी देऊन आर्थिक सहकार्य केलं आहे आणि ते यापुढेही करणार आहेत याबद्दल मला विलक्षण कृतज्ञता वाटते.

सुरुवात केली, तेव्हा जमा शून्य होती! या शुन्याच्या मागे आकडे उभे करून. मासिकाच्या कामाच्या पाठीशी उभ्या राहणाऱ्या या सर्व छोट्या मोठ्या देणगीदारांबद्दल मला अतिशय कृतज्ञता वाटते. कृतज्ञता व्यक्त करण्याची ही संधी हा एक आनंदाचा प्रसंग आहे.

विद्या बाळ

# मिळून साऱ्याजणी म्हणजे...

## मिळून साऱ्याजणी मासिकाच्या सुरुवातीपासून साऱ्याजणीच्या मार्गदर्शक, तत्वज्ञ असणाऱ्या सख्या स्मृतिशेष पुष्पा भावे आणि प्रा. श्यामला वनारसे साऱ्याजणी विषयी म्हणतात...

### पुष्पा भावे



**प्रा. पुष्पा भावे म्हणतात...**

"...मि.सा. हे चळवळीचं व स्त्री अभ्यासाचं मासिक नाही हे खरं, तरी स्त्रीविषयक विचारप्रवाहात घडणारे बदल, भारतीय स्त्री विश्वात होणाऱ्या चर्चा आणि वेगवेगळ्या निमित्ताने जागतिक व्यासपीठावर होणाऱ्या चर्चा मि.सा.ने वाचकांपर्यंत आणण्याचा प्रयत्न केला. कधी या वेगवेगळ्या विचारांचं प्रतिबिंब प्रसिद्ध होणाऱ्या ललित साहित्यांतही उमटलं आहे. वाचकांना भय वाटणार नाही अशा पद्धतीने यात अमूर्त स्त्रीवादी विचार, धर्मचिकित्सा, शांतता विचार, निकोप समाजजीवन, निकोप स्त्री-पुरुष नातं, इतिहासातील व्यक्तींकडे नव्याने पाहणं... पण विषयांची यादी महत्त्वाची नाही. व्यक्ति आणि समाज या दोन्हीत परिवर्तन घडवू पाहणारा दृष्टिकोन यामध्ये आहे. माणसाविषयी अपार करुणाही त्यामागे आहे...!"

*(स्त्रीमिती : निवडक 'मिळून साऱ्याजणी' या पुस्तकाच्या प्रस्तावनेतून)*

---

### श्यामला वनारसे



मिळून साऱ्याजणी : एक अवलोकन

भारतीय समाजातील स्त्री बाबतच्या दृष्टीकोनात एक दुभंग होता. एकीकडे पूजनीय मातृदेवता आणि दुसरीकडे पराधीन अबला. १९७५ सालच्या महिला वर्षात याबाबतीत परिवर्तनाचे पाउल उचलायला गती मिळाली. महिला दशक चालू असतांनाही प्रत्यक्ष परिवर्तनाची लढाई अधिकाधिक कठीण होत असल्याचे समोर येऊ लागले. अशा वेळी परिवर्तनाचे मूळ ज्या आत्मभानात असते त्याची रुजवण घालणारा स्रोत म्हणून या मासिकाकडे बघावे असे मला वाटते.

व्यक्त होणे, स्वत:शी संवाद साधणे, इतरांशी संवाद साधणे, कृती करणे. त्यातून नवे पायंडे पडत जाणे आणि स्वायत्त अस्मिता जागृत होणे हे या संपूर्ण विकासाच्या वाटेवरचे टप्पे आहेत.

आजच्या माध्यमांच्या जगात- विशेषत: आभासी माध्यमांच्या अफाट महासागरात, त्याच्या विस्तारात हे मासिक म्हणजे एक ओहोळ आहे, पण तो इतका मूलगामी विषयांना भिडत राहिला आहे की त्याचा आकार हे त्याचे मोजमाप धरता येत नाही. 'बोलत्या व्हा' इथे सुरू होते. त्यातून आधीची कुंठित बांध बंदिस्ती फुटते- श्वास मोकळा होतो. सतत स्वत:शी आणि वाचकांशी संवाद हे मासिकाचे सूत्र, तर स्त्री-पुरुषांचा स्वत:शी आणि एकमेकांशी संवाद खुला होत राहणे या धोरणाचा व्यवहारात उपयोग करतांना आत्मभानाचे कंगोरे नर-मादी ते स्त्री-पुरुष या आयामावर बघणे आणि स्वत:चे ज्ञानाचे क्षितीज विस्तारत राहणे ही धारा महत्त्वाची आहे. त्याची अनेक अंगे तपासणा-या लेखमाला व्यक्त करत आल्या आ हेत. प्रत्यक्ष बदलाच्या वार्ता देणारे खबर लहरिया किंवा झुंजूमुंजू यासारख्या विविध सदरातून सा-याजणी चा परिवार आहे, आणि 'बायकी' असे संकुचित विश्व उगाळत न बसता सतत क्षितिजाचा विस्तार होत राहील याची काळजी मासिकाने घेतली आहे. आपले विचार-विश्व आणि आपले कृतीविश्व सतत ताजे राहील, परिवर्तनाच्या इतर लढ्याशी जोडलेले राहील असे भान या वाटचालीत विकसित झाले आहे.

मासिकाची जिवंत धुमारे देणारी उपक्रमशील ऊर्जा सखी साऱ्याजणी, साथ-साथ विवाह अभ्यास मंडळ, नारी समता मंच, अक्षरस्पर्श ग्रंथालय, पुरुष उवाच अशा दिशांनी विकसित झाली आहे.

या सर्व उभ्या-आडव्या मिती पाहता मासिक हा व्यवसाय साधायचा की सतत परिवर्तनाच्या विचाराचा धागा विणत पुढे जायचे? या प्रश्नाला धागा विणण्याचे उत्तर मासिकाने दिले आहे, त्याची गोधडीही बनली आहे.

svanarase75@gmail.com

# स्त्री चळवळीच्या सोबतीने साऱ्याजणीची वाटचाल...

छाया दातार



मि.सा.ची स्थापना झाली ती १९८९ साली. १९७५ सालापासून स्त्रीमुक्ती चळवळीची दुसरी लाट सुरू झाली, असे म्हणता येईल. म्हणजेच मि.सा. हे स्त्रीमुक्ती चळवळीचे अपत्य आहे असे दिसते. विद्या बाळ स्त्री मासिकाच्या संपादिका होत्या. आणि तेव्हाही त्यांनी स्त्री मुक्ती चळवळीला दाद देतील असे लेखन केले होते. १९८८ साली मूळ मालक किर्लोस्कर कंपनीने त्यांची तिन्ही नियतकालिके विकली. तेव्हा त्या त्यातून बाहेर पडल्या आणि स्वतःचे स्वतंत्र मासिक काढण्याचा विचार केला. निरामय ट्रस्टची स्थापना व सल्लागार मंडळामध्ये सत्यरंजन साठे यासारखे स्त्रीप्रश्नांच्या सोडवणुकीसाठी संवेदनशील असणारी मंडळी घेऊन 'मिळून साऱ्याजणी' मासिक सुरू झाले. त्यामुळेच ३१ वर्षांच्या कालावधीत 'मिळून साऱ्याजणी'चे स्त्री-चळवळीला योगदान काय? म्हणजेच थोडक्यात शहरी आणि ग्रामीण किती स्त्रियांपर्यंत किंवा लोकांपर्यंत 'मि.सा.' पोचलं? मि.सा.मधून जे लिखाण झाले ते किती परिणामकारक झाले? स्त्री चळवळीच्या दृष्टिकोनाशी किती वाचक जोडले गेले? या दृष्टिकोनामुळे वाचकांच्या जीवनात काही ढवळले गेले का? आजूबाजूच्या घटना, केवळ स्त्रियांच्या जीवनातील नव्हे तर इतरही आर्थिक, सामाजिक, राजकीय घटनांविषयी जाणीव प्रगल्भ झाली का? असे प्रश्न घेऊन हा आढावा घेण्याचे काम माझ्यावर सोपवले आहे. त्याकरता जवळ जवळ १२ व्यक्तींना स्कॉलरशिप देऊन गेल्या ३१ वर्षांतील वेगवेगळ्या विषयांवरील महत्त्वाचे लेखन तपासून ५०० पानांचा अहवाल तयार केला गेला. हे टिपण म्हणजे त्याची छोटीशी ओळख.

विद्याताईंचे मासिक १९८९ पासून नेमस्तपणे चालू होऊन आजपर्यंत उभे आहे. दिवसेंदिवस ते अधिक अधिक स्त्रीवादी होत गेले. मुख्य म्हणजे ते शहरी भागात, तालुक्यांच्या व जिल्ह्यांच्या गावी पोचू लागले. ग्रामीण भागातही विद्याताईंने थोडासा खड्डा पाडला. त्यासाठी चक्क पुण्याजवळील काही गावांमध्ये संडास बांधण्याची योजना हाती घेऊन, महिलांना एकत्र आणण्यासाठी विषय तयार करून, तिचे 'मैतरणी ग मैतरणी' हे सदर सतत अनेक वर्षे चालू होते आणि त्यातून ग्रामीण भागातील महिलांची मानसिकता शोधण्याचा प्रयत्न होता. तसेच, आपले स्त्रीमुक्तीचे विचार छोट्या छोट्या तुकड्याने त्यांच्यापर्यंत पोचवणे हे ध्येय होते. हा दोन बाजूने, देवाणघेवाणीने वाढणारा संवाद होता. विद्याताई त्यामध्ये यशस्वी झाली होती. या महिला त्यांच्या प्रथा, नातेसंबंधांच्या पद्धती, घरातील पुरुषसत्तेमुळे होणारा मानसिक ताण, हे सर्व विद्याताईंपुढे खुले करत होत्या. पुढे जेव्हा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्त्रियांना राखीव जागा मिळाल्या, तेव्हा स्त्रीमुक्तीचा किडा चावलेल्या स्त्रियांना बाहेरील सत्तेला कशी गवसणी घालायची याची चव चाखायला मिळाली असेल.

या ३१ वर्षात काय काय विषय येऊन गेले, ह्याची यादीच उपलब्ध आहे. सहजीवन, समाजशास्त्रीय विषय, राजकारण, सिनेमा, फिल्मविषयक बिंब प्रतिबिंब. पुरोगामी 'जमातवाद', संस्कृती, मोनोपॉज, लठ्ठपणा, वीज, ऊर्जा, घर कुणासाठी, वृद्धत्व, पर्यावरण, वेश्या व्यवसाय, अपंगत्व, कथा विश्व खूप मोठ्या प्रमाणात, त्याचे तीन भाग : १९८९ ते २०००. व २००० ते २००९ आणि २००९ ते २०१९. कर्तृत्ववान स्त्रियांची ओळख तर सातत्याने मि.सा.मध्ये येत असे. स्त्रीभान आणि पुरुषभान हे आणखी दोन विषय दोन अंकासाठी निवडलेले दिसतात. अर्थात, हे विषय २०१२ साली आले होते. या निमित्ताने काही प्रमाणात स्त्रीवादाची सैध्दान्तिक ओळख करून देण्याचा प्रयत्न दिसतो. उदाहरणार्थ, पुष्पा भावे यांच्या लेखाचे शीर्षक आहे, 'आत्मभान, समाजभान आणि विश्वभान'. 'आधुनिकता आणि परिवर्तनवादी चळवळी' या विषयावर यशवंत सुमंत आणि किशोर बेडकीहाळ यांच्या बरोबर चर्चा घडवून आणलेली दिसते. 'स्त्रीवाद आणि लैंगिकतेची चर्चा' हाही असाच टॅबू असलेला विषय, पण ती चर्चा घडवून आणून तिचे रिपोर्ताज प्रसिद्ध करणे, हे मि.सा. प्रगल्भ झाल्याचे लक्षण मानायचे की नाही?

मि.सा. हे साहित्यिक, सामाजिक किंवा वैचारीक मासिक नसून ते एका अर्थाने चळवळीचे मासिक आहे. सामान्य महिलांच्या अनुभवाला स्पर्श करत जाणारे लिखाण येथे आढळते. पण म्हणून स्त्रीवादाच्या संकल्पनाव्यूहांच्या वादविवादात पडण्याची गरज मि.सा.ला वाटली नाही. स्त्रीवादाचे मोठे भिंग वापरून स्त्रियांवरील अन्याय ठळक करणे आणि या अन्यायाला उत्तर शोधण्याचे कोणते मार्ग स्त्रिया अवलंबतात, याचा शोध घेणे असे एकच परिमाण मि.सा. वापरताना दिसते. स्त्रीवादाचे राजकारण इतर अन्यायग्रस्त लोकांपाशी पोचते आणि म्हणून आपल्या वाचकांना ह्या व्यापक आशयाचे भान देणे, याची गरज मि.सा. ला वाटलेली दिसते. दलितांचे प्रश्न, दलित

साहित्य यासंबंधी लिखाण मि.सा.मध्ये उशिरा का होईना आलेले आढळते. 'आम्हीही इतिहास घडविला' या पुस्तकाच्या निमित्ताने ऊर्मिला पवार व मीनाक्षी मून या लेखिकांना बोलावले जाते. तारा भवाळकरांना बोलवून लोकसाहित्याचे सामाजिक महत्त्व ठसविण्याचा प्रयत्न होतो. लक्ष्मण गायकवाड भटक्या विमुक्त जमातींमधील 'सीतायणा'ची माहिती देतात. आदिवासी, भटक्या समुदायातील महिला अशा परिघावरील महिलांचे शोषण अधोरेखित केले जाते; पण त्या केंद्रस्थानी येत नाहीत. २५ डिसेंबर हा मनुस्मृती दहनाचा दिवस. तोच स्त्रीमुक्ती दिन समजला जावा. आठ मार्च हा जागतिक दिन आहे आणि आता तो सरकारी दिवस झाला आहे. अन्यायाविरोधी लढण्याचा दिवस नाही, असे आवाहन दलित स्त्री संघटनांनी केल्यावर त्याची नोंद घेऊन मि.सा.ने स्त्रीमुक्ती परिषद आयोजित करण्यात पुढाकार घेतला होता. आंबेडकरी जलसा व इतर लोककला, त्याबरोबर अनुसया शिंदे यांची गाणी असा दर्जेदार कार्यक्रम घेतला होता. स्त्रीमुक्ती चळवळ ही इतर परिवर्तनवादी चळवळींशी जुळलेली आहे, याचे भान देण्याचे प्रयत्न होत होते. भोपाळच्या सखी मंडळाच्या कार्यक्रमामध्ये पहिल्यांदा व्यासपीठावर सरस्वती पूजनाच्या कार्यक्रमाऐवजी सावित्रीबाई फुले यांचा फोटो ठेवला गेला, हाही याच प्रयत्नांचा भाग.

मि.सा. हे एखाद्या भरजरी वस्त्रासारखे आहे, अनेक कलाकृतींनी विणलेले. त्याचे वर्णन थोडक्यात करणे कठीणच आहे. मि.सा.ला पुढील पिढीनेही आपले म्हणावे आणि आपल्याला हवी तशी त्याची छबी तयार करावी, आणि मि.सा. हा चळवळीचा आरसा व्हावा, हीच सदिच्छा!

***छाया दातार***

*chhaya.datar1944@gmail.com*

●●●




*सुरुवात अंक*
*ऑगस्ट १९८९*

## मुखपृष्ठाविषयी

गोधडी तुकड्या तुकड्यांची मिळून तयार होते उरलेले, नको असलेले, टाकून दिलेले तुकडे, हवेहवेसे वाटणारे आठवणी जपणारे तुकडे. अशा सगळ्या छोट्यामोठ्या तुकड्यांना आपापल्या रंगनिशी पोतानिशी एकमेकांजवळ जोडून घेऊन गोधडी बनवली जाते. सगळे तुकडे एकत्र येऊन तिला एक रंगरूप देतात. आणि मग गोधडी ऊब देणारं पांघरूण म्हणून हवीहवीशी वाटते.
'मिळून साऱ्याजणी'च्या पहिल्या अंकासाठी म्हणूनच गोधडीचं मुखपृष्ठ निवडलं आहे.

## संवाद

# पहिला वहिला संवाद

'मिळून साऱ्याजणी'चा विचार मनात ठेवून गेली अडीचतीन वर्षं धडपड चालू होती. मनातला हा विचार साकार करणारा हा अंक म्हणजे यातलं वाटचालीनं पहिलं पाऊल आहे. तुम्हा सर्वांच्या विश्वासाच्या आधारातंच हे पाऊल टाकलं आहे.

शब्द मग तो छापलेल्या असो की बोललेला असो, तो पोटातून आलेला असेल तर तो केवळ शब्द राहात नाही. त्याचं आतून कृतीशी नातं असतंच. हळुहळू हे नातं सर्वांनाच दिसायला आणि जाणवायला लागतं! गेल्या २०-२५ वर्षातल्या लेखन संपादनातून हाती आलेला हा माझा अनुभव आहे. म्हणूनच स्त्रियांचे ओठाच्या उंबऱ्यात अडखळून थांबलेले शब्द आणि विचार फार महत्त्वाचे ठरतात. पुरातन वस्तुसंशोधनात मातीखाली गाडल्या गेलेल्या अवशेषाचं जे महत्व स्त्रियांच्या या ओठाबाहेर न पडलेल्या उलगडल्याचा प्रयत्न इथे होईल. त्यातूनच कालच्या, आजच्या आणि उद्याच्याही संस्कृतीच्या मानसाचा समाजहितवादी विचार आपल्याला सर्वांनाच करायचा आहे. म्हणून तर, या मासिकाचा पहिला भर स्त्रीवाचकांवर आहेच, तरीपण सर्वच स्त्रीपुरुषांना स्वतःशी नव्यानं संवाद सुरु करायला या मासिकाची निश्चितच मदत होईल.

सगळ्याच स्त्रीपुरुषांना मला हे सांगाचयंच आहे की 'साऱ्या जणींसाठी'हे मासिक आहेच. पण वयाबरोबर होणाऱ्या नैसर्गिक वाढीबरोबरच विकसित होण्याची, डोळस होण्याची गोष्ट स्त्रियांनी जाणीवपूर्वक स्वीकारली तर त्यात पुरुषांनी धसका किंवा शत्रुत्व घेण्यासारखं खरोखरीच काही नाही. फुले, आगरकर, आंबेडकर यांनी आणि आणखी कितिक पुरुषांनी आजच्या या विचारांची पेरणी केली आहे. आम्ही साऱ्या जणी तर त्यांची कृतज्ञतापूर्वक आठवण करतोच आहोत. पण आजच्या पुरुषांनीही त्यांना विसरु नये. शिवाय स्त्रियांच्या या प्रयत्नात, पुरुषांनी आता स्त्रियांच्या पाठीशी राहाण्याऐवजी त्यांच्या बरोबर चालावं. हा फरकही खूप मोठा असेल. आपल्याला सर्वांनाच खऱ्या अर्थानं माणसासारखं चांगलं जीवन जगायचं असेल तर आपल्याला विचारात, घरात आणि सर्व समाजात परिवर्तन घडवून आणायचं आहे. 'मिळून साऱ्याजणी' हा त्यातलाच एक छोटा प्रयत्न आहे.

'साऱ्याजणी'ही शब्द योजना जाणीवपूर्वक आहे. शिक्षण, पैसा, जात आणि धर्म अशा निरनिराळ्या स्तरावर स्त्रिया जगतातं वावरताना दिसत असल्या तरी त्यांच्या मूलभूत प्रश्नांची जात एकच आहे. प्रश्नाचा तपशील आणि रंगरुप बदललं तरी जात एकच आहे. हे समजून घेण्यासाठी त्यांच्यामध्ये अनुभवांची देवघेव व्हायला हवी. या देवघेवीतून हे समानसूत्र त्यांचं त्यांनाच सापडणार आहे. या प्रक्रियेत सिद्धान्तांना अनुभवांची साथसोबत भेटेल आणि अनुभवांना व्यापक विचाराचा आणि अर्थाचा पाया लाभेल.

हे सगळं बोलण्यासाठी, सांगण्यासाठी आम्हाला 'आपली एक' जागा हवी आहे. पत्रकारितेच्या मुख्य प्रवाहात स्त्रिया आणि मुलं यांना एकाच पानावर एकमेकाशेजारी दिलेली जागा 'बोलकी' आहे. स्त्रियांचं बरचंस बोलणं अजूनही बडबड या सदरात घातलं जातं. कुटुंबसंस्थात आल्याचं खापर स्त्रियांच्या डोक्यावर फोडण्यापुरत्या स्त्रिया असतात. पण स्त्रियांचे प्रश्न हे कौटुंबिक आणि सामाजिक पातळीवरचे प्रश्न म्हणून विचारात घेतले जात नाहीत. 'मिळून साऱ्याजणी' मध्ये मनातलं घरातलं, दारातलं कामकाजाच्या वेळातलं असं जे जे काही स्त्रियांना बोलावंसं वाटेल त्यासाठी एक जागा निर्माण करण्याची हा प्रयत्न आहे. जागा तर आहेच वहिवाट करकरून ती आपलीच राहील, आपली सर्वांची होईल अशी काळजी घ्यायला हवी. हे काम आपणच करायचं आहे.

१५ ऑगस्ट हा भारताचा स्वातंत्र्यदिन. स्वराज्याचं सुराज्य करताकरता चाळीस वर्षं उलटून गेली. आणि स्वराज्यात स्त्रियांचा समग्र विचार करण्यासाठी आठवी पंचवार्षिक योजना उजाडावी लागली! भारताच्या स्वातंत्र्याचा आम्हा सर्वांना निश्चितच अभिमान वाटतो. मात्र देशाच्या गुलामगिरीबरोबरच स्त्रियांची गुलामगिरी 'आपोआप' नष्ट होत नाही. हेही आम्हाला कळून चुकलं आहे. आम्ही स्वतंत्र, समृद्ध, विकसित 'माणूस' होवू इच्छितो. हे साधतासाधताच भारताचा खरा विकास होईल, असा आम्हाला विश्वास वाटतो. म्हणूनचं मिळून साऱ्याजणी ची सुरुवात स्वातंत्र्यदिनाच्या महिन्यात होण्यात एक विशेष औचित्य आहे.

हा पहिला अंक तयार करुन तुम्हा सर्वांपर्यंत पोचवतानाचे दिवस, त्यातल्या चढउतारासह 'मंतरलेले दिवस'च आहेत! लोकहितवादी विचाराची, माणसं संख्येनं नेहमीच थोडी असतात. पण या थोड्यामधली पुष्कळ माणसं मला भेटली. त्यामुळे माझी उमेद टिकून आहेच, वाढते आहे. माझ्याजवळ पैशाचं भांडवल कमीच आहे. त्यासाठी झोळी पसरलेली आहेच. पण हे माणसांचं भांडवल हा खरा या साऱ्या धडपडीमागचा मान आहे.

व्यावहारिक अडचणींमुळे मासिक बंद पडतं असताना मी हे नवं मासिक काढते आहे याचं मला पूर्ण भान आहे. पण व्यवहार जसा पैशावर तोलला जातो. तसा तो ग्राहकांच्या गरजेवरही विसंबून असतो. तुमच्यासारख्या 'तयार' ग्राहकांवर आणि नव्या ग्राहकांची 'गरज' तयार होण्याच्या प्रक्रियेवर माझी भिस्त आहे. संवादामधील निरंतर संवादामधील ताकद इथे हात देईलसं वाटतं.

विद्या बाळ

# एकतीस वर्षातले साऱ्याजणीचे साथी - सोबती...

नावातच सहकार, बांधिलकी आणि मैत्रभाव असणाऱ्या मिळून साऱ्याजणी मासिकाच्या व्यवस्थापनात बिनउतरंडीची, विकेंद्रित स्त्रीवादी व्यवस्था आणण्याचा प्रयत्न होता. कामाच्या सोयीसाठी व्यवस्थापकीय व संपादकीय असे दोन विभाग असले तरी ते हवाबंद कप्पे-विभाग नकोत तर सर्वांनी एकत्र मिळून मिसळून, एकदिलानं काम करावं असा आग्रह होता.

हे मासिक ही वस्तू नाही तर विचार आहे. तुम्हा आम्हाला हवा हवासा वाटणारा हा जीवनाश्यक विचारांचा झरा वाहता राहण्यासाठी अनेकांनी मोलाचं योगदान दिलं. त्यातील अपर्णा राजवाडे, सविता दाते, उमा द्रविड, वर्षा कुलकर्णी, सविता फाटक, राहूल पारखी, सुधाकर भावसार, अशा अनेकांशी संपर्क होऊ शकला नाही. सीमा जोशी, मंदाकिनी भारद्वाज आणि पुष्पा रोडे हयात नाहीत. त्यांचे फोटो मिळू शकले नाही. सर्वांची कृतज्ञ आठवण!

## स्मृतिशेष माजी विश्वस्त


रा. प. नेने


सदा डुम्बरे

## संपादकीय विभाग


नयन कुलकर्णी.


प्रभा हर्डीकर


अंजली मुळे


सुषमा विजापूरकर


सुजाता देशमुख


आशा साठे


दिपाली चौधरी


उत्पल व. बा.

## व्यवस्थापकीय विभाग


शरयू गुर्जर


ज्योती बेडेकर


नीलिमा शिकारखाने


सुहासिनी जोशी


सुखदा द्रविड


अनुजा गीताली

## शब्दांच्या पलिकडे आशय पोहोचवणारे कलाकार


श्याम देशपांडे


मेहबूब शेख


गिरिश सहस्त्रबुद्धे


रमाकांत धनोकर


राजू देशपांडे

# मुखपृष्ठं : मासिकाचा आशयघन, बोलका चेहरा

## मिलिंद जोशी



‘मिळून साऱ्याजणी’ मासिकाच्या महत्त्वाच्या मुखपृष्ठांचा ह्या लेखामध्ये आढावा घेतलेला आहे. ‘मिळून साऱ्याजणी’चा मुखपृष्ठाबद्दलचा समग्र दृष्टिकोन, त्यातील प्रवाह, त्या अनुषंगाने तीस वर्षांमधली निवडक, वैविध्यपूर्ण मुखपृष्ठं आणि त्यावरील थोडक्यात भाष्य ह्याचा समावेश आहे.

‘मिळून साऱ्याजणी’चा पहिला अंक ४ ऑगस्ट १९८९ला प्रकाशित झाला. बॅकड्रॉपला एक सुंदर गोधडी लावण्यात आलेली होती. तीच गोधडी मासिकाच्या पहिल्या अंकाच्या मुखपृष्ठावर विराजमान झालेली आहे.

हे पहिलंवहिलं मुखपृष्ठ (पान २१ वर) मला खऱ्या अर्थानं ‘मिळून साऱ्याजणी’चं प्रातिनिधिक मुखपृष्ठ वाटतं. विद्याताईंचा एकूण दृष्टिकोन त्यामध्ये प्रतिबिंबित झाला आहे. विद्याताईंना सौंदर्यदृष्टी होती. कलात्मकतेची आवड होती. प्रतीकात्मकता त्यांना अतिशय प्रिय होती. चळवळीच्या अनेक उपक्रमांमध्ये सकारात्मक प्रतीकांचा वापर त्यांनी अत्यंत सजगपणे आणि कल्पकतेनं नेहमीच केलेला दिसून येईल.

गोधडी ही अनेकरंगी छोट्या तुकड्यांनी बनलेली आहे. बायकांचा छोटासा समूह गोधडी बनवतो. त्या अर्थी ते एक सामूहिक काम आहे आणि विशेषतः ते स्त्रियांचं क्रिएशन आहे. चळवळीसाठी सामूहिकता किती महत्वाची असते, हे वेगळं सांगायची गरज नाही. त्यातल्या घट्ट विणीमध्ये गुंफलेला आहे, सखीभाव. समूहानं बनवलेली ती गोधडी उबदार असतेच पण नुसतीच उबदार नाही; आकर्षक, कलात्मक आणि सुंदरसुद्धा आहे. हे स्त्रियांचं खास वैशिष्ट्य आहे. जगात कितीही कलेचे महान आविष्कार आणि महान पुरुष कलावंत होऊन गेले असले, तरी संस्कृती म्हणून कलेची परंपरा घराघरांमध्ये जतन करणारी आणि नृत्य, ओव्या आणि गाण्यापासून ते रांगोळी, भरतकामसारख्या दृश्यकला, आणि ’फूड कल्चर’ ह्या सर्वांची स्थानिक वैशिष्ट्यं टिकवणं, वाढवणं हे महत्त्वाचं काम पुढे घेऊन जाणारी स्त्रीच असते.

गरिबी असली तरी सौंदर्यदृष्टी जोपासणं, ही संस्कृती आहे आणि ते काम नि:संशयपणे जगभर स्त्रियाच करत आलेल्या आहेत. गोधडीकडं पाहताना लक्षात येईल की, त्यामध्ये हे सारं त्यामध्ये सामावलेलं आहे. शतकानुशतके घराच्या, समाजाच्या चौकटीत बंदिस्त असूनही बाईनं कलात्मकता टिकवली आहे, जगवली आहे. तिला मुक्त अवकाश मिळालं तर ती काय काय करू शकेल ह्याची कल्पना करा!

स्त्री-चळवळीला पुरुषांच्या अनुकरणाची गरज नाही. स्त्रियांच्या स्वतःच्या स्ट्रेंथ्स आहेत. त्यांची मानसिकता, सामूहिकता ही अधिक समजदार आणि घट्ट विणीची आहे. त्यांचं एकत्र येणं सर्जनशील आहे. उपलब्ध असलेल्या कोणत्याही गोष्टींपासून जग सुंदर बनवायची ताकद ह्या एकीमध्ये, चळवळीमध्ये आहे हे विनयानं तरीही ठामपणे सांगणारी गोधडी ही दृश्य कृती आहे. विद्याताईंच्या एकूण स्वभावाशी हे सारं कितीतरी सुसंगत आहे. तीस वर्षांमध्ये ‘मिळून साऱ्याजणी’ मासिकावर, त्याच्या दिशेवर विद्याताईंच्या व्यक्तिमत्त्वाचा जो अमीट ठसा उमटलेला दिसतो, त्याची सुरुवात म्हणून ह्या मुखपृष्ठाकडे नक्कीच पाहता येईल.

आणखी महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सामाजिकतेचा. पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये स्त्रियांच्या बाजूने उभं राहतानादेखील समाजातल्या अंडर प्रिव्हिलेज्ड वर्गाला विद्याताई जास्त महत्त्व देतात. ‘मिळून साऱ्याजणी’चा राजकीय विचार हा कायम डावीकडे झुकलेला आहे. ‘मिळून साऱ्याजणी’नं नेहमीच शोषितांच्या, पीडितांच्या, अन्यायग्रस्तांच्या बाजूनं निःसंदिग्धपणे भूमिका घेतल्या आहेत. त्यामुळं ह्या पहिल्या मुखपृष्ठावर अभिजनवादी कलेला स्थान न मिळता लोककलेला – अर्थात, गोधडीला स्थान मिळालेलं दिसतं.

मुखपृष्ठावर असणारा एक महत्वाचा घटक म्हणजे टॅगलाईन- ‘स्वतःशी नव्यानं संवाद सुरू करणारं मासिक’! ही टॅगलाईन सुरुवातीला होती. हे स्त्रीवादी मासिक असलं तरी त्यातील विचार सर्वांसाठीच होता. पुरुषांना सामावून घेण्यासाठी टॅगलाईन बदलली- ‘स्त्रियांनी आणि पुरुषांनी स्वतःशी आणि परस्परांशी संवाद साधावा यासाठी..’

दरम्यान जेंडर अर्थात, लिंगभाव हा विषय, तसेच एलजीबीटीक्यू समूहाचे प्रश्न ऐरणीवर आले. ‘साऱ्याजणी’ने याही बाबतीत समतेची भूमिका घेऊन आपली टॅगलाईन पुन्हा बदलली- ‘ती’ आणि ‘तो’ यापलीकडचे सर्व ‘ते’ यांचा स्वतःशी आणि परस्परांशी नव्याने संवाद व्हावा यासाठी...

साहजिकच वरील विचारांच्या दिशेने ‘मिळून साऱ्याजणी’ची मुखपृष्ठं वैविध्यपूर्ण, सुंदर, सर्वसमावेशक आणि प्रयोगशील होत गेलेली दिसतात.

***मिलिंद जोशी***

*anupam.milind@gmail.com*

# संवाद : आपुलाची वाद आपणाशी

अनघा तांबे



विद्याताईंनी आणि विद्याताईंबद्दल लिहिलेलं वाचताना, ऐकताना सर्वांना वारंवार जाणवलेली गोष्ट ही की, विद्याताई म्हणजे संवाद, लोकांशी जोडून घेणारा शब्दांचा आंतरिक पूल. ‘मिळून साऱ्याजणी’चं संपादकीय १९८९ पासून ‘संवाद’ या शीर्षकाखाली वाचकांसमोर आलं. तेव्हापासून आत्तापर्यंत तीन दशकं ‘संवाद’ वाचकांबरोबर दुवा सांधत आहे. २००९पर्यंत विद्याताईंनी विणलेला संवादाचा हा धागा आता गीतालीताई पुढे नेत आहेत. चार भिंतींआड गप्प बसवलेल्या, बसलेल्या सामान्य स्त्रियांना बोलतं करण्यासाठी, त्यांच्याशी बोलण्यासाठी ‘मिळून साऱ्याजणी’ सुरू झालं. आणि संवादचा पैसही मि.सा.च्या बदलत जाणाऱ्या टॅगलाइनमधून प्रतीत झाल्याप्रमाणे विस्तारत गेला. संवादामध्ये नेमकं काय आहे? समोरच्याची बैठक समजून घेऊन आपले म्हणणे मांडण्याचा खुलेपणा, लवचिकता आहे, मृदूपणा आहे. संवाद विचारांचा आहे, तसाच भावनांचाही आहे. विद्याताईंच्या आणि गीतालीताईंच्या संवादमध्ये भावनांचा मोठा पल्ला आहे. त्यामध्ये वाचकांना समजावून सांगणं आहे, त्यांच्याबद्दल कौतुक, विश्वास, काळजी, मदत, प्रोत्साहन आहे, त्याचबरोबर रागावणंही आहे, विषाद, नाराजी, निषेध, क्लेश, अस्वस्थता आहे, अगदी चूक कबूल करणेही आहे. आणि त्या कशाच्याही आड न लपता या साऱ्या भावना मोकळेपणे व्यक्त करतात. सर्वात महत्त्वाचं म्हणजे संवादमध्ये आपल्यापेक्षा वेगळं, भिन्न असणाऱ्यांना बाजूला न सारता, भिन्नत्वाची दखल घेऊन त्यांच्याशी जोडणं आहे. संवादमधून या दोघींनी केवळ आपल्यासारखा विचार करणाऱ्यांशी बोलायचे टाळून सर्वसामान्यांपर्यंत पोचण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचं संपादकीय हे वाचकांशी खऱ्या अर्थाने साधलेला संवाद आहे.

मि.सा. आणि संवादची सुरुवात झाली, तो काळ भारतासाठी स्थित्यंतराचा काळ होता. १९९०चे दशक मंडल-मस्जिद- वर्ल्ड बँकेचे होते. या काळात समाजाच्या घडणीमध्ये, दैनंदिन जगण्यामध्ये, लोकांच्या विचार करण्याच्या, वागण्याच्या पोतामध्ये प्रचंड उलथापालथ झाली. हे विद्याताई संवाद साधत होत्या. गेल्या तीन दशकांच्या संवादचे वाचन केल्यावर आपल्याला संपादकांच्या दोन ठळक आस्था दिसून येतात. एक म्हणजे, रूढार्थाने ज्याला स्त्री-पुरुष समतेचा विचार म्हणता येईल त्याच्याशी मध्यमवर्गीय वाचकांना भिडायला लावणे, चिंतन करायला लावणे. आणि दुसरी, आपल्याच कोषात रमणाऱ्या स्थितिशील मध्यमवर्गीयांना सामाजिक परिवर्तनाच्या लढ्याशी एका ढोबळ अर्थाने जोडून घेणे.

मि.सा.साठी परिवर्तनाचा प्राथमिक घटक म्हणजे घर, कुटुंब. हे खाजगी आणि खास स्त्रियांचे असे मानले गेलेले क्षेत्र आहे. मात्र, स्त्रियांसाठी तो एकाचवेळी जिव्हाळा व प्रेमाचा, आणि दडपणुकीचाही अवकाश आहे. १९७०च्या दशकाअखेरीस भारतातील स्त्री चळवळीने ‘जे जे खाजगी, ते ते राजकीय’ हा नारा देत प्रेमाच्या आवरणाखाली दडवलेल्या कुटुंबामधील पितृसत्ताक वर्चस्वावर हल्ला चढवला. हुंडा, सती, पोटगी, कौटुंबिक हिंसा, धोकादायक गर्भनिरोधके, वारसाहक्कातील वंचितता, विनावेतनाच्या घरकामाचे जोखड अशा पितृसत्ताक व्यवहारांविरोधात आंदोलने केली. स्त्रियांना कुटुंबामध्ये अडकवणाऱ्या इज्जत, कुलीनता, आईपणा, गृहिणीपद अशा साच्यांना नकार देऊन घरफोड्या असा शिक्काही झेलला. संवादमधून पुन्हा पुन्हा कुटुंबातील हे सत्तेचे राजकारण आणि त्यातील स्त्रियांचे दमन उकलून दाखवले गेले आहे. मि.सा.चा वाचकवर्ग, १९९०मधला नवउदारमतवादी मध्यमवर्ग एका मर्यादित अर्थाने स्त्री-पुरुष समानता मानणारा गट होता. बाह्य जगात, शिक्षणाच्या आणि सार्वजनिक क्षेत्रात स्त्रियांना समान संधी दिल्या पाहिजेत, असे सांगणारा; किंबहुना स्त्रियांना दृश्यता देणारा हा वर्ग होता. मात्र, कुटुंबाच्या आंतरिक जगामध्ये, तसेच धर्म आणि संस्कृतीमध्ये स्त्री-पुरुष समतेच्या दृष्टीने मूलभूत बदल आणण्यामध्ये हा वर्ग कचरत होता. कुटुंब ही मध्यमवर्गाची व्यक्तिगत, बाहेरच्या हस्तक्षेपापासून जपून ठेवण्याची, प्रेमाने साजरे करण्याची बाब आहे, असे मानणारा हा वर्ग होता. त्यामुळेच ‘संवाद’मधून सातत्याने कुटुंब, लग्न, संसार, आईपण यामध्ये स्त्रियांच्या वाट्याला आलेला एकाकीपणा, तडजोडीची सक्ती, हिंसा, आर्थिक वंचितता, पुरुषांवरचे अवलंबन स्पष्टपणे दाखवून दिले गेले. स्त्रियांची

ओळख घरातल्या पुरुषांवरूनच बनवली जाते, आणि म्हणूनच 'पुरुषांशिवाय'च्या स्त्रियांप्रती, विधवा, परित्यक्ता, एकट्या, मूल नसलेल्या स्त्रियांप्रती समाजात हीनभाव असतो. स्त्रियाही अशा पूर्वग्रहातून सुटत नाहीत. 'संवाद'ने पितृसत्तेच्या नेहमीच्या, सर्वसामान्य अशा व्यवहारांवर बोट ठेवून नैसर्गिक, नॉर्मल वाटणारे, पण स्त्रीचे माणूसपण हिरावून घेणारे पितृसत्तेचे रूप उघड केले. कुटुंबामध्ये सुधारणा आणण्यासाठी पुरुषांना आपल्या संवादाच्या कक्षेत आणले. घरकामात आणि घराला समतादायी रूप देण्यात पुरुषांना मदत करायला, सहभागी व्हायला आवाहन केले. पितृसत्तेमध्ये पुरुषांची होणारी घुसमट लक्षात घेतली. मात्र, पुरुषांचा पळपुटेपणा, पुरुष बचाव आंदोलनाचा बेजबाबदारपणा यावर टीकाही केली.

१९९०च्या दशकात स्त्रीवादाची नवी मांडणी उभी राहत होती. परिघावरच्या स्त्रियांचे आवाज वगळण्याचे एकांगी राजकारण करणाऱ्या स्त्रीवादी चळवळीच्या मुख्य प्रवाहाविरोधात आवाज उठत होते. मध्यमवर्गीय उच्चजातीय स्त्रियांचं जगणं कुटुंबामध्ये कोंडलेलं असलं, तरी ब्राह्मणी पितृसत्तेमध्ये कनिष्ठ जातिवर्गातल्या, अल्पसंख्याक समूहातल्या स्त्रिया सामाजिक, सार्वजनिक हिंसेला बळी पडतात, हे वास्तव पुढे येत होतं. अर्थात, आपल्या मध्यमवर्गीय स्त्री वाचकांच्या जीवनाचा बहुतांश भाग कुटुंबाने व्यापल्यामुळे मि.सा. आणि संवादाने कुटुंबाचा खोटा उत्सव, स्वप्नाळूपणाच्या ओझ्याखाली दडलेलं पुरुषी वर्चस्वाचे वास्तव बघायला त्यांना उद्युक्त करण्यावर भर दिला. पण त्याचबरोबर एका व्यापक पातळीवर पितृसत्तेचे समाजव्यापी रूप वाचकांसमोर उलगडले. कुटुंबाबरोबरच समाजाच्या इतर क्षेत्रांमधूनही स्त्रियांवर नियंत्रण कसे आणले जाते हे स्पष्ट केले. उदा. राजकारणाचे क्षेत्र स्त्रियांना वगळणारे. त्यामुळे 'नवरा सांगेल त्याला मत द्यायचे' असे न करता एक डोळस नागरिक म्हणून स्त्रियांनी राजकारणाबद्दलची आपली समज वाढवून राजकारणात सक्रियपणे सहभागी व्हायला हवे, हे त्यांनी सांगितले. स्त्रियांवर मोठा पगडा असणारे क्षेत्र धर्माचे. दैनंदिन जीवनात अंधश्रद्धा, कर्मकांड, व्रतवैकल्य, नीतिनियम याचे स्त्रियांवर जोखड असते. आणि प्रथापरंपरांच्या ओझ्याखाली धर्मसत्ता स्त्रियांना चिरडू पाहते. त्यामुळे, संवादाने स्त्रियांना विवेकी विचाराने धार्मिक व्यवहारांची चिकित्सा करून अंधश्रद्धा निर्मूलनाची कास धरायला सांगितले, समाजात फोफावणाऱ्या धर्मांधतेला विरोध करायला सांगितले. स्त्री-पुरुष समतेचा विचार पुढे नेण्यासाठी आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे लैंगिकता. या काळात निषिद्धतेच्या आवरणामधून बाहेर पडणाऱ्यार या मुद्द्यावर संपादकांनी खुलेपणाने संवाद साधला आहे. बलात्कार, कामाच्या ठिकाणचा लैंगिक छळ, सांस्कृतिक/नैतिक पोलिसांचे हल्ले, एकतर्फी प्रेमातून होणारी तरुण मुलींवरची हिंसा अशा लैंगिक हिंसेच्या दृश्य रूपांबरोबरच दैनंदिन व्यवहारातील स्त्रियांवरची योनिशुचितेची अदृश्य सक्ती त्यांनी समजावून सांगितली. आणि त्याचबरोबर शुद्धता, सभ्यतेच्या निकषावर कलंकित मानल्या जाणाऱ्या स्त्रियांना वाळीत न टाकता त्यांच्याबरोबर उभे राहण्यासाठीही आग्रह धरला. एका अर्थाने पितृसत्तेने विभागलेल्या स्त्रियांमध्ये भगिनीभाव निर्माण करण्याचा हा मि.सा.चा, संवादचा प्रयत्न आहे. त्यांनी पितृसत्ताक व्यवस्थेमध्ये विशेष दर्जा बहाल झालेल्या, कुटुंबाचे जाचक पण संरक्षण मिळालेल्या त्यांच्या वाचक स्त्रियांना; समाजाने दूर लोटलेल्या स्त्रियांबरोबर जोडून घ्यायला सांगितले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे लैंगिकतेची नवी परिभाषा केवळ व्यक्तिवादी स्वातंत्र्याच्या चौकटीत न करता बहुजन वारशाचा वेध घेतला. मग, ती स्त्री-पुरुषांनी वासनेपलीकडे मोकळेपणी मैत्रभावाने वावरण्याचा अवकाश असलेली वारी असो, किंवा सावित्रीबाई-जोतिबांचे समतापूर्ण सहजीवन.

आपले मध्यमवर्गीय वाचक समाजपरिवर्तनाच्या विचारांपासून दूर राहून स्वतःपुरता, स्वतःच्या कुटुंब, वर्गापुरता विचार करतात, सामाजिक चळवळीत सामील होत नाहीत, याची खंत संपादकांनी वेळोवेळी 'संवाद'मधून बोलून दाखवली आहे. म्हणूनच राज्याच्या कानाकोपऱ्यात, देश-परदेशात समाज परिवर्तनाच्या चर्चांना, परिषदांना उपस्थित राहताना त्यांनी तिथली चर्चा वाचकांपर्यंत पोचवली. आणि वेगवेगळ्या समाज जीवनाची वाचकांना ओळख करून देऊन त्यांच्यामध्ये एक तुलनात्मक दृष्टिकोन आणण्याचा प्रयत्न केला. आजूबाजूच्या जगभरातील घडामोडींची संवादमधून त्यांनी सतत चर्चा केली. जागतिकीकरणामध्ये आरोग्याच्या खाजगीकरणाचा गरिबांवर होणारा परिणाम असो, प्रगतीच्या नावाने लोकांच्या जीवनावर चालू असलेले आक्रमण असो, किंवा वांशिक विषमतेचा प्रश्न असो, त्यांनी समाजाकडे बघण्याची एक समग्र चिकित्सक दृष्टी वाचकांमध्ये निर्माण केली. आपल्या कुटुंबाच्या परिघात रमलेल्या, आपल्या समूहाच्या, जगाच्या बाहेर आस्था न बाळगणाऱ्या मध्यमवर्गाला त्यांनी वेळोवेळी सामाजिक आंदोलनांची दखल घ्यायला लावली. स्त्रियांच्या प्रश्नांवर, सामाजिक मुद्द्यांवर काम करणाऱ्या वेगवेगळ्या गटांची, संस्थांची, कार्यकर्त्यांची ओळख

करून दिली. ‘संवाद’मधून नर्मदा बचाव- विस्थापितांच्या उपोषणाची काळजी, निखिल वागळेंसारख्या लढाऊ कार्यकर्त्याला तुरुंगात टाकल्याचा राग, भोपाळ वायूगळतीच्या बळींच्या वेदनेची जाणीव, एन्रॉन लढ्याला पाठिंबा न दिल्याचा खेद, बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याच्या विटंबनेनंतर झालेल्या दंगलीबद्दल विषाद, कोयना धरणग्रस्तांच्या आंदोलनाला येणाऱ्या बायांच्या कष्टाची जाणीव, असे बरेच काही व्यक्त झाले. आपल्या मध्यमवर्गीय वाचकांना ‘स्व’पुरत्या सीमित चौकटीच्याबाहेर नेण्याचा सहभाव विकसित करण्याचा हा प्रयास संवादमध्ये प्रकर्षाने जाणवतो.

हा काळ दलित, बहुजन, मुस्लिम, आदिवासी, लेस्बियन, सेक्स वर्कर स्त्रियांच्या संघर्षाचा, त्यांच्या विभिन्न वास्तवाची दखल घेण्याबाबत स्त्री-चळवळीला ठणकावून सांगणारा काळ आहे. या काळात वेळोवेळी संपादकांनी आपल्या मध्यमवर्गीय वाचक स्त्रियांना जातीधर्माच्या भिंती ओलांडायला सांगितले, वरच्या वर्गातील जन्म ही आपली कर्तबगारी नाही, हे त्यांना थेटपणे सांगून स्वतःच्या विशेष लाभदायक परिस्थितीची त्यांना जाणीव करून दिली. परिघाबाहेरील गटातील स्त्रियांच्या संघटनाची, संघर्षाची ओळख करून दिली. सत्यशोधक महिला परिषद, भटक्या विमुक्त स्त्रियांची परिषद, आंबेडकरी जलसा, लोककलांचे कार्यक्रम अशा बहुजन अवकाशांमधल्या मध्यमवर्गीय वाचकांच्या गैरहजेरीबद्दल त्यांनी संवादमधून वेळोवेळी व्यक्त केलेली तीव्र नाराजी हे याचेच उदाहरण आहे. मध्यमवर्गीय ब्राह्मणी जगाच्या चौकटीबाहेर वाचक स्त्रियांना नेण्याचा मि.सा.चा हा प्रयत्न अतिशय अवघड होता.

अशा तऱ्हेने संवाद म्हणजे मि.सा. च्या मध्यमवर्गीय वाचकांना, स्त्रियांना एका नव्या दिशेने नेण्याचा मार्ग बनला. वाचकांचे विचार, जीवन व्यवहार, स्वतःबद्दलची उमज एका नव्या दृष्टीने घडवण्यासाठीचा अवकाश बनला. ‘संवाद’ने स्त्रियांना स्वतःबद्दल आस्था ठेवून, छंद जोपासून, आपले व्यक्तिमत्त्व घडवून, तसेच विवेकपूर्ण विचार बाळगून, आत्मनिर्भर होऊन, भोवतालच्या जगाचा सजग अभ्यास करून नवे जीवन घडवण्यास उद्युक्त केले. स्त्रियांना आपल्या स्वातंत्र्याचा शोध घ्यायला सांगितले, त्यांचे स्वत्व चिरडणाऱ्या पितृसत्ताक समाजव्यवस्थेला प्रश्न विचारण्याची दृष्टी दिली. आपल्या कुटुंबाच्या पलीकडे स्वतःची ओळख करून घेण्यास प्रेरित केले. पण त्याचबरोबर स्वतःपलीकडे जाऊन सामाजिक जबाबदारीचे भानही ठेवायला सांगितले. नवउदारमतावादी चौकटीत वैयक्तिक स्वातंत्र्य आणि सामाजिक कर्तव्य याचा मेळ घालायला सांगण्याचे कळीचे काम संवाद करत राहिला आहे. ‘संवाद’ने काय केले तर एका अर्थाने मध्यमवर्गीय वाचकांसाठी बदलत्या भौतिक परिस्थितीला योग्य अशी नव्या जीवनदृष्टीची, जीवनव्यवहाराची चौकट दिली. अर्थात, त्यांना परिवर्तनाच्या क्रांतिकारक लढ्यात ओढण्याचा अट्टाहास न धरता, त्यांच्यामध्ये त्यांच्या भौतिक संपन्नतेबद्दल अपराधभाव निर्माण करता. अशा मर्यादांबद्दल खरे तर वेगळे बोलता येईल. वार्धक्याबद्दल सकारात्मक दृष्टिकोन, कुटुंबातील सर्वांनी एकत्रित निर्णय घेण्याची लोकशाही पद्धती, झगमगाट आणि दिखाऊपणाने सणवार साजरे न करण्याची व स्त्रियांवर कामाचा बोझा न टाकण्याची सामाजिक जाणीव, तर्काच्या आधारावर सामाजिक प्रथांना प्रश्न विचारण्याची ताकद, वंचितांना व सामाजिक संस्थांना आर्थिक मदत, पर्यावरणाचे संवर्धन आणि अपुऱ्या संसाधनांचे सर्वसमावेशक उपलब्धतेसाठी व्यवस्थापन, उपभोग घेताना उद्दामपणा उधळेपणा टाळून सामाजिक विषमतेची जाणीव, सामाजिक अन्यायाची दखल व निषेध, सर्व सामाजिक गटांच्या समावेशाची समतादायी दृष्टी, अहिंसा, शांतता, युद्धखोरी विरोध अशा अनेक निरनिराळ्या मूल्यांबाबत, व्यवहारांबाबत सजगता निर्माण करून नव्या सामाजिक वर्तणुकीचा एक सुधारक नमुना ‘संवाद’ने निर्माण केला आहे. एकाच वेळी उपभोगवादी, व्यक्तिकेंद्री, अलिप्त जीवनशैली; तसेच जातीधर्माचे संकुचित, कर्मठ, जातीयवादी व्यवहार यामध्ये अडकलेल्या आजच्या मध्यमवर्गासाठी नवी नीतिमूल्य, आणि स्त्री-पुरुष समतेविषयी किमान संवेदनशीलता निर्माण करण्याचा प्रांजळ अवकाश हेच मि.सा. आणि संवादचे वैशिष्ट्य म्हणता येईल.

(सुनीता भागवत यांच्या ‘संवाद’चा एकतीस वर्षांचा आढावा घेणाऱ्या विस्तृत अहवालावर आधारित)


***अनघा तांबे***

*स्त्री आणि लिंगभाव अभ्यास विभाग*

*प्रमुख सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ*

*anaghatambe@gmail.com*


**‘साऱ्याजणी’ मासिक ही वस्तू नाही विचार आहे!**

# वाचणारे लिहितात : मासिकाचे अंतरंग उजळताना

स्वाती देहाडराय



मिळून साऱ्याजणी' ह्या मासिकाच्या तीन दशकांचा आढावा घेत असताना त्यातील अनेक सदरे आपले लक्ष वेधून घेतात आणि हे मासिक स्त्रियांच्या अवकाशाला केंद्रस्थानी ठेवणारे असे मासिक आहे, हे अधोरेखित होते. त्याच प्रमाणे समाजाशी आणि मिळून साऱ्याजणीच्या वाचकांशी संवाद आणि सातत्याने नवनवीन विचार देण्याचा प्रयत्न दिसतो. त्यांच्या ह्या प्रयत्नाला वाचकांनी खूप भरभरून प्रतिसाद दिला. सदर लेखात वाचकांच्या प्रतिक्रिया ह्या सदरातून काय पुढे येते त्याचा मागोवा घेणार आहे. त्यामुळे वाचकांच्या प्रतिक्रियांचे वाचन करताना सदर लेखात वाचकांनी टीका का आणि कशावर केली आहे किंवा कशासाठी कौतुक केले हे पाहणार आहोत. मि.सा. वाचकांपर्यंत काय पोचवण्याचा प्रयत्न करत आहे आणि वाचक ते कसे समजून घेतात ह्याचा आढावा घेतला आहे. थोडक्यात, वाचकांपर्यंत कोणता विचार कसा पोचतो आणि एखाद्या काळात वाचक ते लिखाण त्यातील विचार कसा वाचतो आणि समजून घेतो हे बघणं महत्त्वाचं आहे. त्यातून त्या वेळी त्या प्रश्नावर/मुद्द्यावर समाज काय विचार करत होता आणि मि.सा.मधील आशय त्यामध्ये काही वेगळे आणि त्यावेळच्या प्रमुख प्रवाहाला रुचणार नाही, असे काही सुचवत होते का हे तपासून पाहता येईल. गेल्या तीस वर्षातील वाचकांच्या प्रतिक्रिया ह्या मि.सा.विषयी आणि मासिक वाचकांकडे कसे बघते ह्याचा आरसा आहे. वाचकांच्या प्रतिक्रिया छापतानासुद्धा त्या ह्या वेगवेगळ्या शीर्षकाखाली प्रकाशित केल्या आहेत. उदाहरणार्थ, वाचणारे लिहितात, बोलकी पत्रे इत्यादी ज्यातून मासिक वाचकांच्या प्रतिक्रियांकडे कसे बघते ते लक्षात येते. या सर्व प्रतिक्रिया ह्या आपण एरवी इतर ठिकाणी वाचतो त्यापेक्षा फार वेगळ्या आहेत असे नाही. ह्या प्रतिक्रिया मासिकाचे कौतुक करणाऱ्या, नकारात्मक, काही नवे सुचवू पाहणाऱ्या आणि काही प्रतिक्रिया ज्यांना नकारात्मक कदाचित म्हणता येणार नाही, पण टीका करणाऱ्या असेही म्हणून सोडून देता येत नाही, अशाही प्रतिक्रियांचा समावेश असलेला दिसतो. ह्या सदराचा आढावा हेही सुचवतो की, मासिकातून पुढे आलेले मुद्दे हे प्रस्थापित व्यवस्थेला प्रश्न विचारणारे आणि समाजाच्या पितृसत्ताक व्यवस्थेची घडी बिघडवणारे असे लिखाण असते हे दर्शवते. त्यामुळे वाचकांच्या प्रतिक्रियांचा आढावा घेताना ह्या सगळ्याचा विचार होणे गरजेचे आहे. थोडक्यात, विचार घडवणे आणि त्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध असणे, कसे गरजेचे असते हेही आशयावरील प्रतिक्रियांवरून लक्षात येते. त्याच प्रमाणे स्त्री-प्रश्नाविषयीची समाजाची समज अधिक परिपक्व होण्यातील मि.सा.चे योगदानही ह्या चर्चेतून कसे समजून घेता येते हेही ह्या लेखात मांडले आहे.

*swatidroy@gmail.com*

# वाचायला हवं

दिपाली जंगम



मिळून साऱ्याजणी या मासिकातील आपल्याला वाचण्यासाठी प्रवृत्त करणारे व आपल्याला वाचनाची गोडी लावणारे सदर म्हणजे पुस्तकांची थोडक्यात ओळख. सदरांची नावे तीन टप्प्यात बदलत गेलेली दिसून येतात, ती नावं म्हणजे ‘वाचायला हवं’, ‘पुस्तकांविषयी’ आणि ‘आपल्या वाचनालयात’. या सदरामध्ये पुस्तकांतील ज्ञानाची शिदोरी मिळते जी आपल्याला जगण्यासाठी मार्गदर्शक ठरते. १९९२ ते २०१९ पर्यंतच्या संपूर्ण वर्षांमध्ये सुमारे ४८१ पुस्तकांची माहिती आपल्याला मिळते. सर्वच पुस्तके सामाजिक भान, आपली जबाबदारी, कर्तव्य, स्त्रियांना 'स्व' ची जाणीव करून देणारी आहेत. लेखक, प्रकाशक, पृष्ठ संख्या आणि किंमत यांची माहिती मिळत जाते. या ओळखीतून व्यक्ती अधिक प्रगल्भ आणि विचारशील बनायला मदत होते. जातीय प्रश्न, सामाजिक, आर्थिक, राजकीय, मानवता, स्त्री व्यक्तिरेखा, कुटुंब इ. विषयावरील पुस्तकांची माहिती मिळते. पुस्तके व्यक्तीच्या जीवनाला आकार देतात, संपूर्ण जीवनभर ते आपल्याशी मैत्री करतात, आपल्याला आधार देतात. मिसाने सर्व प्रकारच्या पुस्तकांना एका जागी आणून विविध प्रकारच्या पुस्तकांशी मैत्री करून दिली. या सदराने अनेक नवीन विषयांची माहिती मिळवून दिली.

*jangamoipika16@gmail.com*

# विद्याताईंचे लेखन थेट, प्रामाणिक आणि प्रागतिक

## उज्ज्वला बर्वे



विद्या बाळ यांनी मिळून साऱ्याजणीच्या संपादकपदावरून निवृत्त झाल्यावरही त्यांचा वाचकांबरोबरचा संवाद शेवटपर्यंत चालू ठेवला. त्या आठदहा वर्षांतील लेखांचे बारकाईने वाचन केल्यानंतर पुढील गोष्टी ठळकपणे लक्षात आल्या.

लेखांची शीर्षकं : विद्याताईंची सर्व शीर्षकं लेखाविषयी उत्सुकता निर्माण करतात. लेखाचा विषय काय असेल याचा थोडासा अंदाज त्यातून आला तरी लेख वाचल्याशिवाय त्याचा पूर्ण संदर्भ नेमका कळणार नाही, हेही लक्षात येते.

भाषाः अचूक शब्दयोजनेमुळे त्यांचे लेखन समजायला अतिशय सोपे असले तरी ते बाळबोधही वाटत नाही. वाचकांशी संवाद अशा स्वरूपाचे लेखन असल्याने तोंडी संभाषणाचीच शैली या लेखनात दिसते. विद्याताईंच्या लेखनात इंग्रजी शब्द अभावानेच आढळतात. ज्या शीर्षकांमध्ये हिंदीचा वापर झालेला दिसतो ते त्यांनी जाणीवपूर्वक वापरले आहेत. काव्यपंक्ती, संतवचने, प्रसिद्ध विधाने यांचा वापर त्यांच्या लेखनात फारसा आढळत नाही.

विषय : प्रत्येक लेखाला ताज्या घटनांचा संदर्भ आहे. काही विद्याताईंनी व्यक्तिगत जीवनात अनुभवलेल्या आहेत; तर काही समाजात घडणाऱ्या, माध्यमांतून प्रसिद्ध होणाऱ्या आहेत. काही लेख विद्याताईंनी जाणीवपूर्वक चांगल्या, आनंददायी घटनांविषयी लिहिले आहेत; तर काही लेखांचा सूर त्यांनी प्रयत्नपूर्वक आशादायी ठेवला आहे, असे जाणवते.

अनुभवलेले क्षण : चांगल्या उपक्रमांची- विशेषतः तरुणांनी आखलेल्या- दखल घेणारे अनेक लेख आहेत. छोट्या छोट्या गोष्टींचा आनंद घ्यायचा, त्यांविषयी इतरांना सांगायचे ही विद्याताईंची ऊर्मी अखेरपर्यंत कायम होती याचे हे निदर्शक आहे.

मिळून साऱ्याजणी : दरवर्षी स्थापनादिनाच्या निमित्ताने मासिकाच्या वाटचालीचा आढावा त्यांनी घेतला आहे. मासिकाला यथाशक्ती मदत करण्याचे वाचकांना आवाहन केले आहे. कधी मासिकाला अचानक मिळणाऱ्या मदतीचा आनंद आणि कृतज्ञता यांसह उल्लेख केला आहे.

विवाहसंस्था : या अनुषंगाने येणाऱ्या मुद्द्यांचा ऊहापोह या लेखांत आढळतो. आयुष्याचा जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य मुलांना असावे, विवाह समारंभांवरचा खर्च, वैवाहिक संबंधांतील समानता इथपासून ते लग्न केलेच पाहिजे का असे प्रश्न विद्याताईंनी सतत वाचकांसमोर मांडले आहेत, त्याविषयीची स्वतःची मते ठामपणे मांडली आहेत.

स्त्रियांवरील अत्याचार : लग्नसंस्थेखेरीज अन्य ठिकाणी स्त्रियांना सहन करावे लागणारे अत्याचार हादेखील काही लेखांचा विषय आहे. महिलांवरील बलात्काराचे संदर्भ विविध लेखांत येतात. भारतात अत्याचारितेला तोंड लपवून जगावे लागत आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे. राजस्थानातील भंवरीदेवी या महिलेचा लढा, तिच्याशी झालेल्या भेटीगाठी यांचे उल्लेख अनेक लेखांत सापडतात.

लैंगिकता : काळानुरूप विस्तारलेल्या दृष्टिकोनातून विद्याताई आणि 'मिळून साऱ्याजणी'या दोघांची भूमिकाही कशी बदलत गेली, 'ती, तो आणि त्याच्यापलीकडचे ते' या सर्वांना त्यात सामावून घेणे का गरजेचे वाटले आणि त्यामुळे मि.सा.चे ब्रीदवाक्य कसे बदलले ते त्यांनी एका लेखात स्पष्ट केले आहे.

मृत्यू : मृत्युसंबंधी काही मोजके लेख या काळात त्यांनी लिहिले. स्वतः मृत्युच्या दारात असतानाही त्यांना स्वेच्छामरणाविषयीच्या स्वतःच्या विचारांचा विसर पडला नाही, हे या लेखानंतर सहा-आठ महिन्यांत त्यांच्या शेवटच्या दुखण्यात पाहायला मिळाले. त्यामुळे या लेखनाचे महत्त्व आणि त्यामागील प्रामाणिकपणा या गोष्टी अधोरेखित होतात.

**उज्ज्वला बर्वे**

*(माध्यम अभ्यासक व प्राध्यापक, विभागप्रमुख, संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ)*

ujjwalabarve@gmail.com

**'जे जे व्यक्तिगत ते ते राजकीय!'**
या स्त्री चळवळीतल्या घोषणेचा ठळक आणि सूक्ष्म अर्थ कथा,कविता,लेख,मुलाखती आणि संपादकीय यामधून प्रत्ययकारी पध्दतीनं उलगडून दाखवणारं मासिक मिळून साऱ्याजणी!

# सिद्धांत आणि अनुभव यांना जोडणारा पूल

## वैशाली जोशी



समाजहिताच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या  समग्र परिवर्तनासाठी विचार आणि कृती यांची सांगड घालणे आणि या दोन्ही पातळ्यांवर सुसंगत बदल घडवून आणणे आवश्यक असते. त्यासाठी व्यक्तिगत आणि सामूहिक अशा दोन्ही पातळ्यांना जोडणारे परस्परपूरक दुवे महत्त्वाचे असतात. या संदर्भात सिद्धान्त आणि अनुभव या दोन पातळ्यांना सतत जोडून पाहणाऱ्या या मासिकाच्या समाजशास्त्रीय अध्ययनातील योगदानाचा आढावा प्रस्तुत लेखात घेतला आहे.

'साऱ्याजणी' हे स्त्रीच्या जगण्याच्या अनुभवाशी जोडलेलं, अनुभवांना प्राधान्य देणारं मासिक आहे. त्यामुळे या मासिकाच्या माध्यमातून गेली ३१ वर्षे जे सातत्यपूर्ण दर्जेदार लेखन झाले, ते संदर्भसाहित्य म्हणून अतिशय मोलाचे आहे. एक व्यापक संरचना म्हणून समाजव्यवस्था कशी चालते व या व्यवस्थेचा भाग म्हणून जगणाऱ्या व्यक्ती आपल्या जगण्याचा संदर्भ कसा लावतात हे मि.सा.तील लिखाणातून फार चांगल्या प्रकारे स्पष्ट होते. सामाजिक लिंगभेदभावाचा मुद्दा मांडताना मि.सा.ने कथा, कविता, मुलाखती, वैचारिक-ललित लेख अशा वैविध्यपूर्ण साहित्याचा आधार घेतला आहे. परिसंवाद, चर्चा, काही विशिष्ट मुद्द्यांना धरून मुद्दाम मागवलेल्या प्रतिक्रिया अशा विविध प्रकारे मि.सा.मध्ये कुटुंब, नातेसंबंध, विवाह, सहजीवन, लैंगिकता अशा अनेक महत्त्वाच्या सामाजिक संस्था व संरचनांवर प्रकाश टाकला आहे. या सामाजिक संस्था व्यापक संरचना म्हणून त्यांच्या वैशिष्ट्यांसह वर्गात शिकवल्या जातात. पण प्रत्यक्ष ज्या अंतर-क्रियांच्या माध्यमातून ही संरचना अस्तित्वात असते, त्या सूक्ष्म पातळीचे अवलोकन मि.सा. मधील लेखांच्या माध्यमातून सहज सोप्या पद्धतीने करता येते. मि.सा.मधील वैचारिक लेख, आणि चर्चा अशा माध्यमातून जे अनुभवकथन पुढे येते ते वर्गात शिकवल्या जाणाऱ्या आणि पुस्तकातून सैद्धान्तिक भाषेत मांडल्या जाणाऱ्या विचारांना फार मोलाची जोड देते.

म्हणूनच मि.सा.च्या समाजशास्त्रीय योगदानाची चर्चा करताना आणखी एक महत्त्वाचा मुद्दा डोळ्यापुढे येतो, तो म्हणजे रोजच्या जगण्याच्या अनुभवांना वैचारिक सिद्धान्ताची महत्त्वाची सामग्री म्हणून पाहता येते, ही या मासिकाने बळकट केलेली जाणीव. आपल्या रोजच्या जगण्यातून आपण समाज घडवत असतो. समाजाचे सदस्य म्हणून आपण असंख्य गोष्टी सहजपणे अंगिकारतो, तसेच सामाजिक चौकटी सोडवण्यासाठी छोटे छोटे मार्ग निर्माण करत असतो आणि कधी कधी उघडपणे संघर्षाचा मार्ग स्वीकारत असतो. हे तुमचे आमचे अनुभव समाजशास्त्रीय आकलनासाठी खूप बहुमोल असतात. 'जे जे खाजगी व व्यक्तिगत, ते ते राजकीय' ह्या स्त्रीवादी भूमिकेनुसार व्यक्तिगत पातळींवरील अनुभव पुढे आल्याने, चर्चिले जाण्याने नवी वैचारिक दिशा मिळते. त्यातून सिद्धान्तनिर्मिती होते. दुसरीकडे, आपला प्रश्न केवळ मी, माझं कुटुंब, माझी परिस्थिती यातून जन्मलेला नाही; तपशील वेगळा, रूप वेगळे असले तरी व्यक्तिगत अनुभवांची पाळेमुळे व्यवस्थेत रुजलेली असतात व आपले अनुभव, आपले प्रश्न हे फक्त आपल्यापुरते नसून पितृसत्ता, पुरुषप्रधान व्यवस्था, जातीव्यवस्था अशा विषमतेच्या व्यापक समाजव्यवस्थेशी निगडीत आहेत. ही जाणीव निर्माण करण्याचे तसेच ज्या संकल्पना व सिद्धान्तातून या उतरंडीचे भान येते त्यांच्याशी आपल्या वाचकवर्गाला सहजपणे जोडण्याचे काम मि.सा.ने केले आहे.

मि.सा.च्या सुरुवातीच्या काळात स्त्रियांच्या प्रश्नांची मांडणी करताना जात आणि समुदायाच्या अस्मितेशी संबंधित मुद्दे फार प्रकर्षाने पुढे आले नाहीत. लेखक देखील बहुतांशी उच्चवर्णीय, मध्यमवर्गीय स्तरातून येणारे होते. पण गेल्या ३१ वर्षांच्या मि.सा.च्या प्रवासावर नजर टाकली तर मि.सा.ने लेखक आणि लेखन या दोन्ही पातळ्यांवर सर्वसमावेशक धोरण ठेवले आहे, याचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. मि.सा.तील अनेक अभ्यासपूर्ण लेखांमधून पुरुषी वर्चस्व आणि स्त्रियांचे दुय्यमत्व सामाजिक व्यवस्थेतून कसे टिकवून ठेवले जाते, पुरुषसत्ता इतर वर्चस्ववादी व्यवस्थांबरोबर कशी हातमिळवणी करत असते, तसेच स्त्रियांचे एकमेकींबरोबरचे संबंध कसे नियंत्रित होतात ते स्पष्ट होते. भारतातील सामाजिक विषमतेचे मूळ जातीच्या उतरंडीच्या व्यवस्थेत असल्यामुळे स्त्रीमुक्तीची चळवळ जातीअंताच्या चळवळीशी जोडलेली आहे व स्त्रियांच्या मुक्तीसाठीचे लढे विषमतेच्या विरोधात केल्या जाणाऱ्या इतर लढ्यांशी जोडलेले आहेत, अशी स्पष्ट भूमिका मि.सा.तील लेखांमधून मांडली गेली.

'साऱ्याजणी'चा वाचकवर्ग बहुतांश शहरी, मध्यम-उच्च मध्यमवर्ग आहे. त्यामुळे पारंपरिक, सामाजिक-सांस्कृतिक,

मध्यमवर्गीय चौकट एकदम मोडून न टाकता हळूहळू ती वाकवत-वळवत, सैल करण्याचं ‘साऱ्याजणी’चं धोरण आहे. या वर्गाला समाजातील विषमतेच्या विरोधात चालू असणाऱ्या सामूहिक कृतीच्या प्रवाहात आणण्याचे काम थोड्या वेगळ्या पद्धतीने करावे लागेल, अशी मि.सा.ची धारणा आहे. आपल्या स्त्री म्हणून जगण्याचे सामाजिक संदर्भ वाचकांपर्यंत पोचवताना आपल्याला मिळालेल्या वर्गीय, जातीय अधिकारांची जाणीव त्यांच्यात निर्माण करण्याचाही मि.सा.चा उद्देश आहे.

‘मिळून साऱ्याजणी’ने ३१ वर्षांच्या प्रदीर्घ वाटचालीत साहित्यिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातल्या घडामोडींशी धागा जोडत अनुभव आणि कृतिशील विचारांच्या आदानप्रदानाचे व्यासपीठ म्हणून काम केले आहे. आपले समाजवास्तव आपल्यासमोर उलगडून दाखवत, व्यक्ती म्हणून आपल्या जबाबदारीची जाणीव करून दिली आहे. ‘स्त्रियांसाठीचा मुक्त अवकाश’, अशी जरी या मासिकाची मुख्य ओळख असली तरी समग्र समाजपरिवर्तन हा ‘साऱ्याजणी’चा केंद्रबिंदू आहे. एरवी सौम्य, समजुतीच्या भाषेत बोलणाऱ्या ‘साऱ्याणी’ने समाजात घडणाऱ्या विकृत, समाजविरोधी घटनांच्या विरोधात भक्कम आवाज उठवला आहे. भारतीय समाजाच्या लोकशाहीवादी परंपरेवर घाला घालणाऱ्या राजकीय शक्तींवर परखड भाष्य केले आहे. कोणत्याही एका विचारसरणीच्या चौकटीत न अडकता लोकशाही, समानता आणि बंधुभाव अशा मूलभूत मानवी मूल्यांशी बांधिलकी जपली आहे. समाजशास्त्राच्या अभ्यासकांना समाजव्यवस्थेच्या समग्र पैलूंचे आकलन होण्यात या मासिकाची बहुमोल मदत झाली आहे व होत आहे. ‘मिळून साऱ्याजणी’ला पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

***वैशाली जोशी***

*vaishalisjoshi@gmail.com*

# संघर्षाची गाथा मांडणारी सदरं

## संध्या गवळी



‘मिळून साऱ्याजणी’मधून प्रकाशित झालेली सदरं ही एक प्रकारची जीवनातील संघर्षाची गाथा मांडतात आणि त्यातून सापडलेलं नवीन व्यक्तिमत्त्व आणि जगण्याची अवगत झालेली कला याचा प्रत्यय विविध सदरातील लेख वाचताना येतो. समोर आलेल्या आव्हानांना सामोरे जात, विविध तडजोडी करत सामाजिक बदलाच्या प्रक्रियेमध्ये सहभागी असलेले सर्व प्रवासी म्हणजे ‘साऱ्याजणी’ होय. ‘मिळून साऱ्याजणी’मधील कार्यकारी सभासद, त्यात लिहिलेले लेख, लेखिका ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर स्त्रियांचा समावेश असला तरी ते बायकी, बायकांशी संबंधित होत नाही. शर्मिला रेगे ‘दलित वूमन टॉक डिफरेन्टली’ या लेखात अधोरेखित करतात, त्याप्रमाणे विशिष्ट सामाजिक स्थानावरून होणारी ज्ञाननिर्मिती अधिक मुक्तिदायी असते आणि ही ज्ञाननिर्मिती जर समाजातील परिघाबाहेर असलेल्या समूहाकडून झाली तर ती केवळ अनुभवांमध्ये अडकून राहत नाही तर समाजामध्ये सत्तासंबंधांची जडण घडण कशापद्धतीने होते, शोषणाच्या व्यवस्था काय आहेत हे या ज्ञानाच्या केंद्रस्थानी येते.

यामुळे यातील लेखक/लेखिका हे इथल्या व्यवस्थेला आपापल्या स्थानानुसार प्रश्न विचारत, आव्हानं पेलत एक मैत्री संवाद निर्माण करतात. संवेदनशील व्यक्तिमत्त्वाकडे घेऊन जाणाऱ्या प्रक्रियेमध्ये सर्वांना सोबत करण्याची साद देतात. यामध्ये सदरात प्रकाशित झालेले लेख आणि वाचकांनी नोंदवलेली मते/विचार ही मोलाची कामगिरी निभावतात. सदरील लेखांमध्ये एकूण नऊ सदरांचा विचार करण्यात आलेला आहे. त्यामध्ये साऱ्याजणींचं खबर लहरिया, पुलावरून पाणी जाय..., कामना आणि प्रेरणा, घरकामाच्या गोष्टी, स्वनिमच्या शोधकथा, ग्रहणांकित चांदणं, भाषेचे भिंग, कायदा आणि साहित्य आणि संवादस्पंदन इ. सदरांचा समावेश आहे. प्रत्येक सदरचा वेगळा विचार करण्यात आलेला असून त्यामधून समोर आलेल्या मुख्य मुद्द्यांना धरून या लेखामध्ये मांडणी करण्यात आलेली आहे. नऊ सदारांतर्गत लेख, लघु कथा, दैनंदिन जीवनाशी निगडित असलेले विषय लेखकांनी वाचकांसमोर ठेवलेले आहेत. यातील बहुतांश लेख विचार करायला लावणारे आणि एक संवेदनशील, सामाजिक बदलाच्या प्रक्रियेमध्ये महत्वाची दिशा निर्देशक म्हणून काम करताना दिसून येतात. बहुसंख्य लेख हे उच्च, मध्यमजात, वर्गातून येणाऱ्या स्त्रियांनी लिहिलेले आहेत. यामध्ये शहरी आणि ग्रामीण असा भेदही आढळून येतो. असे असले तरी पुरुष लेखकांचे काही लेख तसेच परिघावरील असलेल्या समूहांच्या प्रश्नांचा ऊहापोह कथा व लेखांमधून आपल्याला दिसून येतो.

*sandhyagawali@gmail.com*

# 'साऱ्याजणी'चे राजकीय भान

## आकाश साबळे



'मिळून साऱ्याजणी' मराठी वाचकांना हे नवीन विचार घेऊन आलेले मासिक म्हणून परिचित आहे. मराठी साहित्यविश्वात पाने, फुले व निसर्ग वर्णनाच्या व मध्यमवर्गीय वाचकांच्या जाणिवा डोळ्यासमोर ठेवून येणाऱ्या मासिकांच्या काळात वास्तववादी प्रश्नाला भिडणाऱ्या, अन्याय अत्याचाराविरोधात आवाज उठवणाऱ्या मासिकापैकी एक आहे. सनातनी, अंधश्रद्धा,विषमतावादी विचार, जीर्ण व समाजघातक विचार आहेत त्या विरोधात मासिकाने वेळोवेळी आपल्या संपादकीय, सदर, चर्चा, मुलाखती, व लेखांद्वारे प्रबोधन करण्याचे काम केले आहे. धर्मांधता, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, लैंगिक, वैज्ञानिक या विषयावर या तीस वर्षात महाराष्ट्राच्याच नव्हे तर जागतिक पातळीवर आपला एक वेगळा ठसा मासिकाने उमटवला आहे.

मला 'मिळून साऱ्याजणी' मासिकात १९८९ ते १९९९ च्या कालखंडात राजकीय, राजकारण या विषयावर ज्या चर्चा झाल्या, लेख प्रकाशित झाले, मुलाखत आल्या इत्यादि संबंधात परीक्षण म्हणा किंवा त्यावर माझे मत मांडण्याची डॉ. गीताली वि.मं व डॉ. सुवर्णा मोरे यांनी संधी दिली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. माझी आंबेडकरी चळवळीत काम करण्याची सुरुवात झाल्यापासून वैचारिक विश्वात या मासिकाचे कार्य योगदान मी प्रत्यक्ष पाहत आलो आहे. ज्या मासिकाच्या विचार व्यवहाराला बघून चळवळीत वाटचाल करत आलो, त्या मासिकाच्या एका विभागाबद्दल कालांतराने मत व्यक्त करणे किंवा आपली भूमिका मांडणे हे फारच महत्त्वाचे काम आहे मला वाटते.

१९८९ ते १९९९ च्या कालावधीमध्ये 'मिळून साऱ्याजणी' ने राजकीय, राजकारण या विषयावर अत्यंत महत्त्वपूर्ण विषयांवर मांडणी, चर्चा घडवून आणली आहे. स्थानिक राजकारणापासून ते आंतरराष्ट्रीय राजकारण, समाजवादी, डावे तसेच दलित राजकारण आपल्या मासिकाच्या परिप्रेक्ष्यात समाविष्ट केले. ती पुढील प्रमाणे :

प्रा. पुष्पा भावे यांचे 'राजकारणाच्या अंगणात' हे सदर. त्यांचे अध्यक्षीय भाषण व त्यांची मुलाखत, अमेरिका व इस्राइल येथील महिलांचे राजकारण, दिवाळी विशेषांकातील डॉ. नीलम गोऱ्हे यांचे लेख, स्त्रिया आणि राजकारण, राजकारणातील कर्तृत्ववान महिलांची विशेष ओळख, झुंजूमुंजू या सदरात राजकारणात सक्रीय असणाऱ्या महिलांची यशोगाथा, १९९९ च्या दिवाळी अंकात- 'राजकारण गेलं चुलीत?' या सदराखाली चर्चा, मुलाखती व लेख स्वरूपात, स्त्रिया आणि राजकारण या विषयावर 'स्त्रियालिटी' हे जेष्ठ पत्रकार जयदेव डोळे याचं सदर (२०१७ – २०१८ )

वरील सर्व लेख, मुलाखती, चर्चा ह्या तत्कालीन राजकीय विचारविश्वात एक नवीन भूमिका पुढे आणतात व प्रस्थापित राजकारणाला छेद देऊन एक समतावादी, स्त्रीमुक्ती, जातीअंत, व मानवकेंद्री राजकीय जाहीरनामा, भूमिका म्हणून पुढे येताना दिसतात. 'मिळून साऱ्याजणी' या मासिकाला तीस वर्ष पूर्ण झाली आहेत. या तीस वर्षात मिळून साऱ्याजणी या मासिकाने समाजातील वेगवेगळ्या महत्त्वपूर्ण विषयाच्या अनुषंगाने अतिशय महत्त्वाचे विषय हाताळले आहेत, चर्चा घडवली आहे, व सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने अतिशय दमदार वाटचाल केली आहे. मि.सा. स्त्रीपुरुष समतेपासून ते लैंगिक अन्याय अत्याचारबाबत ठोस भूमिका घेऊन समाजात विषमतावादी व्यवस्थेच्या विरोधात अविरतपणे कार्यरत आहे. सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, वैज्ञानिक,कला, क्रीडा, मानवतावाद, लोकशाही मूल्य व संविधान मूल्ये इत्यादि विषयावर अतिशय चर्चात्मक लेख प्रकाशित केले आहेत. १९८९ ला लावलेले ज्ञानरूपी रोपटे आजघडीला ज्ञानाचे वटवृक्ष झालेले आहे.

डॉ. विद्या बाळ अध्यासनाच्या निमित्ताने 'मिळून साऱ्याजणी' मासिकाचा मागील तीस वर्षांचा अभ्यास करण्याचा प्रकल्पाअंतर्गत मला या विचारविश्वात, विचारसागरात विहार करायची संधी मिळाली त्याबद्दल मी पुन्हा एकदा गीतालीताई, व सुवर्णाचा शतशः आभारी आहे.

..............................................................................

# जनजागरण करणारे वृत्तांत

## दिपाली चव्हाण



समाज परिवर्तनाची चळवळ अखंडपणे करणारे, जनजागरण करणारे, स्त्रियांना हक्काचे विचारमंच देणारे' मिळून साऱ्याजणी ' हे मासिक आहे. स्त्रीमध्ये असलेली लेखिका या वृत्तांत लेखनात भेटत गेली. विविध कार्यक्रमांचा संक्षिप्त वृत्तांत लिहिताना लेखक आणि लेखिका यांची प्रतिभा ज्या साहित्यिक शब्दातून व्यक्त झाली आहे

ते काही ठिकाणी तसेच ठेवून वाचकांना कार्यक्रमाशी समरस होता येईल अशी जाणीवपूर्वक मांडणी केली आहे. काही वृत्तांत यामधून लेखिकेनं तिच्यातले लेखनकौशल्य दाखवले आहे.

मिसाशी जोडलेला परिवार सुद्धा मोठाच, त्याची व्यापकता सांगणारे छोटे पण मोठे संदेश देणारे कार्यक्रमाचे वृत्तांत आहेत. कार्यक्रमाचे वृत्तांत देणाऱ्या लेखिकांमध्ये वेगळी म्हणजे बहुजन, मागासवर्गीय, आदिवासी समाजातील आडनावे कमी प्रमाणात आढळून आली. मिळून साऱ्याजणी या मासिकामध्ये अजून एक वैशिष्ट्य जाणवतं या मासिकाच्या प्रकाशनाचे कार्यक्रम जाणीपूर्वक ग्रामीण भागात घेतले आहेत. मिळून साऱ्याजणीच्या सखीमेळाव्याचा उत्तम परिणाम म्हणजे खरोखरच 'बाई माणसाचा बाईकडून माणसाकडे' हा प्रवास समाजस्वास्थ्यासाठी महत्त्वाचा आहे. समता मग ती वर्गामध्ये असो किंवा स्त्री-पुरुषांमध्ये असो जेव्हा शोषित, तळागाळातला वर्ग त्याची प्रगती सांगतो तेव्हाच त्या कामाची दिशा योग्य आहे असं म्हणता येईल.

थोडक्यात तत्त्वज्ञानाचं व्यवहारात रूपांतर होतांना दिसत. विविध ठिकाणी झालेल्या अंकांचं प्रकाशन, मिळून साऱ्याजणीचे वर्धापनदिन, प्रतिनिधींची भेट, त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय नाट्य लेखिकांच्या परिषदेविषयी सुद्धा यात माहिती आलेली आहे. कोकणी मराठी साहित्य संमेलन, समतेसाठी आयोजित केलेले कार्यक्रम, विवाहाच्या दृष्टीनं तरुण वर्गासोबत पालकांसाठी भरविलेला मेळावा, विद्रोही स्त्री साहित्य संमेलन तसेच कन्नड लेखिकांच्या सोबतचा कार्यक्रम अशा विविध कार्यक्रमांचा थोडक्यात वृत्तांत आहे. तर काही वृत्तांत यामध्ये प्रत्यक्ष कार्यक्रमाविषयी माहिती आहे. काही वृत्तांत वाचताना विद्याताई आणि गीतालीताई यांच्या सहवासातून मिळालेली दृष्टी आणि ऊर्जा याचा आलेला प्रत्यय डोकावत असतो.

*deepalichavan85@gmail.com*

---

# व्यंगचित्रं

## आकाश साबळे

समाजातील अत्यंत गुंतागुंतीच्या, जटील व क्लिष्ट विषयाला अत्यंत सोप्या व सुटसुटीत पद्धतीने व सर्वसामान्य लोकांना लगेच समजेल अशा प्रकारची कलाकृती म्हणजे व्यंगचित्र. ते सभोवतालच्या जीवनातील घडामोडीतील विसंगती नेमकी टिपून त्यावर भाष्य करते. समाजातील रूढी ,परंपरा, अनिष्ट प्रथा, अपप्रवृत्ती, नेत्यांच्या बोलण्यातील आणि वागण्यातील विसंगती, अनेक प्रकारचे भ्रष्टाचार, परिस्थितीमुळे होणारी कोंडी यांचे मार्मिक दर्शन व्यंगचित्र घडवते, व्यंगचित्रकार आपल्या कुंचल्याच्या फटकाऱ्याने एखाद्या प्रश्नाचे स्वरूप लोकांसमोर ठेवत असतो.

मि.सा.त काही महत्त्वपूर्ण प्रश्नांना योग्य रीतीने वाचकांसमोर आणण्यासाठी व्यंगचित्रांचा अतिशय चपलखपणे वापर केला आहे. बाजाराच्या विळख्यात आरोग्य त्यात छोटा सिव्हील ठेकेदार, ट्रॅफिक पोलीस, रात्रपाळीचा पत्रकार, इंजिनियर, प्राध्यापक, अभिनेत्री, धार्मिक गृहस्थ, सरकारी कर्मचारी इत्यादि लोकांचा दवाखान्यात उपचारासाठी दाखल केल्यानंतरचा दृष्टिकोन त्यांच्या त्यांच्या व्यवसायाच्या नुसार अतिशय मार्मिक पद्धतीने मांडला आहे. तसेच त्याच अंकातील लग्न एक मंगल सोहळा 'काम, क्रोध, मद, मत्सर इत्यादि' या मंगला गोडबोले यांच्या लेखात नवऱ्याचं घरकाम याबाबतची एक खुसखुशीत कैफियत व्यंगचित्रांच्या माध्यमातून मांडली आहे. अवधूत परळकर यांनी 'व्यंगचित्रातील स्त्री' या लेखात जी व्यंगचित्रे काढली आहेत, ती प्रस्थापित व्यवस्थेत स्त्रियांकडे किंवा स्त्रीमुक्ती, स्त्रीपुरुष समतेकडे कशा पद्धतीने कुत्सितपणे दृष्टिकोन बाळगून आहेत, याचे चित्रण वाचकांना देतात. मिसात नित्यनियमाने व्यंगचित्र काढणाऱ्यांमध्ये सुजाता जोशी–




पाटोदेकर यांच्या उल्लेख करावासा वाटतो. अंकात चुंबक व स्वर या विषयी प्रभावी उपचाराच्या अनुषंगाने व्यंगचित्र काढले आहे. तर अंकात कर्जमाफीचा फायदा खरंच शेतकऱ्यांना झाला आहे का, या विषयी बोलकं व्यंगचित्र आहे. कर्जमाफी, शेतकरी, राजकीय पोळी भाजणारे राजकारणी व कर्जाने त्रस्त झालेला शेतकरी व त्याची पिळवणूक करणारा सावकार हे या छोट्याश्या व्यंगचित्रातून समोर येते व समजते. रेड्यावर बसलेला यमदेव याचे व्यंगचित्र आहे. महाराष्ट्रातील विजेच्या भारनियमनाच्या समस्येबद्दल अतिशय मार्मिक फटकारा आहे.

'शि.द. फडणीस यांच्याशी चित्रसंवाद' या सदराखाली त्यांच्या कार्याचा आढावा घेत असताना मासिकात त्यांनी काढलेली विविध अतिशय मार्मिक व्यंगचित्रे प्रकाशित केली आहेत. त्याच महिन्याच्या मासिकाचे मुखपृष्ठ शि. द. फडणीस यांचे व्यंगचित्र आहे पुरुषप्रधान व्यवस्थेच्या विरोधातील राग या चित्रातून व्यक्त होत आहे. हे व्यंगचित्र सामाजिक व्यवस्थेच्या संदर्भात फारच बोलकं आहे.

*akashsable08@gmail.com*

# दिवाळी अंकाच्या विशेष विभागांचे वैशिष्ट्य

अमरनाथ सिंग



'मिळून साऱ्याजणी'च्या गेल्या वीस वर्षातील दिवाळी अंकाच्या विशेष विभागाचे रसग्रहण करण्याची जबाबदारी माझ्याकडे देण्यात आली होती. या निमित्ताने मी या विशेष विभागांचे वाचन सुरू केले. वाचत असतांना तो काळ डोळ्यासमोर उभा राहत होता. त्या त्या वेळी प्रकर्षाने पुढे आलेल्या मुद्द्यांच्या मुळाशी जाऊन, त्या प्रश्नाची सर्वंकष पडताळणी करण्याचा प्रयत्न या विशेष विभागांमध्ये करण्यात आलेला आहे. यातून 'मि.सा.'ची वैचारिक झेप आणि साक्षेपी दृष्टी लक्षात येते.

यात प्रत्येक वेळी वेगवेगळा विषय हाताळण्यात आलेला आहे. राजकारण, साहित्य, लोकजीवन, नातेसंबंध, आरोग्य, शेतीप्रश्न, सामाजिक परंपरा, पर्यावरण असे आजच्या काळातील ज्वलंत मुद्दे या विशेष विभागांमध्ये चर्चिले गेले आहेत. या विशेष विभागांच्या शीर्षकांवर नजर टाकली, तरी किती विविधांगी विषयांची हाताळणी मि.सा.ने केलेली आहे, याची प्रचिती येते. त्यातील काही शीर्षकं इथे वानगीदाखल नोंदवत आहे :

राजकारण गेलं चुलीत; स्त्रिया संवाद करू पाहतायत (१९९९), सहजीवन (२००१), पुरोगामी जमातवाद (२००१), थेंबे थेंबे, पाणी वाचे (२००३), मेनोपॉज (२००४), वीज नावाची ऊर्जा (२००६), वृद्धत्वाच्या वाटेवर (२००९), तरुणाईची धडकन (२०१०), बळीराजाचं चांगभलं (२०१४), लग्न : एक मंगल गोंधळ (२०१६), बाजाराच्या विळख्यात आरोग्य (२०१७), नग्नता : जनातली मनातली आणि मुळातली (२०१८) , वेध तरुण मनाचा (२०१९) असे हे काही विशेष विभाग.

'राजकारण गेलं चुलीत; स्त्रिया संवाद करू पाहतायत' हा १९९९ सालातील विशेष विभाग राजकारणातील स्त्रीच्या सहभागाची सखोल चर्चा करतो आणि वेगळी दृष्टी मांडतो. पितृसत्तेच्या प्रभावाची अनेक उदाहरणे आपल्याला सगळ्याच राजकीय पक्षात दिसतात. आताचे जे मुख्यप्रवाही राजकारण आहे, ते तर पूर्णतः पितृसत्तेने पोसलेले आहे. उजव्या विचारधारेचे प्रतिगामी पक्ष स्त्री-पुरुष समताविरोधी विचार रुजवण्याचा आणि समाजाला मागे नेण्याचा प्रयत्न करीत आहेत. फॅसिजमच्या वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर स्त्रियांनी राजकारणात यावे आणि भारतीय समाजाला दिशाहीन होण्यापासून वाचवावे, असा प्रमुख मुद्दा या विशेष विभागात अधोरेखित होतो.

पाण्याच्या प्रश्नावर २००३ सालातील विशेष विभाग आहे. त्याचे शीर्षक आहे- 'थेंबे थेंबे, पाणी वाचे'. हा विशेष विभाग पाण्यासंदर्भात अनेक पैलू पुढे आणतो. पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस बिकट बनणार यात शंका नाही. अशा परिस्थितीत 'मिळून साऱ्याजणी' या मासिकाने त्या ज्वलंत प्रश्नावर ही उद्बोधक चर्चा घडवून आणली आहे. आताच्या काळात पर्यावरणाचा प्रश्न गंभीर बनलेला आहे. पर्यावरणातील बदल मानवी जीवनावर अनेक प्रकारे गंभीर परिणाम करीत आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास मानवी समाजासमोरील सर्वात मोठे संकट आहे. या संकटाची व्याप्ती एवढी मोठी आहे की, संपूर्ण मानव जातीचे अस्तित्व धोक्यात आलेले आहे. २००८ सालातील दिवाळी अंकाचा विशेष विभाग या विषयावर आहे.

आपला भारतीय समाज ज्येष्ठांना मान देतो. आपण त्या परंपरेचे गोडवे गातो. परंतु ती परंपरा लयाला जाते की, काय अशी आजची परिस्थिती आहे. बदलत्या काळात संयुक्त कुटुंबव्यवस्था संपुष्टात येऊन विभक्त कुटुंबे निर्माण झाली. पण वैद्यकशास्त्राच्या प्रगतीमुळे माणसाचे आयुर्मान वाढले. या परिणामी देशात असहाय आणि एकाकी वृद्धांची समस्या वाढू लागली. या प्रश्नावर 'मिळून साऱ्याजणी'च्या २००९ सालातल्या दिवाळी अंकाचा विशेष विभाग आहे.

२०१० सालातील विशेष विभाग तरुणांवर केंद्रित आहे. माहिती आणि तंत्रज्ञानाचा विस्फोट होणाऱ्या या काळात ही पिढी कशी जगते? काय विचार करते? नाती, मैत्री, भावनिकता त्यांच्या आयुष्यात कितपत महत्त्वाची आहे? या साऱ्याचाच आढावा घेण्याचा प्रयत्न या विभागात केला आहे. आजच्या तरुणाईच्या मानसिकतेचा सखोल वेध घेणारा हा विभाग तरुणाईचे विविध पैलू आपल्या समोर सादर करतो. तरुणाईच्या आकांक्षा, मर्यादा, क्षमता या सर्व मुद्द्यांची हा विभाग सर्वंकष चर्चा करतो.

उपजीविकेसाठी एखाद्या स्त्रीला स्वतःचे शरीर विकावे लागणे, ही एखाद्या सभ्य समाजाच्या दृष्टीने अत्यंत लाजिरवाणी गोष्ट असते. 'मिळून साऱ्याजणी'च्या २०११ सालातल्या दिवाळी अंकात या ज्वलंत विषयाला हात घालण्यात आला आहे. या विशेष विभागाचे शीर्षक आहे, 'वेश्याव्यवसाय : आपली तुपली नैतिक गोची'. या विशेष विभागात तिच्याविषयी कुठलाही पूर्वग्रह न बाळगता तिला जाणून घ्यायचा प्रयत्न आहे. वेश्याव्यवसायाच्या ऐतिहासिक उगमापासून या व्यवसायाच्या सद्यस्थितीबाबतचं आकलन हा विभाग देतो.

अपंगांचे प्रश्न, अडचणी, अपेक्षा आणि त्यांच्याकडे तसेच त्यांच्या प्रश्नांकडे बघण्याचा एक वेगळा दृष्टिकोन देतो 'मिळून साऱ्याजणी'च्या २०१३ सालातील दिवाळी अंकातील विशेष विभाग. या विभागाचे शीर्षक आहे- 'ग्रहणांकित चांदणे'! हा विशेष विभाग नवी दृष्टी देणारा व या प्रश्नाबद्दल सर्वंकष

मांडणी करणारा एक दस्तऐवज आहे. या विभागात विविध पानांवर दिलेल्या चौकटीत खूप उपयुक्त माहिती देण्यात आलेली आहे. ही माहिती अपंगांना दैनंदिन जीवनात उपयोगी ठरणारी आहे.

२०१४ सालच्या विशेष विभागात शेती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांची सांगोपांग चर्चा आहे. वेगवेगळ्या लेखांच्या माध्यमातून यात शेतीप्रश्नाचे पदर उलगडण्याचे प्रयत्न करण्यात आलेले आहेत. जागतिकीकरण म्हणजे शेतकऱ्यांसाठी पर्वणीच असे मत एका बाजूला; तर जागतिकीकरणानेच शेतकरी देशोधडीला लावला, असे मत दुसऱ्या टोकाला. या परिस्थितीत नेमके काय खरे असेल याचा संभ्रम भल्याभल्यांना उमजत नाही. अशा वेळी शेती प्रश्नाशी संबंधित नेमकेपणाने विचार करण्याचा प्रयत्न या विशेष विभागाच्या माध्यमातून केलेला आहे.

लग्न आणि कुटुंबसंस्था याबद्दल सर्व अंगाने विचार करणारा २०१६ सालातील विशेष विभाग एक महत्त्वाचा दस्तऐवज म्हणून वाचकांसमोर येतो. लग्नाबाबत सर्व जात-धर्मीय पद्धती, त्यांचे वेगळेपण आणि वैशिष्ट्य तो मांडतो. कुटुंबसंस्थेसमोरील आव्हाने आणि समस्या यांची उजळणी या विभागातील लेखांच्या माध्यमातून होते. त्याशिवाय बदलत्या काळात लग्न आणि विवाहसंस्थेत होणारे बदल पण हा विशेष विभाग टिपतो. काळानुरूप सर्व गोष्टी बदलत असतात. हे पाहता विवाह आणि कुटुंबसंस्थेत कोणते बदल अपेक्षित आहेत, याची सैद्धान्तिक मांडणी या विभागामार्फत होते. त्याशिवाय, लोकशाही मूल्ये रुजून समाजात समता नांदावी आणि व्यक्तिस्वातंत्र्य देखील अबाधित राहावे यासाठी काही महत्त्वाचे दृष्टिकोन या विभागातील वेगवेगळ्या लेखात व्यक्त होतात.

'बाजाराच्या विळख्यात आरोग्य' हा २०१७ सालातील विशेष विभाग आजच्या आरोग्यसेवेचे सर्वंकष विश्लेषण करतो. त्यातील अपप्रवृत्तींना उघडे पाडतो. आता सामान्य नागरिकांनी गप्प बसून चालणार नाही, असे आवाहन करतो. तसेच केवळ एखाद्या प्रकरणाचा पाठपुरावा करून शांत बसण्यापेक्षा आरोग्याची जनचळवळ सगळ्यांनी मिळून उभी केली पाहिजे, याची आग्रही मांडणी करतो.

नग्नता ही जनात, मनात व वास्तवात कशी आहे, यावर सकस लिखाण मराठीत क्वचितच वाचायला मिळते. 'नग्नता : जनातली, मनातली, मुळातली' हा विशेष विभाग निषिद्ध मानल्या गेलेल्या 'नग्नता' विषयाचे सगळे आयाम उलगडून दाखवतो. विशेष म्हणजे यात सामाजिक सांस्कृतिक संदर्भ मांडत असतांना नग्नतेमागचे राजकारणसुद्धा स्पष्ट करण्यात आलेले आहे. या मांडणीत प्रगल्भ दृष्टी जाणवते. अशी चर्चा इतक्या व्यापक आणि सर्वांगीण स्वरूपात वाचकांपर्यंत घेऊन जाणे आणि त्यांना देखील त्या विचारमंथनात सामील करून घेणे हे नक्कीच स्वागतार्ह पाऊल आहे.

आजच्या तरुणाईचा सर्वांगीण वेध घेणारा 'वेध तरुण मनाचा' हा विशेष विभाग तरुणाईची मानसिकता मांडतो, तिच्या समस्या आणि मर्यादा मांडतो, तसेच तरुणाईच्या ठायी असलेल्या अनंत क्षमता आणि शक्यता यांना देखील अधोरेखित करतो. या विभागाचे वैशिष्ट्य म्हणजे यात स्वतः तरुण व्यक्त होतात व त्यांच्या अंगी असलेल्या विविध कौशल्यांचे दर्शन घडवतात. आजच्या तरुणाईचा वेग आणि आवेग खऱ्या अर्थाने ही चर्चा कवेत घेते, असे म्हणता येईल.

'पुन्हा एकदा' या विभागात पूर्वी प्रकाशित झालेले साहित्य पुन्हा एकदा वाचकांच्या भेटीला आले आहे. त्यातील लेख, कथा व एकूण चर्चा काळ लोटला तरी आजही प्रासंगिक ठरतात. हे लेखन आजही मनाला भिडते. हा विभाग म्हणजे आपली आपल्या समाजातील प्रश्नांशी म्हणजे आपल्याशीच नव्याने घालून दिलेली गाठभेट आहे. 'मिळून साऱ्याजणी' या मासिकाचा प्रगल्भ प्रवास या विशेष विभागातील साहित्यावरून लक्षात येतो.


***अमरनाथ सिंग,*** पुणे.

*(लेखक, संपादक, अनुवादक, पटकथा लेखक व फिल्ममेकर आहेत.)*

*amarlok2011@gmail.com*


## मिळून साऱ्याजणीतील कथा : एक दृष्टिक्षेप

### रेखा इनामदार - साने



...या अंकातील साहित्याचे व्यवच्छेदक लक्षण म्हणजे सामाजिक चळवळींशी व त्या अनुषंगाने राजकीय विचारसरणीशी असलेला दृढ अनुबंध - तो प्राधान्याने स्त्री मुक्ती वादाशी, त्यातल्या विविध प्रवाह - उपप्रवाहांशी निगडित असला तरी पूर्वकालीन आणि समकालीन कितीतरी आंदोलनांशी, त्यांना आधारभूत असलेल्या तात्त्विक प्रणालींशीही यात समाविष्ट असलेल्या कथा, कविता व ललितेतर साहित्याचे घट्ट नाते राहिले त्यामुळे वास्तवाची व्यामिश्रता, परंपरेचे संचित यासकट आधुनिकतेचे सत्त्व समजावून घेण्यास वाचकांना सहाय्य झाले. व्यक्ती व समस्टी यातील परस्पर संबंध त्यातील ताणेबाणे उलगडून दाखवणे, त्यातही मुख्यतः 'स्त्री' या घटकावर लक्ष केंद्रीत करणे आणि इतकी वर्षे कडेला, कोपऱ्यात लोटल्या गेलेल्या 'बाई'ला रंगभूमीच्या केंद्रस्थानी प्रकाशझोतात, ताठपणे व आत्मविश्वासाने उभे राहण्यास,सारे अवकाश मुक्तपणे वावरण्यास तिचे तिला स्वातंत्र्य आहे, हे ठणकावून व तिच्या या स्थानाला कोणी धक्का लावला तर हिमतीने दाद मागणे, कैफियत मांडणे व न्याय मिळवणे हा 'मिळून साऱ्याजणी'चा गाभा होता व आहे...

...'मिळून साऱ्याजणी'नी परिश्रमपूर्वक, चिकाटीने व सातत्याने रेखाटलेली कथारेषा अजून तरी उणीपूरी बत्तीस वर्षे ठसठशीत, ठळक आहे. यापेक्षा वेगळे फलित काय हवे?...


*rekha.sane@gmail.com*

# कथांच्या दालनात

## नीलिमा बोरवणकर



१९८९ ते १९९८ अशा दहा वर्षांच्या कथा मी वाचल्या. कथेचे विषय, व्यक्तिचित्रण, मांडणी, शीर्षक, एकूण परिणाम अशा वेगवेगळ्या कोनातून या कथांचा अभ्यास केला. यातल्या कित्येक कथा अतिशय सुंदर, वाचनीय, स्मरणीय वाटल्या, तर काही कथेच्या घाटात सुद्धा न बसणाऱ्या, एखाद्या बोधामृत पाजण्याच्या आविर्भावात लिहिलेल्या, किंवा एखादा अनुभव, किस्सा लिहिल्यासारख्या. मी प्रत्येक कथेची व्यवस्थित टिपणं काढली. त्या आधारे कथांविषयीची माझी ही निरीक्षणं.

शुभारंभाच्या ऑगस्टच्या अंकात आशापूर्णा देवींची मूळ बंगाली आणि वीणा आलासे यांनी मराठीत अनुवाद केलेली अप्रतिम कथा आहे. स्त्रीनं मुलांना कसं वाढवायचं, त्यांच्यावर संस्कार करताना स्वत:ची प्रगती कशी करावी, या विषयावर भाषण ऐकून उत्तेजित अवस्थेत घरी परतलेल्या स्त्रीला नवरा, सासू, मुलं कसे टोमणे मारतात, याचं चित्रण. एकूण स्त्रीला साधं मनाप्रमाणे एखादं भाषण ऐकण्याची मोकळीक मिळू न देणाऱ्या मानसिकतेची कथा. या बंगाली लेखिका, आशापूर्णा देवी १९९५मध्ये वयाच्या ८०व्या वर्षी मृत्यू पावल्या. असा हिशोब करता या कथेचा काळ सत्तर-ऐंशी वर्षांपूर्वीचा. आजही ही परिस्थिती पूर्णपणे बदलली नाही, हा विचार अतिशय क्लेशदायक.

सुरुवातीच्या प्रत्येक अंकात मान्यवर लेखकांच्या कथा वाचायला मिळाल्या, पुढे पुढे मात्र आशा बगे, सानिया, प्रिया तेंडुलकर, दीपा गोवारीकर, नीता गद्रे, मिलिंद बोकील, पंकज कुरूलकर ही सुप्रसिद्ध लेखक मंडळी फक्त विशेषांकात भेटली. डॉ. अजिता काळे, विद्युलेखा अकलूजकर यासारख्या परदेशस्थ लेखकांनी विपुल लेखन केलेलं दिसलं. त्यातून परदेशी जीवनशैलीत डोकावून बघता आलं. इंटरनेटच्या आधीच्या काळात जेव्हा फक्त पत्र संवाद होत असे, त्या काळात हे असं लेखन वाचणं हे तिकडच्या आयुष्यात डोकावायची संधी मिळाल्यासारखं वाटलं असणार, असं जाणवलं. तसंच प्रतिमा इंगोले आणि इतर ग्रामीण लेखकांमुळे ग्रामीण वास्तवाचं भान आलं.

अनुवादित कथा हा या मासिकाचा नेहमीच एक प्रमुख भाग राहिलेला जाणवला. महादेवी वर्मा, आशापूर्णा देवी, रझिया सज्जाद झहीर, माया प्रधान या सारख्या सुप्रसिद्ध लेखकांच्या साहित्याचा आस्वाद त्यामुळे मराठी वाचकांना घेता आला. मंदाकिनी भारद्वाज, विद्युत भागवत, रंजना गिरिधरगोपाल इ. अनुवादक सातत्यानं हे अनुवाद करताना दिसले. स्वातंत्र्यपूर्व काळातल्या सुधारक विचारसरणीच्या नायकापासून ते भिन्नधर्मीय, जातीच्या उतरंडीच्या, पुरुषप्रधान समाजातल्या स्त्री चित्रणापर्यंत विविधतेनं नटलेल्या भारतीय समाजाचा आरसा या अनुवादित कथांमुळे बघायला मिळाला.

एका वाक्यात सांगायचं तर तीस वर्षात माझ्या आजूबाजूच्या समाजात, विचारसरणीत, जीवनशैलीत, आणि मुख्य म्हणजे माझ्या व्यक्तिमत्वात आमूलाग्र बदल घडले असतानाही या कथा वाचताना, समृद्धतेचा अनुभव मिळाला. विद्याताईंवरच्या प्रेमानं अनेक सुप्रसिद्ध लेखकांनी या नवीन मासिकासाठी लिहिलं. तसंच लहान गावातल्या नवोदित लेखकांना विद्याताईंनी लिहितं केलं, त्यांना व्यासपीठ दिलं.

या प्रकल्पात सहभागी होण्याची संधी मिळणं हा माझ्यासाठी आनंदाचा भाग होता. माझ्या अनुभवाच्या पुंजीत मोलाची भर पडली हे निश्चित.

*borwankar.neelima@gmail.com*

# कथांच्या दालनात

## भारती पांडे



१९८९मध्ये मि.सा. मासिकाची सुरुवात झाली तीच मुळात 'परस्परांशी संवाद साधावा म्हणून परस्पर संवाद करू इच्छिणारं एक व्यासपीठ' हे या काळातल्या अनेक गृहितकांना धक्का देणारं होतं. कारण तोपर्यंत एखाद्या नियतकालिकाचं काम हे काही माहिती देणं, काही नवीन शिकवणं असं असतं हे एक मान्यताप्राप्त असं गृहीत होतं. एखादी कौटुंबिक कथा एखाद्या खाद्यपदार्थाची माहिती थोडीफार सौंदर्यसाधना आणि स्त्रियांना उपदेशपर असा एखादा लेख, फारफार तर वहिनींचा सल्ला यासारखं एखाद सदर हे सर्वसाधारणपणे स्त्रियांच्या मासिकाचं स्वरूप होतं. आणि महत्त्वाचं म्हणजे हेच स्वरूप असणं 'योग्य आणि बायकांच्या हिताचं' आहे असा समजही दृढ झालेला होता. या काळात 'मिळून साऱ्याजणी' या वेगळ्या वाटेने जाऊ बघणाऱ्या मासिकाची सुरुवात झालेली आहे. आपल्या मनातली कथा – कविता खदखद समाजासमोर मांडण्यासाठी मिसा हे योग्य व्यासपीठ आहे. याची खात्री स्त्रियांना लवकरच पटलेली दिसते. स्त्रियांच्या कथालेखनाला दिशा मिळावी म्हणूनच की, काय पण १९८९ च्या प्रारंभापासून प्रत्येक अंकामध्ये एक निमंत्रित

कथा देण्यास सुरुवात करण्यात आली. तसेच या दशकामध्ये 'रेऊकथा स्पर्धा' आणि दर महिन्याला भारतीय व परदेशीहि मान्यवर साहित्यिकांच्या कथांचे अनुवादही प्रसिद्ध करण्यास सुरुवात झाली. या कथांमध्ये अनेक भारतीय भाषांचा समावेश आहे. बंगाली, हिंदी, मैथिली, गुजराती, राजस्थानी, तमिळ, कन्नड, उर्दू, इंग्रजी या भाषांमधलं उत्तम साहित्य मिसाच्या वाचकांना वाचायला मिळाल आहे. वेगळ्या विषयांबद्दल बोलताना काही कथांचा उल्लेख करायलाच हवा. १९९९मध्ये डॉ. सतीश कुलकर्णी या लेखकान वेश्या जीवनावर एक अप्रतिम कथा लिहिली आहे. परंतु पुढच्याच अंकामध्ये मोहिनी निमकर यांनी त्या कथेवर सांस्कृतिक दृष्टिकोनातून जोरदार आक्षेप नोंदविलेला दिसतो. त्यानंतर या दशकात तरी या लेखकाची कथा दिसत नाही.

महानुभाव, जैन, ख्रिश्चन या धर्मामधील वैशिष्ट्ये उघड मांडणाऱ्या कथाही एक नवे जग वाचकाच्या समोर ठेवतात. मुस्लिम समाजातील बारकावे उघड करणाऱ्या कथा कमी असल्या, तरी उत्तम प्रतीच्या आहेत. २००६मध्ये वर्षभर चालणारी एक अनुवादित कथांची मालिका सादर केली गेली. बलात्कारासारख्या भयंकर अत्याचाराला सामोरं जावं लागलेल्या स्त्रीची शारीरिक, मानसिक, बौद्धिक स्थित्यंतर केंद्रस्थानी ठेवून लिहिल्या गेलेल्या या कथा आहेत. या कथांमुळे एक भयानक वास्तव मिसानं वाचकासमोर आणायला मदत केली. एक महत्त्वाची जाणवलेली गोष्ट म्हणजे स्त्रीविषयक कोणतंही लेखन कथा–कविता–लेख हे कधीच फक्त सामाजिक, फक्त स्त्रीविषयक, फक्त धार्मिक किंवा फक्त राजकीय असं असू शकत नाही, ही महत्त्वाची गोष्ट या दशकातल्या कथा वाचताना जाणवली.

*pande.bharati@gmail.com*

# कथांचे विश्लेषण

**प्रमोदिनी वडके - कवळे**



2009 ते 2019 या अकरा वर्षातील शक्य तेवढ्या जास्तीत जास्त कथांचा परामर्श घेण्याचा प्रयत्न मी केलेला आहे. त्याबद्दची ही काही निरीक्षणे.सगळ्यात जास्त कथा नातेसंबधांवर आधारित आहेत. याशिवाय सामाजिक समस्या, धार्मिक किंवा सामाजिक परंपरा, स्त्री अत्याचार, मनोविश्लेषनात्मक कथा, विज्ञानकथा, रहस्यकथा, राजकारण, शिक्षणक्षेत्रातला भ्रष्टाचार अशा वेगवेगळ्या विषयांवरच्या कथा वाचायला मिळाल्या. (निखळ विनोदात्मक कथा मात्र या अकरा वर्षात कुठेच आढळली नाही.) नात्यांबद्दलच्या कथांमध्ये नातेसंबंधांचे वेगवेगळे गुणाकार आहेत, पण केवळ दोन मित्रांच्या नात्यावर आधारलेली एकही कथा नाही. खेड्यातल्या कथांमध्ये अहं आणि स्वाभिमानाचे ताणेबाणे यापेक्षा आर्थिक विवंचना आणि रूढी, अज्ञान, व्यसन यांच्या जबरदस्त पगड्यामुळे उदभवलेले प्रश्न जास्त दिसून आले. कुटुंबातल्या बहुपदरी नात्यांचे ताणेबाणे सांभाळणाऱ्या कथा बहुतांशी स्त्रियांनी लिहिलेल्या आहेत. नात्यातले मैत्र सांगणाऱ्या कथा मात्र फारशा नाहीत. मिळून साऱ्याजणीमध्ये लहान मुलांच्या मानसिकतेबद्दलच्या कथा तर जवळ जवळ नाहीतच. स्त्रीची शारीरिक भूक आणि समलिंगी शरीरसंबंध असे नाजूक विषयदेखील मोजक्या कथांमधून हाताळले गेले आहेत. परंपरेच्या नावाखाली चाललेल्या गैरप्रकारांवर भाष्य करणाऱ्या दोन चारच कथा, पण त्या परिणामकारक आहेत. एकदोन कथा सोडल्यास जवळजवळ सगळ्या कथा शहरी भाषेत आहेत. आवश्यक तिथले फक्त संवाद ग्रामीण भाषेत आहेत. इंग्रजी शब्दांचा वापरही बराच आढळला. काही ठिकाणी तो आवश्यक असला तरी बऱ्याच ठिकाणी टाळता येण्यासारखा होता. खूपशा कथा अगदी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आल्या असल्या तरी, त्या कथांमध्ये तिथलं जीवन उतरलेलं नाही. आवश्यक तिथे फक्त त्या त्या ठिकाणच्या बोलीभाषेचा वापर आलाय पण तिथल्या वातावरणाचा गंध मिसळलेला नाही. या दशकात जाणवलेला आणखी एक बदल म्हणजे परदेशातल्या मराठी लेखिकांच्या कथा फारशा आढळल्या नाहीत. रेऊ कथा स्पर्धेतल्या अनेक कथा वाचताना त्यात वाङमयीन गुणांकडे लक्ष दिले जात नाही. कारण त्या विषयांचा आणि अनुभवांचा सच्चेपणा ! अनेक कथा विषयांच्या दृष्टीने सरस आहेत. या स्पर्धेने साऱ्याजणीला ज्यांच्याकडे पुढच्या लेखनासाठी आशेने पहावं असे अनेक लेखक दिले आहेत. कथाविषयक सदरांविषयी बोलायचं झालं तर 'तिच्या शाईच्या कळा' हे एक चांगलं सदर... कथांची निवडही यथायोग्य !

*ashwini.kawale@rediffmail.com*

# कविता विश्व

## नीरजा



साऱ्याजणीतील गेल्या एकतीस वर्षांतील कवितांकडे पाहिलं तर लक्षात येतं की या अंकात इंदीरा संत, शांता शेळके, सरिता पदकी, अनुराधा पोतदार, प्रभा गणोरकर, रजनी परुळेकर, अनुराधा पाटील, वसंत आबाजी डहाके, हेमंत जोगळेकर, नारायण कवठेकर कुलकर्णी, गुरुनाथ सामंत यांसारख्या मान्यवर कवींपासून ते आज लिहिणाऱ्या कल्पना दुधाळ, बालाजी सुतार यांसारख्या कवीपर्यंत साऱ्यांचेच शब्द उमटलेले आहेत. मराठी कवितेत आज मान्यता पावलेल्या प्रत्येक कवी आणि कवयित्रींनं मिळून साऱ्याजणीच्या अंकात हजेरी लावलेली आहेच पण त्याच सोबत गावशहरातल्या व्यक्त होऊ पहाणाऱ्या साऱ्याच संवेदनशील मनांना या अंकात स्थान मिळालं आहे. स्त्रीच्या वेदनेचा हुंकार, तिच्या शोषणाचा लेखाजोखा मांडणाऱ्या कवितेबरोबरच स्त्री आणि पुरुषांच्या व्यक्तित्त्वाला स्वतंत्र अस्तित्व देणारी, त्यांचा प्रवास एकमेकांच्या सोबतीनं आणि एकमेकांना समजून घेत व्हावा असा प्रयत्न करणारी, स्त्रीच्या दुय्यमत्त्वाचा विचार करून तिला पंख पसरायला मोकळा अवकाश देणारी कविता लिहिली गेली.

स्त्रीपुरुषांत मुक्त आणि समृद्ध असा संवाद व्हावा यासाठी हे मासिक सुरु झाले. त्या काळात आणि पुढेही या मासिकाच्या संपादिका विद्या बाळ आणि गीताली वि.मं. केवळ स्त्रीपुरुषांचे नाही तर माणसांचे म्हणून जे काही प्रश्न आहेत, नातेसंबंधातली जी काही गुंतागुंत आहे, जगण्याचा संघर्ष आहे, राजकीय आणि सामाजिक भूमिका आहे ती व्यक्त करणारी कथा कविता यांचा शोध घेत राहिल्या. १९९१ मध्ये रत्नागिरीच्या साहित्य संमेलनात मी वाचलेली आईस पत्र ही कविता ऐकून विद्याताई मला शोधत माझ्यापर्यंत पोचल्या आणि मिळून साऱ्यजणीशी मला कायमचं बांधून टाकलं. गेल्या तीस वर्षांच्या काळात लिहिणारे प्रतिथयश तसेच नव्यानं लिहू लागलेले सगळे कवी आणि कवयित्री यांच्याशी संपर्क साधून त्यांच्याकडून विद्याताईंनी लिहून घेतलं आहे.

मिळून साऱ्याजणीची वैचारिक भूमिका सुरुवातीपासून स्पष्ट असल्यानं या कवितांत केवळ स्त्रीच्या दुःखाची, शोषणाची कविता प्रसिद्ध झाली नाही तर तिला आलेल्या आत्मभानाची, आत्मशोधाची तसेच पुरुषाला जाणवत गेलेल्या आपल्यातल्या माणूसपणाची कविता प्रसिद्ध केली गेली. या मासिकाचा केंद्रबिंदू केवळ मुंबई पुण्यासारखी शहरं कधीच नव्हती. त्यामुळेच गावखेड्यातल्या अनेक कवी आणि कवयित्रींना एक हक्काचं मंच मिळून साऱ्याजणीनं दिला. त्यामुळे त्यात प्रकाशित झालेल्या कवितेत शहर आणि महानगरातील यंत्रवत, तुटलेलं, परात्म जग जसं पुढं आलं तसंच ग्रामीण भागातील शेतीप्रधान जग उभं राहिलं. त्यांच्या जगण्याच्या संघर्षाची कविता प्रामुख्यानं आल्यानं अनेक कवी लिहिते झाले. अजय कांडर, नीलम माणगावे, ऐश्वर्य पाटेकर, कल्पना दुधाळ यांसारख्या अनेक कवींनी मिळून साऱ्याजणीचा काव्यविभाग समृद्ध केला.

कविता महाजन यांच्या गाजलेल्या मालक या मालिकेतल्या कविता इथंच प्रसिद्ध झाल्या.

मला मुक्त करायची भाषा, बोलू नका मालक माझ्यावरच्या आत्यंतिक प्रेमासाठीसुद्धा... बाहेर असंख्य साखळ्या असंख्य पिंजरे असंख्य चाबूक आणि शिळे तुकडेघेतलेले हात टपून आहेत मालक मला राहूद्यात तुमचीच गुलाम... अशी या समाजव्यवस्थेवर वार करणारी औपरोधिक कविता लिहिणारी कविता महाजन असो की आज नावारूपाला आलेल्या प्रज्ञा दया पावार, अंजली कुलकर्णी, आसावरी काकडे यांसारख्या कवयित्री असोत मिळून साऱ्याजणीच्या कवयित्री होण्याचा सार्थ अभिमान बाळगणाऱ्या या कवयीत्रींनी स्वतःला या चळवळीशी कायम जोडून घेतलं.

अर्थात या मासिकाला प्रेम, निसर्ग यांच वावडं कधीच नव्हतं. त्यामुळेच जगण्यातील संघर्षाबरोबरच, प्रेम, आनंद शोधणारी कविताही या पानांवर विराजमान झाली. बालकविता, गझल, मुक्तछंद, गीतं आणि अनेक आनामिक आवाजांचा शोध हे मासिक घेत राहिलं.

मराठी भाषेप्रमाणेच इतर भाषांतील साहित्यात काय चाललं आहे ह्याचं भान या संपादकांना होतं त्यामुळेच इतर भारतीय भाषांतील कवयित्रींनाही मिळून साऱ्याजणीनं अगदी मानानं त्यांच्या पानावर स्थान दिलं. मल्याळी कवयित्री सावित्री राजीवन, पंजाबी कवयित्री मनजित टिवाणा, तेलगू कवयित्री ए. जयप्रभा, बंगाली कवयित्री अनुराधा महापात्र, उरिया कवयित्री प्रवासिनी महाकुंड अशा अनेक कवयित्रीच्या कवितांचे मराठी अनुवाद साऱ्याजणीमध्ये प्रकाशित झाले आहेत. तसलिमा नसरीन यांच्या वासुदेव जोगळेकर यांनी केलेल्या अनुवादित कवितांनी मिळून साऱ्याजणीला एक वेगळाच आवाज दिला. गेल्या एकतीस वर्षांत मिळून साऱ्याजणीनं आशय, रूपबंध आणि शैलीच्या अंगानं परिपूर्ण कविता जशी छापली तशीच नव्यांची थोडी कच्ची पण वाढू शकेल अशा शक्यता दिसणारी कविताही छापली. व्यक्त होणांऱ्या प्रत्येकाला कायम प्रोहत्सान दिलं. एकूणच मिळून साऱ्याजणीनं मराठी कवितेची समृद्ध परंपरा जपली आणि ती वाढण्यासाठी त्यात अत्यंत मोलाची भर टाकली.

*nrajan20@gmail.com*

# मैतरणी ग मैतरणी आणि झुंजूमुंजू

## श्रीकांत ढेरंगे



‘मिळून साऱ्याजणी’ या मासिकाच्या १९८९ ते २०२० पर्यंतच्या या जवळजवळ तीस वर्षांमधील ‘मैतरणी ग मैतरणी’ आणि ‘झुंजूमुंजू’ या दोन सदरांच्या आशय लेखनाचे (इंग्रजीत कंटेंट रायटिंग) काम माझ्याकडे होते. सुवर्णा मोरे या माझ्या मैत्रिणीकडून हे काम मला मिळाले. या सदरांमधून अनेक प्रकारचे स्त्रियांचे अनुभव, कविता, कथा, परिषदा, मेळावे किंवा महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये या मासिकाच्या संपादक विद्याताई बाळ आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी स्त्रीप्रश्नांवर केलेलं काम या प्रकारचे लेखन केले गेले. अर्थात, हे सगळं माझ्या दृष्टीने अवघड होतं. ते कमी कालावधीत पूर्ण करून देणं अपेक्षित होतं. या सगळ्या सदरांमधील कन्टेन्ट हा आपल्या भवतालच्या ओळखीचाच होता. कारण, बहुतांश या सदरांमधील लेखन हे ग्रामीण पार्श्वभूमी असलेलं असंच होतं. काही ठिकाणी आपण नेमकं काय लिहायचं, हे बरेचदा सुचत नसायचं. कारण लिहिणाऱ्या स्त्रीचे अनुभवच इतके दाहक असायचे की, आपण लिहिताना बरेचदा स्तब्धता असायची. अशा स्त्रियांना आपले अनुभव मांडण्याचा किंवा बोलण्याची संधी ‘मिळून साऱ्याजणी’च्या माध्यमातून मिळत गेली. ही महत्त्वाची गोष्ट आहे. हे फार सोपे काम नव्हते. इतक्या साऱ्या वर्षांचे काम वाचून ते इथे साररूपात किंवा त्यातला आशय काय आहे, हे अधोरेखित करत मांडणे दडपणाचेच काम होते. परंतु हे काम करण्याची मला संधी मिळाली. नेमकी सदराची सुरुवात विविध प्रकारच्या आजारांविषयी, कायद्यांविषयी, सामाजिक कुप्रथांविषयी वाचून ते योग्य थोड्या शब्दात मांडणे, त्यातल्या कविता, कथा किंवा परिषदांच्या माध्यमातून आलेले अनुभव योग्यरीत्या मांडणे हे सगळे आपल्या कामाचा भाग होते गेले. सगळ्या प्रत्यक्ष अनुभवाधारित घटनांचे सार लिहिणे हे माझ्यासाठी नवे होते. या सर्व एकतीस वर्षांचा कंटेंट करून देणे ही माझ्यासाठी नवी गोष्ट होती. या मासिकाच्या आधारे बऱ्याच गोष्टी मांडल्या गेल्या. किमान हा तीस वर्षांचा सर्व कन्टेन्ट वाचताना तीस वर्षात स्त्रीप्रश्न किंवा लिंगभावाला घेऊन नेमक्या काय घडामोडी घडल्या. त्यात स्त्री पुरुषांची, सरकारची, विविध स्वयंसेवी संघटनांची काय भूमिका राहिली. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शारीरिक बदलांच्या घटनांचा धांडोळा यातून कसा घेतला गेला. अशा बऱ्याच गोष्टींचं या मासिकाच्या माध्यमातून एक प्रकारचं डॉक्युमेंटेशन तयार केलं गेलं आहे. अर्थात, त्याला मर्यादा आहेतच. त्या अनेकांगी आहेत. परंतु अनुभवजन्य अशा सगळ्या गोष्टी सातत्याने मांडणं हे मोठं काम आहे. ते या मासिकाने सलगपणे इतकी वर्षे केलं, ही मोठीच गोष्ट आहे.

*dheranges03@gmail.com*

## प्राजक्ता महाजन



१९९१, ९२ आणि ९४ साली ‘कवडसे’ नावाचं सदर होतं. ज्याकाळी बाहेरच्या जगाची आपल्यापर्यंत पोचणारी माहिती मर्यादित होती, त्या काळात जगातल्या वेगवेगळ्या घडामोडी ह्या कवडशांमधून समोर येत होत्या. ह्या फक्त बातम्या वाटत असल्या, तरी वेगवेगळ्या देशांमधल्या महिलांचे प्रश्न, त्यांचे लढे आणि त्यांना मिळणारा पाठिंबा वाचकांपर्यंत पोहोचत होता. थेट काही विचार न सांगता उदाहरणं समोर मांडलेली असायची.

*mahajan.prajakta@gmail.com*

## शीतल साठे



पहिले सदर‘ चित्रसंवादिनी’ या नावाचे होते. महिला चित्रकारांच्या बोलक्या रेषांचा आढावा घेत त्यांच्या चित्रांची भाषा याविषयीची चर्चा करण्यात आलेली आहे. ‘शब्द प्रवासिनींचे’ या सदरातून महिलांच्या प्रवासवर्णनांची साहित्यिक सफर केलेली आहे. अशाच भन्नाट सदरांपैकी ‘उलटसुलट’ नावाचं सदर आहे. उच्च जातीयांच्या मनातील जातीचा अहंगंड, पुरुषांच्या नेणिवेतील उलाढाली, सामाजिक प्रश्नांकडे बघण्याचे अनेक प्रवाह, मत याचा धांडोळा यात आहे.

तिसरे सदर ज्येष्ठ स्त्रीवादी अभ्यासक विद्युत भागवत यांचं अनुवादित कथांचं आहे. लॅटीनअमेरिकेतील लेखिका यांनी लिहिलेल्या कथांचा हा संग्रह म्हणजे एक महत्वाचा दस्ताऐवज आहे. कथा म्हणजे स्त्री जीवनाचा त्यातल्या गुंतागुंतीचाअफाट पसारा आहे. जयभीम!

*Shitalsathe8@gmail.com*

# विशेष ओळखी

## सरिता आव्हाड



१९८९च्या ऑगस्टपासून सुरू झालेल्या 'मिळून साऱ्याजणी'च्या प्रत्येक अंकात एक विशेष ओळख असते. १९८९ ते २०१९ या ३० वर्षांत प्रकाशित झालेल्या विशेष ओळखींचा हा आढावा आहे.

या ओळखी वाचून झालेली माझी पहिली प्रतिक्रिया चकित होण्याची होती. कारण, प्रत्येक ओळख हे एक गोळीबंद चरित्र होतं. अपारंपरिक शैलीत लिहिलेलं. त्या त्या स्त्रीच्या कामाचा, स्वभावाचा, तिच्या कौटुंबिक परिस्थितीचा अंदाज येत होता. या ओळखीच्या अवकाशाचे एक ऐतिहासिक महत्त्व आहे. विसाव्या शतकाच्या अखेरीपासून एकविसाव्या शतकाच्या सुरवातीपर्यंत काय सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थिती होती, सुशिक्षित मुख्यतः शहरी स्त्री-जीवन कसे होते, कशा प्रकारे तिचे कर्तृत्व घडत होते, याचा हा धावता आलेख आहे. तिच्या कामाची नीट कल्पना यावी म्हणून कामाच्या क्षेत्राचे मी दहा विभाग केले. उदाहरणार्थ, चळवळ, सामाजिक काम, कला क्षेत्र इत्यादि. यामुळे ओळखींचा आढावा घेणे सुकर झाले.

इथे मला आवर्जून सांगायला हवे की, यात काही पुरुषांच्यासुद्धा ओळखी आहेत. हे असे पुरुष आहेत ज्यांचे विचार आणि कृती समतेच्या, न्यायाच्या, मूल्यांवर आधारित आहे.

आणखी एक उल्लेखनीय गोष्ट म्हणजे सगळ्या ओळखी एका एका व्यक्तीच्या नाहीत तर त्यात काही जोडपीसुद्धा आहेत. या ओळखी फक्त त्या त्या व्यक्तीच्या न राहता सहजीवनाच्या होतात. या विशेष ओळखींमध्ये त्यांचा आवर्जून समावेश झाल्यामुळे नकळत सहजीवनामध्ये समतेच्या तत्त्वाची होत असलेली रुजवण लक्षात येते. त्यामुळे, संख्येने कदाचित कमी असलेली अशी जोडपी ऐतिहासिकदृष्ट्या अनमोल आहेत.

आणखी एका मुद्द्याकडे मला लक्ष वेधायला हवे. ते म्हणजे या ओळखी लिहिणाऱ्या लेखक आणि लेखिका. ज्यांच्या ओळखी आहेत, त्या बहुसंख्य स्त्रियाच जशा आहेत, तसेच ओळखी लिहिणाऱ्यासुद्धा बहुसंख्य स्त्रियाच असल्या तरी भा.ल.महाबळासारखे पुरुष लेखक अगदी हाताच्या बोटावर मोजता यावेत असे आहेत. रंजना गिरीधर गोपाल, अनु भागवत, आशा साठे, उज्ज्वला मेहेंदळे अशा काही लेखिकांचा ओळखी करून देण्यात हातखंडा दिसतो. या लेखिकांनी करून दिलेल्या ओळखी अशा प्रकारच्या लेखनाचा वस्तुपाठ ठरावा इतक्या रोचक आणि नेमक्या आहेत.

यातल्या अनेक ओळखी वाचून 'कहाँ गयें वो लोग' असा प्रश्न पडला. तो ज्यांची ओळख लिहिली त्यांच्या संबंधात जसा होता तसाच ज्यांनी ओळख लिहिली त्यांच्याही संदर्भात होता.

या ओळखी वाचल्यावर लक्षात येते की, ओळखीसाठी झालेल्या स्त्रियांच्या निवडीतून संपादकांची स्त्रीविश्वाकडे पाहण्याची परिदृष्टी लक्षात येते. विशेषतः सुरुवातीच्या दहा वर्षात अगदी सर्वसामान्य स्त्रिया– फळे विकणाऱ्या, पाथरवटाचे काम करणाऱ्या, ग्रामीण आरोग्य सेविका, दवाखान्यातल्या आया, घरेलू कामगार अशा स्त्रिया विशेष ओळखीच्या मानकरी झाल्या आहेत. अशा दुर्लक्षित स्त्रियांमधले विशेष गुण बघण्याची नजर संपादकांची होती त्याचा हा परिणाम.

या ओळखी बघितल्यावर आणखी एक जाणवते की, ग्रामीण स्त्रिया त्यामानाने कमी आहेत. मुसलमान समाजातल्या स्त्रिया आहेत; पण ख्रिश्चन धर्मीय स्त्रिया मात्र दिसल्या नाहीत. त्याच प्रमाणे परिवर्तनाचे राजकारण करणाऱ्या लढाऊ स्त्रिया असल्या तरी प्रस्थापित राजकारणात सक्रिय असलेल्या स्त्रियांच्या ओळखी नाहीत. ओळखी लिहिणाऱ्या सर्व शहरीच आहेत. म्हणजे ग्रामीण स्त्रियांबद्दल लिहिणाऱ्या स्त्रियासुद्धा शहरीच आहेत. याचा अन्वय मी असा लावते की, शहरी स्त्रियांना ग्रामीण स्त्रीजीवनाबद्दल उत्सुकता आहे. ग्रामीण स्त्रियांच्या कर्तृत्वाबद्दल कौतुकमिश्रित आदरभाव आहे. एकूण या कालखंडात असलेला स्त्री जीवनाचा पोत ग्रामीण आणि शहरी या दोन्ही अंगांसकट समग्रपणे यातून जाणवतो.

*sarita.awad1@gmail.com*

## नीलिमा गावडे



"भाषा जीवनाच्या काठाने", "स्त्री भान जागविताना" आणि "पुरुषभान"ही सदरे वाचकाला स्वतःच्या जीवनात डोकावायला,स्वतःला प्रश्न विचारायला आणि थांबून त्यावर विचार करायला भाग पाडतात. "भाषा जीवनाच्या काठाने" या सदरात निसर्गाशी माणसाचं नातं जोडत मांडणी केली आहे. हे सदर वाचकाला स्वतःचे व्यक्तिगत जीवन आणि त्याचा भवताल याचा विचार करायला भाग पाडते. कोणत्याही घटनेचे विवेचन करताना त्याचे व्यक्तिगत, सामाजिक आणि वस्तुनिष्ठ आयाम पाहण्याचे महत्व इथे लक्षात येते.

तसेच आज (पोस्ट ट्रूथ) सत्योत्तर च्या काळात जगत असताना भाषेचे राजकारण बेमालूमपणे खेळले जात आहे. सत्ताधाऱ्यांच्या भाषेचा संबंध व्यक्तीपासून आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत जोडून कसा पाहायला हवा हे या सदरातील

चर्चेतून अधोरेखित होते.

स्त्री भान जागृत करण्यासाठी पुरुषसत्ताक समाजाने, धर्माने घातलेल्या नीती-नियमांच्या चौकटीला छेद देऊन व्यक्ती म्हणून आपला विवेक जागृत करण्याची प्रक्रिया गरजेची आहे.आपल्या विचारांचा विस्तार करणारं आत्मभान ते विश्वभान यांचं महत्त्व या सदरात नमूद केले आहे. जागतिकीकरणाने आणलेल्या चंगळवादी संस्कृतीतून आलेली आत्मकेंद्रितता आत्मभानाशी जोडण्याची गल्लत आपण करता कामा नये.

आधुनिकता आणि स्त्रीवादाची सांगड कशी घालायची यावर सखोल चर्चा या सदरात झाली आहे. भारतातील व्यवस्थेत स्त्री म्हणून घडण्यातच तिच्या दास्यत्वाची मुळे आहेत; तो पुरुषसत्तेचाच भाग आहे. स्त्री प्रश्न किंवा जातविरोधी चळवळी असोत, कोणत्याही प्रश्नाकडे ऐतिहासिक अंगाने कसे बघायचे याचा विकास चळवळीत झाला नाही  कोणत्याही प्रश्नाचे समग्र आकलन बनविण्यासाठी चळवळीची वैचारिक बैठक असायला हवी. अमूर्तीकरण करण्याचा प्रयत्न चळवळीत झाला कि ते वास्तवाला सोडून आहे अशी टीका केली गेली त्यामुळे चळवळीचे मोठे नुकसान झाले आहे

कोणत्याही प्रश्नाकडे सामुदायिकपणे बघण्याचा दृष्टीकोन लोप पावत गेला.  स्त्री मुक्तीचा विचार जात-वर्ग स्तरापलीकडे जाऊन मांडायचा असेल तर स्त्रीमुक्तीचा पहिला टप्पा शोषणमुक्तीची चळवळ हा असू शकतो. स्त्रीवाद जी काही मूल्ये मानतो ती केंद्रस्थानी ठेवून राजकारणाची जुळवाजुळव करावी लागेल. सदोष वास्तव लक्षात घेऊन स्वतःला मूल्यात्मक स्पष्टता आणावी लागेल. स्वतःच्या मूल्यांच्या बाबतीत स्वतःचे परीक्षण करून समाजाने पुरुष म्हणून घडवलेल्या व्यक्तीचा माणूसपणाकडे जाणारा प्रवास जाणीवपूर्वक करावा लागणार आहे. त्यासाठी स्वतःच्या भावना आणि विचारांकडे तटस्थपणे पाहावे लागणार आहे हा संदेश पुरुषभान हे सदर देते. बलात्कारासारख्या घटनेच्या माध्यमातून येणाऱ्या माणसाच्या क्रौर्याचा शोध घ्यायला हवा.

ह्या सदरांच्या माध्यमातून आलेले विचार चर्चा, वाद-संवाद होण्यासाठी, मिळून साऱ्याजणी हे मासिक महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर देशा-परदेशात कुठे कुठे आणि कोणापर्यंत पोचत आहे याची एक झलक “संवाद स्पंदन” या सदराच्या माध्यमातून समोर येते.

*gavadenilima@gmail.com*

# नवीन प्रश्नांसाठीची ऊर्जा

**स्नेहा गोळे**



गौरी देशपांडे यांची नवीन पिढीला सकस ओळख करून देण्यामध्ये गौरी देशपांडे विशेषांकाचे मोठे योगदान आहे. ७०च्या दशकातील स्त्री मुक्तीच्या चळवळीच्या नवीन वळणाचा संदर्भ तसेच स्त्रीच्या व्यक्ती म्हणून जगण्यातील गुंतागुंती, मुक्ती म्हणजे काय या भोवती सार्वजनिक वर्तुळात/ चळवळींमध्ये चर्चा होण्याचा तो काळ होता. ह्या समूहाचा गौरी देशपांडे कशा पद्धतीने भाग होत्या, त्यांच्या ह्या प्रश्नांच्या समजाकडे महाराष्ट्रातला 'पुरोगामी' समूह कसा बघत होता आणि यातून वैचारिक आणि संकल्पनात्मक पातळीवर काय पुढे येत होते याचे उत्तम प्रतिबिंब आपल्याला ह्या विशेषांकातून बघायला मिळते.

गौरी देशपांडे यांच्या कुटुंबीय, निकटवर्तीय यांनी लिहिलेल्या आठवणी ज्या त्यांच्या जीवन, साहित्य, लिखाणाची ओळख करून देतात हे एक. दुसरे त्यांच्या वाचकांनी विविध लेखाकृतींची केलेली समीक्षा आणि अन्वयार्थ आणि त्यांचे गौरी देशपांडे नावाच्या व्यक्तीशी आणि लेखन व्यवहाराशी असलेले नाते या बद्दलचे लेख. गौरी देशपांडे या व्यक्ती आणि लेखन व्यवहाराशी मतभेद असले तरी त्याची दखल घेणे का आवश्यक आहे याचे भान कुठेही हरवत नाही. अनेक वेळा व्यक्तीच्या जाण्यानंतर केवळ तिचे गौरवीकरण करायचे किंवा तिला खाली खेचायचे अशा द्वैत प्रतिक्रिया येतात. ह्या अंकात गौरी देशपांडे यांच्या बद्दल वाटणाऱ्या जिव्हाळ्यामुळे चिकित्सक नजरेतून त्यांचा जो वेध घेतला आहे, त्याची धार कमी होत नाही. हा विशेषांक सांस्कृतिक-सामाजिक संदर्भातला महत्वाचा दस्तऐवज ठरतो, तो आहे देशपांडे आणि श्री. पु. भागवत यांच्यातील पत्रव्यवहाराचे प्रकाशन.

केवळ गौरी देशपांडे व्यक्ती आणि तिचा साहित्य व्यवहार समजून घेण्यासाठीच नाही तर महाराष्ट्रातील स्त्रीवाद नावाच्या विचाराचा इतिहास, स्त्री मुक्ती चळवळ आणि विचार, व्यक्ती-समष्टी यांच्या अन्योन्य संबंधांविषयी झालेली चर्चा, व्यक्ती होण्यामधील खाच-खळग्यांचा आणि त्यात साहित्यातून, स्वतःच्या जगण्यातून अपूर्ण, सदोष मात्र तरीही प्रगल्भ उत्तरे शोधण्याचे केलेले प्रामाणिक प्रयत्न आणि प्रयोग हे सगळे ज्यांना समजून घ्यायचे आहे, जाणून घ्यायचे आहे त्यांच्यासाठी हा विशेषांक बहुमोल आहे.

नव-उदारमतवादी भांडवली व्यवस्थेमध्ये मानवी नातेसंबंध आणि त्यांची मूल्ये आपल्या दैनंदिन जीवनात कशी टिकवून ठेवायची याचा सामना करणाऱ्या नवीन पिढीसाठी ह्या विशेषांकात उत्तरे नसली तरी नवीन पद्धतीने प्रश्न विचारण्याची ऊर्जा नक्कीच मिळू शकेल.

**- स्नेहा गोळे**
*स्त्री आणि लिंगभाव अभ्यास विभाग,*
*सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ*
*gole.sneha@gmail.com*

# कविता विश्व

## सीमा नाईक - गोसावी



बारामतीच्या प्रतिनिधी

१९८९ ते १९९९ या दशकातील कवितांचा अभ्यास करताना स्त्रीवादी दृष्टिकोन स्वीकारला आहे. १९७५ ला आंतरराष्ट्रीय महिला वर्ष साजरे झाले सर्वत्र स्त्रियांच्या प्रश्नांच्या आयुष्याचा, परिस्थितीचा बोलबाला व चर्चा सुरू झाली. स्त्रियांच्या प्रश्नांवर जागृती होऊ लागली. स्त्रियांची बाजू, कैवार मोठ्या प्रमाणात मांडला जाऊ लागला. या सर्वांचे पडसाद व प्रभाव मि.सा.तील कवितांमधून दिसतो.

मि.सा.तील कविता समकालीन संदर्भ घेऊन येते. स्त्रियांच्या अस्तित्वाचा प्रश्न मांडते. तिची जाचक, पारंपरिक प्रथांना झिडकारण्याची वृत्ती दिसते. परंपरागत चालत आलेला अन्याय, अत्याचार, अमानुष वागणूक यावर कवी, कवयित्री आवाज उठवताना दिसतात. माणूसपणाची अपेक्षा व्यक्त करताना दिसतात. ही 'मानुषी' कविता आहे. 'घर' हा तिचा जिव्हाळ्याचा विषय आहे. स्त्रीला दुय्यमत्व देणाऱ्या प्रथा, परंपरा, हुंडाबळी, कौटुंबिक हिंसा, स्त्रियांची उपेक्षा, कोंडमारा, छळ, मानसिक दडपणे अशा अनेक प्रश्नांना व विषयांना ही कविता प्राधान्य देते जुनाट रुढी, अनिष्ट प्रथा यांवर ही कविता कोरडे ओढते. जाहीर निषेध नोंदवते. या कवितेत समंजसपणा जाणवतो. ती तोडण्यापेक्षा जोडण्याची भाषा, प्रयत्न करत जाते. हे या कवितेचे वेगळेपण आहे.

मि.सा.तील कवितांमध्ये अंधारगृह, अंधारगर्भ, अंधारगुहा, काळोखकळा या प्रतिमा गर्भासाठी वापरल्या आहेत. अहिल्या, मीरा, राधा, श्रीकृष्ण, राम, कौंतेय अशा पौराणिक प्रतिमा पुनर्मांडणी करण्याच्या उद्देशाने येतात. नवा अन्वयार्थ त्यातून प्रतीत होताना दिसतो हे मि.सा. चे वेगळेपण!

स्त्रियांचे जग, अनुभवविश्व, त्याची व्यापकताच उकलायला व स्त्रियांचे आत्मभान जागे करायला मि.सा.मुळे अवकाश मिळाला.

स्त्रिया मोठ्या प्रमाणात लिहित्या झाल्या. मि.सा.ने स्त्रीप्रश्नांची सखोल चिकित्सा केली, स्त्रिया या 'माणूस' आहेत. हा विचार रुजवला. त्यासाठी जाणीवा-जागृतीचा कंदील हाती घेतला. स्त्रीला आत्मनिर्भर व विचारप्रवण बनविले.

मि.सा.तील कवी-कवयित्री सर्व समाजगटांतून आलेल्या आहेत. महाराष्टातून व बृहन्महाराष्ट्रातील सर्वभागातून काव्यलेखन आलेले आहे. अगदी परदेशातूनही मि.सा.ला मोठा प्रतिसाद मिळतो.

एकूणच मि.सा.ने 'स्त्रीप्रश्न' व 'स्त्री-विश्वा'वर समाजाला संवादी बनवले. साकल्याचा प्रदेश बोलका केला. समाजपरिवर्तन व विचारमंथन होण्यास काही प्रमाणात का होईना गती मिळाली 'मिळून साऱ्याजणी' मासिकासारख्या अंधार नाहीसा करणाऱ्या मिणमिणत्या पणत्या अधिक संख्येने उजेड देऊ लागतील तेवढा काळोख कमी होईल!

*seemanaik69@gmail.com*

## आपुलकीचं आवाहन

सस्नेह नमस्कार,

ऑगस्ट २०१९ला 'साऱ्याजणी'नं ३० वर्षं पूर्ण केली. त्यानिमित्तानं आम्ही 'मिळून साऱ्याजणी' ह्या आपल्या मासिरकाच्या संदर्भात नवनवीन कल्पना आणि उपक्रम यांच्या योजना आखल्या.

आपल्या भोवतीच्या मुख्य प्रवाहाकडे, त्यातल्या गलबल्याकडे बघताना, आपला खरा स्वर वेगळाच आहे हे लक्षात येतंच आणि तो जपण्याची गरजही भासते. ऐकणं, बघणं, वागणं, बोलणं यांच्या बहुतेक पातळ्यांवर इतका दिखावा, पोकळपणा, उथळपणा जाणवतो की, तिथे थांबावसं वाटत नाही. पण असं निरीक्षण फक्त नोंदवून काय होणार? या जाणिवेतूनच 'साऱ्याजणी' आपली भूमिका, आपला ध्यास, घट्टपणे जपण्याचा प्रयत्न करत आहे. त्यासाठी नवनवीन वाटा शोधण्याचा प्रयत्न करते आहे.

वाचकांनी स्वत:शी आणि परस्परांशी संवाद करावा यासाठी नवीन काही करू इच्छिते आहे.

विचार, संवेदनशीलता, सामाजिक न्याय, माणुसकी, समता या साऱ्यांचं अस्तर असणारं, विचार करायला लावणारं आणि तरी वाचनीय असं साहित्य सातत्यानं देता येईल, अशी आमची धडपड आहे. या सगळ्यासाठी 'साऱ्याजणी'विषयी आस्था बाळगणाऱ्या तुमच्यासारख्या सगळ्यांची साथसोबत अतिशय आवश्यक वाटते. आपल्या परस्परांबद्दलच्या आपलेपणातून, म्हणूनच हे आवाहन करत आहोत की, 'साऱ्याजणी'च्या विकासासाठी, आहे ते सांभाळत, नाविन्याची भर घालण्यासाठी, तुम्ही जमेल तेवढा आर्थिक हातभार लावावा.

तुम्हा आम्हामधल्या नात्यामुळेच या हातभाराला 'अनुबंध निधी' असं नाव दिलं आहे. आता विद्याताईंच्या निधनानंतर आणि कोरोना महामारीच्या संकटात तर आपल्या भरीव आर्थिक सहकार्याची अधिकच गरज आहे. ऐच्छिक प्रतिसादाची वाट पाहत आहोत.

**धन्यवाद,**
**गीताली वि. मं.**

# वैविध्यपूर्ण सदरं

## वंदना पलसाने



'मिळून साऱ्याजणी' मासिकाने गेल्या तीन दशकांच्या आपल्या वाटचालीत मोठा वैशिट्यपूर्ण टप्पा गाठला आहे. स्त्रियांच्या प्रश्नांना दृश्यता मिळवून देणे, हा जरी या मासिकाचा उद्देश असला तरी इथे पुरुषांचे प्रश्न, स्त्री-पुरुषांच्या नात्याची गुंतागुंत, पुरुषांचे दृष्टिकोन यांचासुद्धा समावेश असतो. अनेक स्त्री-पुरुष लेखक आणि वाचक मासिकाशी अगदी सुरुवातीपासून जोडलेले आहेत. विद्या बाळ, गीताली वि.मं. यांनी हा समतोल कधी ढळू दिला नाही. त्यामुळे जेव्हा मला विचारले गेले की, 'विद्या बाळ अध्यासन प्रकल्पा'च्या अंतर्गत काही सदरांचा चिकित्सक आढावा घेणारा लेख लिहिणे मला शक्य आहे का, तेव्हा मी त्याला आनंदाने होकार दिला.

२००९ ते २०१९ दरम्यान जी विविध सदरे 'मिळून साऱ्याजणी' या मासिकामध्ये आली, त्यातील काही सदरांचे चिकित्सक विश्लेषण या लेखात आहे. स्त्रीयालिटी, मुस्लीम मनाचा कानोसा, 'अ'मूल्य कथा, तिरपागड, हमशक्कल, बळी राजा-राणीचं चांगभलं, अनवट जगात डोकावताना, वेड्यांची गोष्ट, इतिहासातील दडपलेली पाने, डेस्टिनेशन गोष्ट, कवितेचे कवडसे, गतकाळाची गाज, तन-मन तिचं, अशा काही सदरांमधील काही लेखांचा आढावा मी या लेखात घेतला. विविध विषयांवरची ही सदरे वाचताना मासिकाचे वैविध्यपूर्ण स्वरूप लक्षात येत गेले. अनेक लेखकांनी विविध विषयांवर अतिशय माहितीवर्धक लिखाण केले आहे. जयदेव डोळे, तमन्ना इनामदार, बेनझीर तांबोळी, रजिया सुलताना, श्रीकांत इंगळहळ्ळीकर, मिलिंद वाटवे, राजीव तांबे, मुकुंद टांकसाळे, सागर-मुक्ता, राजश्री तिखे अशा अनेक अनुभवी लेखकांनी ही सदरे लिहिली आहेत. या सदरांमध्ये स्त्रियांच्या आर्थिक व्यवहाराकडे किंवा राजकारणाकडे बघण्याच्या दृष्टिकोनाची चर्चा केली आहे. तसेच स्त्रियांचे समाजातील योगदान, सांस्कृतिक सहभाग, यावर भाष्य आहे. अतिशय रोचक अशा या लेखांमुळे अंक अतिशय वाचनीय बनतो. परंतु, काही वेळा जाणवते की, लेख जरी मजेदार असला तरी यात स्त्रीवादी दृष्टिकोनाचा अभाव आहे. उदा. मुकुंद टाकसाळे यांचे 'तिरपागड' हे सदर. अतिशय वाचनीय अशा या सदरात भोवताली नियमितपणे घडणाऱ्या विविध घटनांवर (उदा. रस्त्यांची नावे, कादंबऱ्याविषयीचे वाद, राहुल गांधी यांचा मुंबई दौरा, महाराष्ट्राचे सांस्कृतिक धोरण, आनंद यादव यांच्या तुकारामावरील लिखाणावरील वाद आणि त्यांची माफी आणि पुणे येथे गाजलेले 83वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, इत्यादि) अत्यंत खुसखुशीत टिप्पणी केली आहे. परंतु, मासिकाच्या मूळ गाभ्याच्या मुद्द्याला हे सदर हात घालत नाही.

'मुस्लीम मनाचा कानोसा' या सदरात मुस्लीम समाजाच्या मागासलेपणाची चर्चा करणारे, विशेषत: स्त्रीप्रश्नाशी निगडीत लेख आहेत. 'मिळून साऱ्याजणी'ने मुस्लीम महिलांच्या अभिव्यक्तीसाठी नियमित सदर चालवले आहे. खरं तर असे स्वतंत्र सदर असण्याची गरज पडू नये, अशीच मानवी समाजाची रचना असायला हवी. पण आज आपण जमातवादाचे अतिशय क्रूर रूप पाहत आहोत. अशा काळात असे सदर नियमित चालू ठेवणे वैशिष्ट्यपूर्णच नाही, तर धाडसाचे देखील आहे. तरी लेख वाचताना सदरातील सर्वच लेखक केवळ मुस्लीम धर्मीयच असणे ही गोष्ट खटकणारी वाटली. तसेच लेखकांपैकी क्वचित कुणी धर्मचिकित्सा करताना दिसते. सर्वजण इस्लाम धर्म पैगंबरांच्या काळात उन्नत होता, पण नंतर त्याची अधोगती झाली असेच मांडताना दिसतात. यावर स्त्रीवादी दृष्टिकोनातून अजून लेखन आणि विचार झाला पाहिजे, असे वाटते.

जयदेव डोळे यांचे त्यांच्या 'स्त्रीयालिटी' या सदरातील शेवटचे वाक्य- 'स्त्रियालिटी' ही मला अशी दिसली. ती फार प्रखर वाटली असेल तर वाटू द्या, कारण मला न दिसलेली त्याहीपेक्षा प्रखर आहे- वाचकांना पुरुषसत्ता, स्त्री-पुरुष विषमता यांच्याशी संबंधित अत्यंत गंभीर प्रश्नांना भिडायला भाग पाडते. त्यांच्या मते, 'मिळून साऱ्याजणी'सारख्या मासिकांचा मूळ हेतूच पुरुषांनीही आत्मचिंतन करावे हा आहे. म्हणूनच बऱ्याच पुरुषांना या मासिकातील लेखन आवडत नाही. पण म्हणूनच तर असे साहित्य प्रकाशित होणे अधिकच महत्त्वाचे ठरते.

या छोट्या टिपणात सर्व सदरांचं सविस्तर विश्लेषण लिहिणं शक्य नाही. चांगल्या गोष्टी खूप आहेत, पण काही मुद्दे अजून धारदारपणे येण्याची गरज आहे. 'मिळून साऱ्याजणी' मासिकाचा लोकांपर्यंत वेगवेगळ्या मार्गांनी, जमेल त्या माध्यमांच्या मदतीने पोहोचण्याचा प्रयत्न स्तुत्य आहे. ३१ वर्षांच्या आपल्या वाटचालीत मासिकाने अनेक उपक्रम राबवले, त्यातला हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. त्यामध्ये सहभागी होण्याची मला संधी दिल्याबद्दल मी गीताली वि.मं. आणि सुवर्णाचे मनापासून आभार मानते.

*वंदना पलसाने*

*(या समाजशास्त्राच्या अभ्यासक असून विविध परिवर्तनाच्या चळवळी व संघटनांशी संबंधित आहेत.)*

# तरुण डॉट कॉम

## पूनम बा. मं.



तरुण म्हटले की वारा प्यायलेली तरुणाई - जी एकतर एखाद्या गोष्टीत झिंगून जाऊन अफाट काहीतरी करेल किंवा काहीच करणार नाहीत अशा वयातली ही मंडळी.खूप सहजपणे म्हटले जाते आजकालची तरुणाई समाजमाध्यमात वाहावत चालली आहे, तिला आपल्या आजूबाजूला काही चालले आहे याचं भान नाही. वाचन आणि तरुणाई यांचं गणित अवघड होत चाललं आहे. या समाजाचं पुढं कसं होणार? मी म्हणेन
पिढी दर पिढीतले तरुण त्यांच्या तरुण उसळणाऱ्या रक्ताबरोबर नेमकं सामाजिक भान बाळगून काही ठाम निर्णय घेत आलेले आहेत- ते स्वतःच्या आयुष्यातील असो किंवा सामाजिक असोत. अगदी पर्यावरण ते स्त्रीप्रश्नांतील विविधांगी आयाम असोत. ही तरुण मंडळी सर्जनशील तर आहेतच अचूकपणे आपलं म्हणणं पोहोचवणारीही आहेत. अलीकडे त्यांना समाजमाध्यमाची जोडही मिळत आहे. त्यांचं म्हणणं मांडत त्यांनी त्यांचे प्रश्न आणि समाजाचे प्रश्नही मांडले. सारं संचित इथेच दिसते की open minded ही द्विमार्गी प्रक्रिया आहे-जिला अनेक ओहोळ मिळत राहिले आणि ते टिकून आहेत. साऱ्याजणीत तरुण विविध प्रकारे जोडलेले दिसतात - अगदी कथा-कवितांना चित्रे काढून देण्यापासून कव्हरवरील चित्र देणे ते लेख-कविता-सदर-मुलाखती घेणे
यातील वर्ष २००९ ते २०१८ तरुण डॉट कॉम या सदरातील लेखांचा हा लेखाजोखा मी मांडला आहे. मी स्वतःच या वयोगटाचं प्रतिनिधित्व करत असताना लेख वाचत गेले तसतसं त्यात मजा येत गेली आणि एकूण आनंदात भरच पडली.

*poonam.penter@gmail.com*

# संवाद-शब्दांचा साकव

## सुनीता भागवत



**पुणे प्रतिनिधी**

"माणसा-माणसांच्या मेंदूपर्यंत, हृदयापर्यंत जाण्यासाठी मदत करणारा शब्दांचा साकव" असे सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ यांनी आपल्या" संवाद"चे वर्णन केले आहे.
पहिल्या ३१ वर्षांपैकी वीस वर्षे संपादक म्हणून विद्या बाळ यांनी तर पुढील ११वर्षे गीताली वि.मं.यांनी हा संवाद साधला. स्त्रीपुरुष समतेला इथे कायमच केंद्रस्थानी ठेवण्यात आले. स्त्रियांचे बहुसंख्य प्रश्न हे पुरुष केंद्रित पितृसत्ताक व्यवस्थेतून निर्माण झाले आहेत हे सत्य नेहमीच ठामपणे मांडले जाते.

केवळ स्त्रीलाच नव्हे तर पुरुषांनाही "पुरुषभान" आणत LGBTQ समुहालासुद्धा सामावून घेतले जाते

सर्व थरातील, क्षेत्रातील स्त्रियांचे प्रश्न, मानवी नाती, समाजकारण,यांची स्त्रीप्रश्नाशी सांगड घालता घालता' संवाद' चे क्षितीज विस्तारत गेले. दलित कष्टकऱ्यांचे श्रम, धर्मांधांची आक्रमकता, पर्यावरणाची काळजी, अंधश्रद्धा निर्मूलनाची गरज, नर्मदा बचाव आंदोलन. पर्यायी विकासनीती, अण्वस्त्रांना विरोध करणारी चळवळ, जन आरोग्य संसदेची निर्मिती, बळीराजाचे प्रश्न, अपंगांचे प्रश्न, झुंडीचे राजकारण, सामाजिक न्याय, सर्वत्र वाढणारी हिंसा, अशा आणि वेळोवेळी निर्माण होणाऱ्या नवीन प्रश्नांवरही समाज प्रबोधन करणारे विचार या संवादात आहेत.

वैविध्यपूर्ण चळवळी यांच्या सहाय्याने विधायक कामांचा पाया घातला जातो. समाजातील सर्व घटकांनी परस्परांशी संवाद साधत ,अहिंसक पद्धतीने समस्या सोडवत,शांततापूर्ण आनंदी जीवन जगावं हे स्वप्न या "संवादातून" अभिप्रेत आहे.

*sunitaravibhagwat@gmail.com*

> **“आमच्या देहावर आमचा अधिकार”**
> ही स्त्री चळवळीची घोषणा सतत अधोरेखित करणारं मासिक नव्हे चळवळ!

# वाचकांच्या प्रतिक्रिया

## वसुधा जोशी



आपण कुठवर वाचकांपर्यंत पोचत आहोत आणि आपल्या सर्व खटाटोपाबद्दल त्यांच्या प्रतिक्रिया काय आहेत, हे जाणून घेण्यासाठी वाचकांच्या पत्रांचे विश्लेषण करणे महत्त्वाचे असते. त्यासाठी वरील कालावधीत 'मिळून साऱ्याजणी'चे सर्व ११३ अंक मी नजरेखालून घातले. त्यात एकूण ६८७ एवढी वाचकांची पत्रे होती. त्या खेरीज आठ विषयांवर वाचकांची पत्रं मुद्दाम संपादकांनी मागवली होती, आणि त्यांचे संकलन करून स्वतंत्र लेखही छापले होते.

या सर्व पत्रांचे व लेखांचे साधे वर्णनात्मक संख्याशास्त्रीय विश्लेषण पहिल्यांदा करून वाचकांच्या फैलावाची भौगोलिक व्याप्ती आणि स्त्री-पुरुष वर्गीकरण पहिल्यांदा करण्यात आले. त्यानंतर पत्रांच्या आशयाकडे लक्ष वळवले. टीका, प्रशंसा आणि सूचना असे आशयाचे वर्गीकरण करून नंतर त्याची छाननी करण्यात आली. टीकात्मक आशयाचा अर्थ काळजीपूर्वक जाणून घेतला.

वाचकांनी मासिकाच्या मजकुरापासून ते छपाई, मुखपृष्ठ, जाहिराती, पृष्ठसंख्या या सर्व बाबींवर परखड आणि सडेतोड मते व्यक्त केली आहेत. त्याखेरीज मूलगामी टीका प्रामुख्याने दोन विषयांवरून करण्यात आलेली आहे. 'मिळून साऱ्याजणी'च्या संपादनामागचा जो उदारमतवादी, निधर्मी, डावा राजकीय विचार आहे, त्याच्यावर मूलतत्त्ववादी हिंदू विचारसरणीतून करण्यात आलेली टीका हा पहिला विषय, तर मासिकाच्या स्वरूपातला 'गोंधळ' हा दुसरा विषय.

मूलतत्त्ववादी दृष्टिकोनातून झालेली टीका संपादकांनी छापली आहे, पण तिचा समर्थ प्रतिवाद केलेला नाही. मासिकाचे स्वरूप साहित्यविषयक आणि त्याच वेळी कार्यकर्त्यांना आवाहन, ग्रामीण नवसाक्षर स्त्रियांपर्यंत पोचण्यासाठी, त्यांना लिहिते करण्यासाठी केलेले प्रयत्न असे असल्यामुळे ते धेडगुजरी झाले आहे. दोन वेगळ्या वाचकवर्गांची मोट बांधल्यामुळे ते कोणत्याच वाचकांना निखळ आनंद देत नाही, हा टीकेचा दुसरा विषय आहे. त्याचे खंडन वाचकांनीच केलेले आहे.

वरील प्रमुख मुद्द्यांव्यतिरिक्त असंख्य विषय वाचकांच्या पत्रांमधून आलेले आहेत. थोड्या प्रमाणात विधायक सूचनाही आहेत, पण त्यांचा स्वीकार झाल्याचे दिसत नाही. प्रशंसा करणाऱ्या पत्रांबरोबरच टीका करणारी सर्व पत्रे छापून संपादकांनी पत्रकारितेच्या उत्तम मानकांचा अवलंब केला आहे. १९९०च्या दशकामध्ये स्त्रीमुक्तीच्या विचारांचा पुरस्कार करणाऱ्या या मासिकामुळे मराठी मध्यमवर्गीय समाजामध्ये कोणती घुसळण झाली, त्याचे प्रतिबिंब वाचकांच्या पत्रव्यवहारातून समोर येते.

*वाणिज्य व व्यवसाय प्रशासन या विषयांची*
*निवृत्त कॉलेज प्राध्यापक. 'बायजा' या*
*द्वैमासिकाचे पंधरा वर्षे सह-संपादन.*
*vasudha.joshi23@gmail.com*

## दीप्ती जोशी



उपरोक्त प्रकल्पांतर्गत वाचकांचा पत्रव्यवहार(१९९१-२००९) या अगणित पत्रांतील वाचकांच्या प्रतिक्रिया वाचून वाचक आपल्या मासिकातील सदरे किती अंतर्मुख होऊन वाचतात याचा प्रत्यय वेळोवेळी येत होता.

यातून काही नवे विचार मि. सा. च्या टीमला, सदर लेखकांना मिळाले असतील. सहसा ज्या मासिकांमध्ये, साहित्यामध्ये वाचकांच्या मतांना महत्व दिलेले असते ते साहित्य प्रगती पथाकडे सतत वाटचाल करत असणार असा माझा होरा आहे. मि.सा. सारखे मासिक उथळ उच्छृंखल विचारांच्या भाऊगर्दीत हरवून जात नाही, ते स्वतःचे वेगळेपण जपते म्हणूनच त्याचे वाचकही अतिशय संवेदनशील आहेत. आवडलेल्या साहित्याचे कौतुक, न पटलेल्या विचारांना विरोध तर काही प्रसंगी 'हे अजिबात आवडले नाही' असे परखडपणे, प्रांजलपणे सांगणारी पत्रे व यातून मि . सा . बद्दलची आत्मियता, प्रेम, त्याच्या प्रगतीच्या सदिच्छा हेच दृष्टीस पडते. आपल्या मासिकाचे वेगळेपण टिकावे यासाठी संपादक मंडळ, , सदर लेखक जे प्रयत्न करतात ते सुद्धा सतत जाणवत राहते.

वाचकांचा पत्रव्यवहार वाचताना लक्षात आले की अनेक वाचक अगदी सुरवातीपासून आपले सदस्य आहेत. अनेकजण सतत त्यांची मते, अपेक्षा मासिकाला कळवत असतात. त्यानुसार मासिकाने त्याची दखल घेतली की आवर्जून आभार मानतात, कौतुक करतात. 'व्यक्ति तितक्या प्रकृती' या उक्तीचा प्रत्यय मला ही सर्व पत्रे चाळताना येत होता. एकाच लेखावर/ सदरावर उलट सुलट प्रतिक्रिया असायच्या तेव्हा व्यक्तिगणिक दृष्टीकोन कसा बदलत जातो हे लक्षात येत होते .

एकांगी विचारसरणी अनुसरणाऱ्या साहित्याचा वाचकाला उबग येतो, काहीवेळा मग तो त्याकडे पाठ फिरवतो. पण त्याची ही नाराजी, अस्वस्थता आपल्यापर्यंत पत्रांच्या माध्यमातून पोचत होती आणि त्यानुसार आपले मासिक काळानुरूप बदल स्विकारत, वाचकांच्या मताला सर्वोच्च मान देऊन तसतसे बदलत गेलेले दिसते.

वर्षानुवर्षे न समजता न विचार करता करत असलेले सण समारंभ याकडे डोळसपणाने पहायची वृत्ती नकळत मनावर बिंबत गेली.

आपण जे काही करतोय त्याचा कार्यकारणभाव आपल्याला माहित आहे ही भावना त्या सण समारंभाच्या आनंदात भर टाकू लागली आहे. हे सर्व या संकलनाच्या कामाचे फलित आहे.

*अकोला जिल्हा प्रतिनिधी,*
*dipti.2758@gmail.com*

# पुढील वाटचाल...


## अंजली मुळे




'मिळून साऱ्याजणी'मध्ये मी १९९० पासून सुरुवातीची १० वर्षं काम करत होते. मासिकाच्या सुरुवातीची काही वर्षं थोडी धाकधुकीचीच होती. इतर लोकप्रिय मासिकं आणि नियतकालिकं बंद पडत होती, तेव्हा पैसा, जागा असं कुठलंही पाठबळ नसताना, नवीन मासिक आणि तेही स्त्रीमुक्तीचा विचार देणारं मासिक काढायचं धाडसच विद्याताईंनी केलं होतं. विद्याताईंजवळ माणसं जोडण्याचं कसब आणि अनुभवाची शिदोरी होती. या काळात विद्याताईंबरोबर काम म्हणजे नवनवीन कल्पना, नवे विषय, नवीन ओळखी, भरपूर चर्चा-गप्पा, विविध कार्यक्रमांची आखणी असा सगळा उत्साहाचा माहौल होता. मासिक हळूहळू स्थिर होत होतं. १० वर्षांनी मी मासिकाचं काम सोडेपर्यंत मासिक स्थिरस्थावर होऊन समाजमनात चांगलंच रुजलं होतं.

मासिकाला २० वर्षं झाल्यानंतर मी, "आज 'साऱ्याजणी'त नसूनही..." हा लेख लिहिला होता. आणि २०२१ मध्ये विद्याताई गेल्यानंतर आता पुन्हा मासिकांबद्दल काय वाटत आहे याचा आढावा घेण्याचा हा प्रयत्न!

विद्याताई असतानाच गीतालीने मासिकाची जबाबदारी स्विकारली होती. विद्याताईंच्या नंतर गीतालीने स्वतंत्रपणे कामाला सुरुवात केल्यावर, विद्याताई आणि गीताली यांच्या स्वभावातला फरक, त्यांचे सामाजिक-राजकीय दृष्टिकोन, कामाची पद्धत याचं प्रतिबिंब मासिकात पडणं साहजिकच आहे.

विद्याताईंनी कुठलंही आर्थिक पाठबळ नसताना, 'साऱ्याजणी'सारखं मासिक सलग ३० वर्षं, एकही अंक न चुकवता चालू ठेवलं. अनेक माणसं जोडली. विविध संस्था चालू केल्या अशा प्रकारे स्थिर झालेलं, नावाजलं गेलेलं, सर्वदूर पोचलेलं मासिक गीतालीकडे आलं.

गीताली समोरचं आव्हानंही सोपं नव्हतं; पण गीतालीने ते सहज पेललं आहे आणि मासिक वैचारिकदृष्ट्या समृद्ध करण्याची तिची धडपडही जाणवते आहे,

संसदीय राजकारण हा माझ्या आवडीचा विषय असल्यामुळे मासिकातून संवादात त्याला दिलेलं स्थान ही माझ्या दृष्टीने आणि खरं तर समाजाच्याही दृष्टीने अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. मासिकातून जाणवणारा मध्यमवर्गीय ब्राह्मणी छाप पुसून टाकायचा गीतालीचा प्रयत्न स्तुत्य आहे. आवश्यकही आहे.

तसंच तरुण वर्गाला जाणीवपूर्वक सामावून घेणं, त्यांच्यावर स्वतंत्रपणे जबाबदाऱ्या सोपवणं, त्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवणं, कोरोनाच्या कठीण काळातही डिजिटल माध्यमाचा वापर करून मासिक पोचवणं, कार्यक्रम करणं हे कौतुकास्पद आहे. आणि त्यामुळेच गीतालीकडूनच्या अपेक्षाही वाढल्या आहेत. मासिकाच्या संदर्भात वाचकांचा वैचारिक स्तर काय आहे? हे जाणून घेतलं पाहिजे. आपण देतो तो विचार त्यांच्यापर्यंत पोचतो आहे का हे बघण्यासाठी वाचकचर्चा उपयुक्त ठरतात. वाचकांचा जास्तीत जास्त सहभाग या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो. आपल्याला कुठला विचार, कशा पद्धतीने पोचवला पाहिजे. यासाठी त्याचा उपयोग होऊ शकतो. वाचकांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावं म्हणून प्रश्नावली द्यावी. त्यात सोपे सोपे तसेच थोडा विचार करायला लावणारे अशी प्रश्नांची सरमिसळ असावी. आपल्या एका एका प्रतिनिधीने दोन दोन जणींकडून लिहून घेऊन पाठवलं तरी तो मोठा प्रतिसाद होईल.

तरुण मुलामुलींना अनेक विषयांवर बोलतं करण्याची आवश्यकता जाणवते.

स्त्रीवाद/स्त्रीमुक्ती म्हणजे काय? धार्मिक/ सामाजिक/ सांस्कृतिक/ राजकीय/ आर्थिक घटकांवर स्त्रीवादाबद्दलची तरुणांची मतं जाणून घ्यावीत. त्या संदर्भात प्रतिनिधींनी वेगवेगळ्या स्तरातल्या तरुणांशी प्रत्यक्ष जाऊन बोलणं, त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घेणं आणि अशा प्रतिक्रियांवरून लेख तयार करणं. असं केलं तर तरुणांच्या मतांसंबंधी काही निष्कर्ष काढता येईल.

विषय भरपूर मिळतील. प्रश्नावल्या ऑनलाइन टाकून मतं मागवता येतील. तरुणांचा एकंदर कल जाणून घेतला तर मासिकात त्या प्रकारचे लेख आले तर मासिकाचा तरुणवर्ग वाढेल असं वाटतं.

विद्यार्थ्यांशी संबंधित विषयांवर (शिक्षण, आरोग्य) Opinion Poll घ्यायलाही हरकत नाही.

**बाकी संस्थाच्या बाबतीत विचार करताना...**

नारी समता मंच, सखी साऱ्याजणी, साथ-साथ विवाह अभ्यास मंडळ, अक्षरस्पर्श ग्रंथालय आणि पुरुष उवाच या संस्था 'मिळून साऱ्याजणी'शी जोडलेल्या आहेत. या संस्था विशिष्ट उद्देशाने सुरू झाल्या होत्या. स्त्रीवादी, मानवतावादी, पर्यावरणवादी, पुरोगामी, धर्मनिरपेक्ष दृष्टिकोनातून या संस्था चालवाव्या आणि त्यातून समाजपरिवर्तन घडावे, अशी अपेक्षा होती. सुरुवातीला जोमाने सुरू झालेली

'साथ-साथ'सारखी महत्त्वाची संस्था

जवळपास बंद पडायच्या मार्गावर आहे. थोडं लक्ष देऊन ती परत सुरू करता येण्यासारखी आहे.

'सखी साऱ्याजणी'त स्त्रीवादी विचार पूर्ण अर्थाने पोचला आहे का नाही, अशी शंका येते. तिथे फक्त निवडक साहित्याची चर्चा होते असं वाटतं.

अक्षरस्पर्शमध्ये वाचकांच्या पसंतीच्या पुस्तकांना प्राधान्य द्यावं असा एकंदर सूर असतो. काही अंशी ते मान्य केलं तरी मागणी तसा पुरवठा यासाठी ग्रंथालय सुरु केलेलं नाही. पुरोगामी, राजकीय, वैचारिक पुस्तकांबद्दल आवड निर्माण करण्याचे प्रयत्न करणं, तसे कार्यक्रम करणं याकडे लक्ष दिलं जात नाही. वैचारिक म्हणजे क्लिष्ट असा काहीतरी समज आहे, असं जाणवतं. वैचारिकसुद्धा मनोरंजक, माहितीप्रद आवडणारं असू शकतं, तशी दृष्टी विकसित करावी लागेल. तरुण वाचक वाढवण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. आपण ज्या उद्देशाने संस्था सुरू केल्या आहेत. तो उद्देश सफल होतो का नाही, हे बघणं जरुरीचं आहे. त्यासाठी या संस्थांमध्ये आपल्या विचाराची माणसं घेणं किंवा जी माणसं घेऊ त्यांना प्रशिक्षित करणं गरजेचं आहे.

या संस्थामधले कर्मचारी, कार्यकर्ते, विश्वस्त, प्रतिनिधी, कार्यकारिणी सदस्य यांचं प्रबोधन करणं, त्यांना मार्गदर्शन करणं, संस्थेचे उद्देश पटवून देणं हे काम करावं लागेल; नाहीतर संस्था हिंदुत्ववादी विचाराच्या माणसांच्या ताब्यात जाण्याचा धोका संभवतो. वर्षातून किमान दोन वेळा सर्व संस्थांच्या सदस्यांनी एकत्र भेटून एकमेकांच्या कामाबद्दल जाणून घेणं गरजेचं आहे. वर्षातून एकदा सर्व संस्थांनी मिळून आपल्या विचारांना पुढे नेणारा कार्यक्रम आयोजित करणं शक्य होईल का हेही बघावं लागेल.

*anjalimulay3@gmail.com*

---

## निरामय पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे सध्याचे विश्वस्त आणि सहकारी



**संदीप सूर्यवंशी**
माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातले तज्ज्ञ आणि पुरुष उवाचचे संस्थापक सदस्य



**सुषमा देशपांडे**
लेखक, पत्रकार, दिग्दर्शक आणि अभिनेत्री



**सुनील सुकथनकर**
सिने दिग्दर्शक, कवी-लेखक



**रमा सरोदे**
कायद्याच्या अभ्यासक -



**गीताली वि. मं.**
कार्यकारी विश्वस्त आणि संपादक



**मानसी घाणेकर**



**पुनम बा. मं.**



**प्रगती सावंत**



**पूर्वा भिंगे**




**रसिका भट**



**आशा देशमुख**

निव्वळ छापील साठ पानी मासिक म्हणजे मिळून साऱ्याजणी नाही तर ती एक जगण्याची रीत आहे. सर्जनाला साद घालत परस्पर विश्वासाचं साहचर्याचं नातं जोपासणारी ही रीत चौकटीच्या बंदिस्तपणाला आव्हान देत परिवर्तनाच्या विचारांचा धागा विणत पुढे पुढे जाणारी आहे... मासिकाची जिवंत धुमारे देणारी उपक्रमशील ऊर्जा म्हणजे... आम्ही एकत्र आमची एकजूट असणारे नारी समता मंच, सखी साऱ्याजणी, पुरुष उवाच अक्षरस्पर्श ग्रंथालय आणि साथ साथ विवाह अभ्यास मंडळ!

साऱ्याजणी आणि विद्याताईंना अनेकानेक पुरस्कार मिळाले. पुरस्कारांचा सिलसिला असाच राहूदे ही सदिच्छा!



# नारी समता मंच

'नारी समता मंच' नावातच समतेच्या मूल्याचा उच्चार उद्धृत करण्यात आला आहे. स्त्रियांवरील अत्याचाराला प्रतिबंध इथपासून सुरुवात करून ग्राम विकास, शिक्षण, आरोग्य, पाणी पुरवठा अशा अनेक प्रश्नांवर मंचाचे काम विस्तारले आहे. कौटुंबिक हिंसाचार, एकतर्फी आकर्षणातून तरुणींच्या हत्या, कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ अशा हिंसाचाराच्या अनेक मुद्यांवर मंच कार्यरत आहे. 'लिंगभाव' हा कोटीक्रम मूलभूत मानून, त्याचे नातेसंबंधामध्ये विश्लेषण आणि त्याविषयी संवेदनशीलता वाढवणे हा मंचाच्या कामाचा गाभा राहिला आहे.

ग्रामविकासाचे कामही लिंगभाव संवेदनशील दृष्टीतून मंचाने पुढे नेले. विविध कार्यक्रम, उपक्रम, प्रकल्प याद्वारे आपल्या बहुपेडी समाजातील विविध स्तरांशी जोडले जाण्याचा नारी समता मंचाचा जाणीवपूर्वक प्रयत्न असतो. स्त्री व पुरुष तसेच आर्थिक, सामाजिक, जातीय परिघाच्या पलीकडे मंच कार्यरत आहे. मंचाची सुरुवात पुणे शहरात जरी झाली असली तरी कामाचा भौगोलिक विस्तारही वेळोवेळी झाला आहे. स्त्री-चळवळ तसेच सामाजिक परिवर्तनाच्या चळवळींशी जोडून घेत नारी समता मंचाची वाटचाल सुरु आहे.

पुण्यात समुपदेशन केंद्र तसेच ग्रामीण स्त्रिया आणि पुरुषांसोबत लिंगभाव संवेदनशीलतेसाठी जाणीवजागृतीचे उपक्रम तसेच ग्रामविकास, वंचित समाजातील मुलांचे शिक्षण अशा अनेक माध्यमातून मंचाचे काम पुणे शहर आणि पुणे जिल्ह्यात सुरु आहे.

मंचाचे प्रतिनिधी सल्लागार/संसाधन व्यक्ती म्हणून आपण खालील बाबीत सहाय्य करू शकता-

- लिंगभाव संवेदनशीलता आणि सामाजिक संवेदनशीलता, लिंगभाव संवेदनशील समुपदेशन
- कुमार वय - कुमार वयातील ताणतणाव, ताण व्यवस्थापन, करिअर समुपदेशन, लैंगिकता शिक्षण
- कामाच्या ठिकाणी स्त्रियांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, २०१३- कार्यालयीन धोरण, अंमलबजावणी, तक्रारीच्या चौकशीचे प्रशिक्षण, अंतर्गत तक्रार समितीवर प्रतिनिधित्व

**फेसबुक: www.facebook.com/NSMpune**

**नारी समता मंच, सावली, ४७३, सदाशिव पेठ, न्यू इंग्लिश स्कूल समोरील गल्लीत, पुणे ३०.**
**फोन: ०२० २४४९४६५२, २४४७ ३११६   E-mail: narisamata@gmail.com**

# सखी साऱ्याजणी

स्त्री मासिकातून श्रीमती शांताबाई किर्लोस्कर यांच्या संकल्पनेतून १९६६ मध्ये सुरु झालेले हे मंडळ, गेली २७ वर्षे मिळून साऱ्याजणी मासिकाला जोडलेले आहे.

मिळून साऱ्याजणी मासिक आणि श्रीमती विद्या बाळ यांच्या मार्गदर्शनाखाली बदलत्या काळातील स्त्री प्रश्नांच्या मागोवा घेत कार्यक्रमाची आखणी केली जाते. 'वाचा, ऐका, बघा विचार करा' आणि मुख्य म्हणजे बोला असा एक संदेश प्रत्येक कार्यक्रमाच्या मागे असतो. त्यासाठी साहित्य, नाटक, कविता, चित्रपट, स्त्रीवादी साहित्य, समाजकारण, राजकारण, स्त्री विषयक कायदे, पर्यावरण, स्त्री आरोग्य किंवा आपल्या अवती भवती घडणाऱ्या घटना यावर वेळोवेळी व्याख्याने व चर्चा आयोजित केल्या जातात.

समाजातील दुर्बल घटकांसाठी निरनिराळ्या ठिकाणी चालणाऱ्या कामांना संस्थांना भेट देणे,वार्षिक सहल परगावच्या सखी मंडळासह द्विवार्षिक मेळावे असे कार्यक्रम सभासदांना खूप काही देऊन जातात.

या सर्वच कार्यक्रमातून सभासदांना नवी उमेद मिळते. सखी मंडळाची सहल व मेळावा ही तर एक आनंद यात्राच असते.

मंडळाची वार्षिक वर्गणी रु.२०० अशी आहे. दर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी ४.३० ते ६ 'निवारा' नवी पेठ किंवा 'डेक्कन जिमखाना सोसायटी हॉल इथं कार्यक्रम होतात.

**संपर्कासाठी:**

**नीना भेडसगावकर- २४५३८७६३ /९८२२१७६४६०**
**रेखा डांगे - ९८९०४४६२०९**

# 'पुरुष उवाच'

## स्त्री-पुरुष समतेसाठी

मानवमुक्तीच्या प्रवासातील अविभाज्य भाग म्हणून स्त्रीमुक्ती चळवळ पुढे आली. पुरुषांसाठी मात्र स्त्रीमुक्ती हा चेष्टेचाच विषय राहिला. या पार्श्वभूमीवर काही समतावादी पुरुषांनी पुण्यात 'पुरुष उवाच' गटाची ऑगस्ट ८७ मध्ये स्थापना केली. पुरुषांच्या अधिक चांगल्या, मानवी जगण्याच्या इच्छांचं प्रतिबिंब म्हणून संवेदनशील पुरुषांचे व्यासपीठ म्हणून 'पुरुष उवाच' कार्यरत आहे. वैचारिक व भावनिक जडण घडणीत एकांगीपणा येवू नये म्हणून स्त्री-पुरुष, दोघेही या गटाचे सभासद आहेत.

राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक विषयांवर सखोल अभ्यास करून स्त्री-पुरुष समतेची जाणीव प्रगल्भ करण्यासाठी, पुरुष उवाच दर महिन्याच्या शेवटच्या गुरुवारी, संध्याकाळी मासिक अभ्यासवर्ग आयोजित करतो. स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचार संदर्भातील कार्यक्रमात सहभाग, तरुण मुलांबरोबर संवाद असे कार्यक्रम चालू असतात. आपण जरूर यात सहभागी होवू शकता.

२००७ पासून आम्ही 'पुरुष उवाच' या नावाने दिवाळी अंक काढतो आहोत. 'पुरुष उवाच'चा दिवाळी अंक ही समतेच्या वाटेवर, निःशब्दता ओलांडत, पुरुषांनी माणूसपणाची वाटचाल करण्यासाठीची छोटीशी चळवळ आहे, अशी आमची भावना आहे. या अंकात पुरुषांचेच लिखाण, मते असतात. पुरुषप्रधानव्यवस्थेत दमन, शोषण करणाऱ्या पुरुषांचंही माणूसपण हिरावलं जातं, या वास्तवाची जाण जास्तीत जास्त पुरुषांच्या मनात जागी व्हावी आणि त्यांची माणूसपणाची वाटचाल सुकर व्हावी हा प्रयत्न या अंकाच्या माध्यमातून आम्ही करत असतो.

तरुणांनो, आपल्या सहभागाचं स्वागत आहे.

**- मुकुंद किर्दत, गीताली वि.मं.**

**बी -२/५०१, कुमार प्राईड पार्क, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११०१६.**
**फोन : ०२०-२५६५२३२४. इमेल : purushuvachpunegmail.com.**

निकोप, निरामय जगण्यासाठीचा एक अवकाश म्हणजे पैस, मानवी मनाचा वैयक्तिक आणि सामाजिक पैस व्यापक व्हावा यासाठी स्मृतीशेष विद्या बाळ यांनी अथक प्रयत्न केले. त्यांचं हे काम पुढे नेण्यासाठी विद्या बाळ पैस शांतिसंवादाचा हा उपक्रम सुरू केला आहे. त्यात आपलं स्वागत आहे. संपर्क : गीताली ९८२२७४६६६३, ७४४७४४९६६४





# अक्षरस्पर्श

ग्रं था ल य

वाचण्यासाठी, त्यावर बोलण्यासाठी

## 'पैस' विस्तारणारी 'अक्षरस्पर्श' ग्रंथालयाची वाटचाल

निकोप, निरामय जगण्यासाठीचा एक अवकाश म्हणजे 'पैस'. सर्वांनीच संवेदनशील जगण्याचा पैस विस्तारत नेणं, स्वातंत्र्य, स्त्री-पुरुष समता, अशोषण ही मूल्यं जपत जगणं. या जाणिवा विकसित होण्यासाठी पुस्तकांचं माध्यम सशक्त सोबत करु शकतं या भूमिकेतून 'अक्षरस्पर्श' ग्रंथालय सुरु झालं. श्री. सुनील देशमुख आणि त्यांचे बंधू श्री. किरण देशमुख यांच्या देणगीतून, ३ जाने. १९९९ रोजी सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनाची आठवण ठेवत हरि नरके आणि उर्मिला पवार या पाहुण्यांच्या उपस्थितीत 'अक्षरस्पर्श' ह्या सुसज्ज ग्रंथालयाचं उद्घाटन झालं.

अक्षरवेल - सुनीताबाई देशपांडे यांनी दिलेल्या देणगीतून २००१ मध्ये बालविभाग सुरु करण्यात आला. मुलांमध्ये वाचनाची आवड वाढावी यासाठी गाणी, गोष्टी, सिनेमा, वाचन अशा मुलांना आवडण्याऱ्या स्वरुपांमध्ये काही निवडक शाळांमध्ये अक्षरवेल उपक्रम चालू आहे.

**वर्धापन दिन** - वर्धापन दिनाच्या निमित्ताने वाचकांना काहीतरी चांगले ऐकायला मिळावे असा प्रयत्न असतो. वाचक ह्या कार्यक्रमांची प्रत्येक वर्षी आतुरतेने वाट पहात असतात.

**पुस्तकपेटी** - वाचनालयापासून वंचित अशा समाजाशी जोडले जाण्याच्या विचारातून हा उपक्रम ठिकठिकाणच्या सामाजिक कार्यकर्त्यांच्या सहकार्याने चालवला जातो. (ज्या कार्यकर्त्यांना आपल्या भागासाठी अशी पुस्तकपेटी हवी असेल त्यांनी ग्रंथालयात जरूर संपर्क साधावा.)

**'अक्षरस्पर्श' चा एक महत्त्वाचा उपक्रम : 'अक्षरगप्पा'** - वाचकांशी संवाद साधत वाचनसंस्कृती जोपासणं हे तर 'पैस' या कल्पनेतील प्रमुख वैशिष्ट्य आहे. त्यामुळे पुस्तकांच्या देवघेवीबरोबरच इतर अनेक उपक्रम गेली अठरा वर्षं सुरु आहेत. 'अक्षरगप्पा' उपक्रमात अनेक लेखक, कलावंत वाचकांना भेटतात. महत्त्वाच्या पुस्तकांवर चर्चा होतात. वाचकदिन, मुलाखती, अनुभवकथन असे अनेक कार्यक्रम झाले.

**आपल्या रोजच्या जगण्यातली बौद्धिक, वैचारिक सुसंवादाची भूक पुरी करण्यासाठी अक्षरस्पर्श ग्रंथालय उत्सुक आहे. इथे ललित, ग्रामीण, विनोदी, स्त्रीवादी, दलित, वैचारिक, तत्त्वज्ञान, सामाजिक चळवळींचं साहित्य अशी विविधता. मराठी, इंग्रजी आणि हिंदी मधील नवीन पुस्तकं आणि नियतकालिकंही - हे सारं आपल्या सर्वांच्या जाणिवा समृद्ध करण्यासाठी उपलब्ध आहे.**

४०/१/ब, भोंडे कॉलनी, प्राईम फर्निशिंग समोर, कर्वे रोड, पुणे ४११ ००४.
फोन : २५४२ ४९१५ वेळ : स. ९.३० ते १ आणि दु. ४ ते ७.३०

# साथ-साथ

## विवाह अभ्यास मंडळ पुणे

**परिचयोत्तर विवाह संस्था**

आजकालच्या तरुण मुलामुलींच्या जोडीदार निवडीविषयीच्या कल्पना बदलत आहेत. या बदलत्या कल्पनांमध्ये नेहमीच्या पारंपरिक पद्धतीने स्थळ शोधून, दाखवून-बघून, थोडक्या वेळात होणाऱ्या अत्यल्प ओळखीवर परस्परांचा आयुष्यभराचा जोडीदार बनणं त्यांना नको वाटतं आहे. प्रेमविवाह किंवा आपापले परिचयोत्तर विवाह ठरवता आलेले नाहीत अशांना इतर पर्याय दिसत नाहीत.त्यामुळे चालू रीतिलाच शरण जाणं भाग पडत आहे.

अशा स्थितीत साथ-साथ विवाह अभ्यास मंडळ विवाहेच्छूक तरुण-तरुणींना एका व्यासपीठावर एकत्र आणून त्यांना बोलतं करतं. प्रत्येक रविवारी संस्थेमध्ये वेगवेगळे उपक्रम आयोजित केले जातात. विविध विषयावर मनमोकळ्या गप्पा, पुस्तक/नाटक/चित्रपट इ. वर चर्चा, वादविवाद, रोजच्या जीवनातील विविध घटनांवर बेतलेली प्रसंगनाट्यं, खेळ, सहली, शिबिरं, कार्यशाळा, प्रश्नावली, लिखाण असे विविध उपक्रम असतात. या निमित्तानं होणाऱ्या विचारांच्या देवाण-घेवाणीतून ह्या विवाहेच्छुक तरुण-तरुणींना आधी स्वतःला समजून घेण्याची आणि मग इतरांना ओळखण्याची आणि त्यातून स्वतःसाठी सुयोग्य जोडीदार निवडण्याची संधी मिळते.


विवाहपूर्व समुपदेशनाची सेवाही साथ-साथ मध्ये उपलब्ध आहे. आपल्या मनातलं कुणाशी तरी मनमोकळेपणानं बोलावं असं तरुण तरुणींना वाटत असतं, ती संधी साथ-साथ मध्ये मिळते.

जोडीदार निवडण्याची नवी वाट शोधू पाहणाऱ्या आणि वेगळ्या विचाराने चालू इच्छिणाऱ्या विवाहेच्छू तरुण तरुणींना मैत्रीपूर्ण आणि अनौपचारिक वातावरणात परिचयोत्तर विवाहाची संधी देणारी एकमेव विवाह संस्था साथ साथ.

लॉकडाउनमुळे बंद असलेल्या साथ साथ मधे आम्ही आता जी मैट्रिमोनियल वेबसाइट आहे ती पूर्णपणे मोफत करत आहोत आणि याच्यामधुन आम्ही लोकांना स्वतःची प्रोफाइल अपडेट करण्याचा पर्याय फ्री मधे देणार आहोत, त्याच काम चालू आहे ....
अधिक माहिती साठी संपर्क : मंदार कुळकर्णी - ९४२२०८९१२१

Website - www.saathsaath.com E-mail: info@saathsaath.com

**माध्यम क्रांतीच्या जमान्यात साऱ्याजणीनं माध्यमांतर करून आपलं संपर्काचं जाळं विस्तारायला सुरुवात केली आहे. अद्ययावत वेबसाईट, मिसा ऑनलाईन हे द्विभाषिक पोर्टल, चौदा हजारांहून जास्त फॉलोअर्स असणारं फेसबुक पेज तसंच इंस्टाग्रामवरही साऱ्याजणी सक्रीय आहे. व्हॉट्सॲपच्या माध्यमातून दोन वाचक कट्टे, मिसा सामाजिक पालकत्व, माध्यम संवादक, तसंच प्रतिनिधींचा गट अनेक प्रकारानं विचारांची देवघेव करत मैत्र जपत आहेत. आपणही यामध्ये जरूर सहभागी व्हा. सगळे मिळून परिवर्तनाचा धागा पुढे घेऊन जाऊ या.**







First Issue of Miloon Saryajani August 1989

It all started thirty years ago. In 1989, 'Miloon Saryajani' took it's first breath and since then this vibrant stream of progressive thought has been nurturing the minds of numerous Marathi readers. During the journey, an ever-lasting bond was created with a number of writers, editors, advertisers and well-wishers. Readers' conclaves at various places in and outside Maharashtra, publication programmes of 'Saryajani's special issues, meetings of Saryajani's representatives in Maharashtra and the annual anniversary programme have helped us connect with more and more people.

It's like the expanding ripples on the water finally merging in it! This sense of belonging makes all aware of their responsibility and duty and they strive to keep this stream fresh and alive.

Let's have a look at some of the renowned artists, writers, thinkers and activists who have contributed their bit in the movement called 'Miloon Saryajani.'

The name 'Miloon Saryajani' denotes 'women', but it must be emphasized that it includes everybody. The prime objective behind the birth of this magazine was to create a space for women who were trying to break the moulds. Our efforts were aimed at enabling women to challenge the boundaries set by their 'womanhood' without completely discarding the idea and to have a constant self-dialogue. Along with this, we also expect men to challenge the boundaries of 'manhood' and that's the reason behind the tagline that we created in our twentieth year –
'To enable women and men to have a dialogue with themselves and with each other'.



Collection of selected articles published in 20 years.
Publication of 'Streemiti' by Vidya Baal, Girish Karnad, Pushpa Bhave, Geetali, Neelima Gundi.

Throughout our journey, we have strived to include the voices of various social segments. For us, what stands above everything is the pursuit of humanity. So far, only heterosexual men and women were considered as 'normal human beings' and the rest of the people were considered as 'others'. But now, the LGBTQ movement has been fighting for social acceptance. 'Miloon Saryajani' completely supports homosexual and other forms of sexual orientations and corresponding relations and accordingly, we have rephrased our tagline as – For enabling a renewed dialogue among all of 'them', going beyond 'he' and 'she'.



Miloon Saryajani' representatives from across Maharashtra

Uttam Bandu Tupe, Sulabha Deshpande, Sadanand Deshmukh, Shafaat Khan, Amol Palekar, A. H. Salunkhe, Lalan Sarang, Nanasaheb Gore, Satyaranjan Sathe, Leela Poonawala, Anusuyabai Shinde, Shantabai Kirloskar, Santosh Jadhav, Vaishali Bhandvalkar, Mahesh Bhagwat, Anuradha Athavale



Sanjay Sangvai, Vinay, Charul, S. P. Bhagwat, Bebitai Kambale, Bhanwaridevi, Bhai Vaidya, Mrunal Pande, Kamal Desai, Kamalabai Pani, Pradnya Daya Pawar, N. D. Mahanor, Kavita Mahajan, R.P. Nene, Leena Mehendale, Nalinitai Ladakhe, Nikhil Wagle, Ketan Mehta

Special programme 2012
Awakening woman's self-realization
Urmila Pawar, Milind Bokil, Vidya Baal, Aruna Roy and Geetali




'Everything is fair if it's about power and money' appears to be the order of the day. This is a disturbing time when values of simplicity, mutual understanding, non-violence and dialogue – which are essential for peaceful co-existence are considered to be outdated or impractical. Concepts like love for nation, masculinity, bravery, strength are increasingly getting oriented towards violence. Idea of nationalism is taking a fanatic turn and the youth is guided to the philosophy of 'eye for an eye'. In such testing times, 'Miloon Saryajni' finds it imperative to cultivate the mind of youth in right direction and keep them away from violence. With this in mind, we have initiated a programme – 'Youth Connect.'

In the changing times, we seek support from our readers, writers, advertisers, well wishers and friends. The challenges before us are quite enormous and we believe that with you by our side, we can address them. We request you to grant us your monetary or other co-operation to keep this movement alive!

Editors

Vidya Bal
Dr. Geetali V.M.

**मराठी भाषिकांपलीकडे पोहचण्यासाठी हे इंग्लिश माहिती पत्रक आणि misaonline portal...**

## SUBSCRIPTION

**Within India (in Rs.)**

| | 1 Year | 3 Years | 10 Years |
|---|---|---|---|
| Individual | 500/- | 1400/- | 5000/- |
| Organisation | 700/- | 1900/- | 7000/- |

**Outside India (in USD)**

| | 1 Year | 3 Years | 10 Years |
|---|---|---|---|
| Individual | $50 | $120 | $600 |
| Organisation | $60 | $150 | $750 |

Subscription can be made through Money order or Demand draft/ At par cheque in the name of 'Niramay Public Charitable Trust'.
You can subscribe through Internet banking also.
Our bank details are as follows.

A/C Name : **Niramaya Public Charitable Trust**

**Union Bank, Karve Road, Pune**
Saving Ac. No. - **370002010908793**
IFSC - **UBIN0537004**

**Bank of Maharashtra, Karve Road, Pune**
Saving Ac. No. - **60029908172**
IFSC - **MAHB 0000116**

**Important**
If you subscribe through online payment please SMS us your name, address, the amount you have paid and your bank details on 7447449664.

**Website :** www.miloonsaryajani.in
www.misaonline.in
**E-book :** Millon Saryajani available as E-book on BookGanga.com


**Miloon Saryajani**
Flat No. 101, First floor,
Nachiket co.op.Hou.Society, Parbhat Road,
Lane No.4, Erandvana, Pune 411004
Contact : 020-25653938, 7447449664
Email : saryajani@gmail.com
(Monday to Friday – 12 to 5 p.m.)


# मिळून साऱ्याजणी

Since August 1989

*Miloon Saryajani*

**Not just a magazine, but a movement to initiate a fresh dialogue among all in the gender spectrum!**

